वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०।१२
सहामाही " ३ " ०।८
सालअखेर " ७ " १।०८
किरकोळ अंकास........................ ०।४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........०।१

Rs.
per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 "1Rs. 8 as
Six monthly...........3 " 8 as
Single copy..................................4a

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over10...4as
Repetition per line3as

THE BERAR SAMACHAR

VOL XXV | AKOLA MONDAY 2 FEBRUARY 1891 | NO 5

वर्ष २५ | अकोला सोमवार तारीख २ माहे फेब्रूवारी सन १८९१ इ० | अंक ५

## सचित्रक्याटलाग



आ. डी. कानिटकर.
आणि कंपनी
मुंबई गिरगांव याचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्धा आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल

वऱ्हाडसमाचार

मिती पौष वद्य ८ शके १८१२.

## कायदा पाहिजे किंवा नको?

(मागील अंकावरून पुढें चालू)

कायदेवाली मंडळी कांहीं म्हणोत व बेकायदेवाली मंडळी कांहीं म्हणोत तरी त्याचा सारांश एका दृष्टीनें असा निघतो कीं उभय पक्ष आपापल्या समजा प्रमाणें सामाजिक सुधारणेस चांगलें अनुकूळ आहेत. सुधारणा म्हणून सर्वांस पाहिजे परंतु उभयतांचे सुधारणा करण्याचे मार्ग अगदीं भिन्न भिन्न आहेत. दोन्ही विरुद्ध पक्ष समर्थ व सूज्ञ असल्यानें भलतीच एखादी बरी वाईट गोष्ट सुधारणेच्या सदरा खालीं प्रचारांत येत नाहीं व सहसा अर्धवट विचारानें समाजास कोणतें ही चलन मिळत नाहीं ही आनंदाची गोष्ट होय. कायदेवाली मंडळी म्हणतात कीं समाजाच्या चाली रीतीवर सुदर्शन चक्र सरकारच्या कायद्याचें पाहिजे म्हणजे सरकारच्या बळसामर्थ्यानें समाजास इष्ट वळण लागेल व लांबणीवर व दिरंगाईवर पडलेल्या सुधारणा लवकर लवकर रूढ होतील. त्यांच्या म्हणण्यास ते पुरावा असा आणितात कीं सती जाण्याची बंदी करण्याचा कायदा सरकारनें केल्यापासून ती दुष्ट चाल कायद्याच्या दहशतीनें तत्काळ लयास गेली व प्रजेचें कोटकल्याण झालें. प्रस्तुत नेटिव समाजांतील सुधारणा सतीच्या चाली सारख्या फार घातुक चाली संबंधानें आहेत तेव्हां सरकारचा कायदा अवश्य पाहिजे हे सिद्ध करून दाखविणें कायदेवाली मंडळीचें काम आहे. नवीन भावी सुधारणा इतक्या घोटाळ्याच्या व अवघड आहेत कीं त्या विषयीं सतीच्या कायद्याचा दाखला देणें रास्त दिसत नाहीं उलटें, बेकायदेवाली मंडळी प्रतिपादितात कीं हिंदुस्थानची सामाजिक रचना सरकारास इत्थंभूत समजणें दुरापास्त आहे व समाजाच्या घडामोडींत सरकारनें ढवळाढवळ केली तर नेटिव लोकांस आपलें म्हणून कांहीं एक निराळें दाखवितां येणार नाहीं कांकीं सरकारच्या कायद्यानें नेटिवांच्या धर्म संस्थास व त्या मुळें नेटिवांच्या आपलेपणास सर्वस्वी धक्का पोंचणार आहे आणि फ्रान्सच्या राज्यक्रांति सारखी एखादी भयंकर व अपायकारक धर्मक्रांति होऊन राज्यक्रांतिही होण्याची मोठी भिती आहे. सर्वांचा विचार चांगलें करण्याचा आहे व सरकारचा ही विचार तसाच आहे तेव्हां उभय पक्षांनीं आपलें बलाबल पाहून व ताटातूट न होईल अशा रीतीनें मिळतें घ्यावें म्हणजे सामोपचारानें समाजाची तोडजोड निघेल.

प्रस्तुत कायद्यानें समतीच्या वयाची ईयत्ता बारावे वर्षा पर्यंत वाढविण्या संबंधीं मोठा प्रश्न नेटिव लोका समोर आहे आणि त्याच्या योग्य विचारावर पुष्कळ अन्य सामाजिक सुधारणेचा जयापजय अवलंबून आहे. गेल्याच्या मागील आठवड्यांत अकोल्यास गणेश मंदिरांत जंगी सभा भरून संमतीचें वय बारा करण्या विषयीं कायदा करूं नये अशा आशयाचें विज्ञप्ती पत्र सरकारास पाठविण्याचा बहुमतांनें ठराव झाला. ही गोष्ट वरील प्रश्नाचा निकाल कसा व्हावा म्हणजे लोकांस आवडेल या अभिप्रायाची दर्शक होय या अंकीं आम्हास या सभेस सूचनेच्या रूपानें कांहीं गोष्टी कळविणें आवश्यक आहे आणि हें करितांना बहुत लोकांच्या मता विरुद्ध अभिप्राय सांगून त्यांच्यापाशीं थोडा वुद्धिवाद करणें आम्हांस भाग आहे म्हणून कर्तव्य हें बजावतांना एक प्रकारें दिलगिरी वाटते व दुसरें कर्तव्याच्या बाजूनें मनास संतोष वाटतो.

कलकत्याच्या बड्या कायदे कौंसिलापुढें नामदार आंड्रयु स्कॉबल यांनीं कायद्याचा असा मसुदा आणिला आहे कीं इंडियन पिनल कोडचे ३७५ वे कलमान्वयें मुलीच्या दहावे वर्षां पूर्वीं तिच्यापाशीं संभोग करणारा मनुष्य जबरी संभोगाच्या अपराधांत सांपडतो त्या कलमांत दहा वर्षांच्या ठिकाणीं बारा वर्षांची ईयत्ता कावी. दहावे वर्षा पूर्वीं मुलीच्या समतीनें किंवा समती वांचून संभोग घडला तरी तो अपराध होतो. मग ही मुलगी विवाहित असो किंवा अविवाहित असो व संभोग करणारा तिचा नवरा असो किंवा कोणी ही अन्य मनुष्य असो ते सारखेच दोषास पात्र होतात. या कायद्याच्या कलमानें संमतीच्या वयाची ईयत्ता दहा वर्षांची होती ती वरील नवीन बिलानें बारा करण्याचा विचार आहे. गेल्याच्या मागील शुक्रवारीं या बिलाचा प्रथम विचार करण्या साठीं स्कॉबल इचिन्स बिल्स, रोमेशचंद्र मित्र, नूलकर व महमंद अलिखान या कौन्सिलदारांची एक निराळी कमिटी नेमिली जाणार होती व त्या प्रमाणें ही कमिटी नेमिली जाण्यास आम्हा कडून कांहीं व्यत्यय नाहीं. आरंभीं हें बिल कौंसिला पुढें आणते समयीं पुष्कळ भवति न भवति झाली त्या वरून बहुतेक गोष्टी कशा काय ठरतील याचें ठोकळ अनुमान करण्यांस पुष्कळ साधनें आपणां जवळ आहेत.

उत्तरोत्तर मुली अधिकाधिक वर्षें उपवर ठेवण्या विषयीं लोकांची प्रवृत्ति बळावत आहे आणि गर्भाधानविधी नवरा बायकोंच्या अल्पवयांत न होऊं देण्या विषयीं लोकांचा मुख्य विचार दिसून येतो. अल्पवयांत मुलीचा संबंध जुळून आयुष्य हानि होते व प्रजा ही निःशक्त व दुबळी निपजते असें वयांतील गृहस्थांच्या प्रत्यन्तरास येऊन चुकलें आहे. चांगली व इष्ट गोष्ट कळून आली तरी तिच्य संबंधानें फरक होणें काम सोपें नसतें आणि त्या प्रमाणें प्रस्तुतच्या लोकांच्या श्रद्धा प्रमाणें स्थित्यन्तर होण्यास कालावधि लागेल व तो लागला ही पाहिजे. वरील संमतीच्या वयाचे मर्यादा वाढविण्याचें बिल पसार होऊन तो कायदा ठरल्यास आपल्या समाजाच्या नवरा बायकोच्या गर्भाधान संबंधाच्या नियमांत बदल करावा लागेल. मुलीस अकरावे वर्षीं ऋतुप्राप्त झाला तर रूढ मार्ग असा आहे कीं त्या रजोदर्शन झालेल्या स्त्रीचा गर्भाधान संस्कार त्या वयांत ही करावा. या नवीन कायद्यानें हा संस्कार दहावे किंवा अकरावे वर्षीं झाल्यास ते गर्भाधान जबरी संभोगाच्या अपराधाखालीं मोडलें जाईल आणि शास्त्रोक्त रीत्या गर्भाधानाच्या समारंभांत आनंद मानणाऱ्या नवरा बायकोस कायद्यानें शिक्षा दिली जाईल. एखाद्या नवऱ्यानें स्त्रीशीं संभोग केल्यास हा काल पावेतों दहा वर्षा पर्यंत तो संभोग जबरी संभोग म्हणून कायद्यानें मानला जात असे त्या ऐवजीं या नवीन बिलानें बारावे वर्षा पर्यंत स्त्रे पुरुषांचा संभोग जबरी संभोगाचा अपराध म्हणून समजला जाईल. एकंदरीनें पूर्वीच्या कायद्या अन्वयें सरकारचा हात विवाहाच्या पद्धतींत न कळत होता त्याच प्रमाणें या नवीन बिलानें ही तो कायम राहिल्यास कांहीं नवीन दोष घडत नाहीं असें आज तीस वर्षांच्या अनुभवा वरून दिसेल असा स्कॉबल साहेबांचे म्हणण्याचा आशय आहे. म्हणजे या नवीन बिलानें कांहीं एक नवीन अपराध केला असें होत नाहीं.

या बिलाचें मुख्य भाग दोन आहेत. पहिला भाग विवाहित मुली संबंधानें नसून वेश्येच्या धंद्याला बाधक आहे. शहरोशहरीं असा प्रकार दिसतो कीं अल्पवयाची मुलगी असली तरी तिजपाशीं विषयसुख घेण्यास अविवेकी लोक मागें घेत नाहींत. कसब करण्याचा धंदा कामान्ध लोकांच्या दुर्व्यसनानें व पैशाच्या लोभानें दाहाबारा वर्षांच्या मुली होत आहेत नाहींत तोंच सुरू होतो आणि त्या मुळें मोठी हानि होत आहे. नामदार रोमेशचंद्र मित्र हे कायदा नको म्हणून म्हणतात तरी या भागा संबंधानें या बिलास त्यांची पूर्ण संमति आहे. बंगाल्याकडेच काय सर्व हिंदुस्थानभर वेश्या आपलें शरीर अल्पवयीं विकण्यास तयार होतात ही गोष्ट महशूर आहे तेव्हां या बिलांतील नियमानें या दुष्ट लोकांतील दुराचारास चांगला अटकाव होईल व त्या पासून लोकांचें हित आहे हें निर्विवाद आहे.

हें बिल लग्नादि चाली रीतीस बाध आणील व तो कितपत आणील आणि तेणेंकरून महाराणी सरकारच्या अठरालच्या जाहिरनाम्यांतील धर्म संबंधीं प्रकरणीं हात न घालण्याची शर्त पाळण्या सारखी होत नाहीं हे इष्ट कितपत आहे याचा निर्णय केला पाहिजे. शास्त्र सांगतें कीं आठवे वर्षांपासून बारावर्षांपर्यंत लौकिकी लग्न विधि करावा परंतु गर्भाधान विधि ऋतु प्राप्त झाल्यावर व्हावा. ऋतु प्राप्तीचा समय सरासरीनें बारा वर्षे वयाचा आहे तेव्हां समतीचे वय बारावे वर्षपर्यंत वाढविल्यास लग्नाच्या चालरीतींत फरक पडत नाहीं. हें नवें बिल समतीचें वय वाढविणें तें जन समाजास पाहिजे आहे आणि त्यामुळें गर्भाधान सोहळा ऋतु प्राप्त झालेल्या मुलींचे बारा वर्षे वया पर्यंत लांबेल ही गोष्ट किमान पक्षीं लोकांस कल्याण प्रद असून समाजाचें पाऊल एवढ्या पुरतें तरी पुढें पडेल असें स्कॉबल साहेबांनीं सप्रमाण दाखविलें आहे. ऋतु प्राप्त होण्यापूर्वीं स्त्रीगमन शास्त्रानें विहित नसून हा प्रचारांत आहे आणि बंगाल्या कडेस विशेष या चालीचा प्रभाव आहे तेव्हां समाजानें कायद्याच्या आधारानें निदान स्त्रीच्या बारावे वर्षापर्यंत तरी विवाहित स्त्री पुरुषांकडून शास्त्रोक्त वर्तन घडवावें आणि त्या साठीं या बिलाचा हेतु हें जबर शस्त्र लोकांच्या हातीं देण्याचा आहे. नड काय ती कायद्याच्या संमतीच्या वया पूर्वीं स्त्रीस रजोदर्शन झाल्यास कायद्यानें लोकाचारास व्यत्यय येत आहे परंतु नूलकरानीं सांगितल्या प्रमाणें शास्त्रोक्त विसंगतता असल्या कारणानें व जनसमूहाच्या हितदृष्टीनें असल्या ऋतु प्राप्तीच्या वेळीं गर्भाधान न होणें इष्ट आहे तेव्हां हें बिल लोकांनीं मान्य करणें हीच गोष्ट हितप्रद आहे. रोमेशचंद्र यांचें मत बिलास प्रतिकूळ असण्याचें कारण निराळें होतें. बिलांतील सूचविलेल्या सुधारणा त्यांस अवश्य पाहिजेत परंतु सरकारी कायदे कानूच्या मार्गानें नकोत त्यांच्या मतें संध्याच्या कायद्यांत स्त्रीस केलेल्या इजेबद्दल नवऱ्यास शिक्षा होत असल्याकारणानें स्त्री संबंधीं कायद्याची ही नवीन कुमक बिलकूल नाकी. शिवय या कायद्यानें धर्मांत हात घातल्याचा सरकारावर दोष येतो आणि सरकारावरील भरंवसा नाहींसा झाल्यामुळें लोकांत अस्वस्थता उत्पन्न होईल. व्हाइसराय साहेबांनीं आपल्या उपसंहारांत प्रतिपादिलें कीं अविवाहित मुलीस कायद्यानें जें संरक्षण दिलें जाणार आहे तेंच विवाहित मुलीस दिलें गेल्यानें अपराध घडत नाहीं व राणी सरकारच्या जाहिरनाम्यांतील शर्तीस ही बाध

येत नाहीं कांकीं रजोदर्शनाची वेळ विवाहित किंवा अविवाहित स्थितीवर अवलंबून नसते. आणि लोकांच्या कल्याणासाठीं इष्ट कायदा करण्यास जाहिरनाम्यावरून कांहीं एक अटकाव दिसत नाहीं. नूलकरांच्या ह्मणण्याप्रमाणेंच त्यांनीं सांगितलें कीं या बिलानें लोकांत अस्वस्थता होण्याचें कारण नाहीं कांकीं लोकांस भयंकर व कष्टप्रद वाटणाऱ्या सुधारकाच्या इतर सूचनांशीं या बिलाचा काडीमात्र संबंध नाहीं व या बिला पासून कांहीं एक अहित होण्याचा संभव नाहीं. मलबारी व आणखी कांहीं विलायतेंतील गृहस्थांच्या हिंदुस्थान सरकार मार्फत तीन चार सूचना आल्या आहेत त्यांचे पूर्ण मनन करून पाहतां सरकार कोणत्या ही अन्य प्रकारें नेटिवांच्या समाजांच्या व्यवहारांत हात घालूं इच्छित नाहीं हें लोकांनीं सदा सर्वकाळ ध्यानांत ठेवावें.

हें नवीन बिल पसार होण्याचा रंग दिसत आहे आणि तें पसार झाल्या पासून मोठी हानि होईल असाही प्रकार नाहीं तेव्हां आह्मांस त्या संबंधानें मोठी फिकीर वाटत नाहीं परंतु खरोखर हा नवा कायदा अमलांत आला ह्मणजे जुलूम व अन्याय होण्याची मात्र निराळ्या प्रकारें सामुग्री सिद्ध होत आहे हें मनांत आलें ह्मणजे मोठा विचार पडून पडतो.

प्रथम, विवाहित स्त्रीपुरुषांच्या कोणत्या ही व्यवहारांत जबरी संभोगाची व्याख्या लागू करणें ह्मणजे मानवी विचार धक्क होतात. दहा वर्षांच्या संमतीच्या वयाच्या मर्यादेनें लोक दृष्टीस ही गोष्ट सहसा येत नसे तो या पुढें यत्किंचित् तरी येणार आहे त्यामुळें सारे लोक जबरी संभोगाच्या व्याख्येनें हवालदील झाले आहेत. लोकांच्या नीति विषयक विचारास वरील प्रकारानें अती धक्का बसता हें कोणी ही कबूल करील.

दुसरें, नवीन कायद्यानें पोलिसांचा जुलूम वाढेल अशी भिती होती परंतु स्कोबल साहेबांच्या बिलांत अशी व्यवस्था केली आहे कीं माजिस्ट्रेटाच्या हुकुमाशिवाय विवाहित स्त्रीपुरुषा संबंधानें पोलिसास कांहीं एक चौकशीचा हक्क नाहीं आणि माजिस्ट्रेटाच्या हुकुमानें ही अपराधी नवरा बायको पासून जामिनकी घेई पर्यंत पोलीसाचा अधिकार चालावा परंतु रोमेशचंद्र मित्र यांनीं दाखविल्या प्रमाणें या व्यवस्थेनें ही माजिस्ट्रेट व पोलीस यांच्या दुष्ट सल्ला मसलतीनें मोठा अनर्थ घडण्याचा संभव आहे. घरांतील नाजूक गोष्टी बाहेर आणण्यास चाण्डाळ व उन्मत्त अधिकारी मागें सरणार नाहींत. अशा बद्दल आह्मास ठेंचा लागल्या आहेत. या संबंधानें विस्तारानें लिहितांना आह्मास मॅजिस्ट्रेट व पोलीस या खात्यातील अन्यायी वर्तनाकडे दृष्टी देणें भाग होईल. सारांश सरकारचा कायदा करण्याचा संकल्प असल्यास वरील विचाराकडे अवश्य लक्ष पुरवावें. तिसरें, जबरी संभोगाच्या अपराधा खालीं नवऱ्यास शिक्षा दिल्यास त्या बायकोचा मोक्ष न होतां फार फार छळ होणार आहे. जबर शिक्षेनें तिला पतिवियोग होऊन प्राणेश बंदिवासांत गेल्यानें प्राणही नकोसा होईल. हिंदु स्त्रियाचें पातिव्रत्य फार कडक असतें या बद्दल सतीची चाल साक्ष देत आहे. तिची अशा दशा होऊन लोकापवादानें ती मरणास हें कबूल होईल. हिंदुस्थानच्या नेटिव समाजाला सुकुमार कुमारिकेची उपमा एकानें दिली आहे. मुसलमान व हिंदु हे तिचे दोन नेत्र ह्मणून दाखविले आहेत. अशा सुकुमार कुमारिकेस न्यायासना समोर उभे करून व गोष व मराठमोळा इत्यादि गोष्टींस झुगारून तिचा जाबजबाब घेण्याचा अधिकार सरकार आपल्या हातीं घेत आहे इतकेंच नव्हे तर अपराध ही मोठा कलंक लावणार आहे. निर्दोषी ठरल्यानेंही कुमारीपणास नष्टचर्य प्राप्त झाल्यासारखें वाटतें मग अपराध शाबीत झाल्यास शिक्षा मरणाहून ही अवघड वाटेल.

चवथें, नेटिवांमध्यें नवीन कायद्यानें अपराध ठरणारे प्रकार होत असतील तरी ते कालगतीनें लयाश जात आहेत. निदान सुधारकांच्या उतावळे पणानें व सरकारांतून वरील बिला सारख्या गोष्टींची वाटाघाट चालल्यानें समाजाला जबर भीति वाटणें रास्त आहे. तेव्हां हें बिल तहकूब राहिलें तरी पुष्कळ कार्य भाग झाल्या सारखें होणार आहे, नाहींतर कदाचित सुईच्या कामाला पहारीचा उपयोग केल्यानें जितके अपाय घडतात निदान तितके नवीन कायदा पसार झाल्यानें घडून येण्याचा संभव आहे.

असो, या प्रमाणें साधक बाधक गोष्टींचा विचार आपण केला आहे तेव्हां लोकांनीं नीट विचारानें कांहीं निर्णय करणें नीट आहे. कायदा पाहिजे किंवा नको ह्मणून अर्ज केल्यानें कांहीं लक्ष्यांश या पुढें होणार नाहीं असें आह्मी खात्रीनें सर्वांस विदित करीत आहो. कायदेवाले, बेकायदेवाले व सरकार या तिघांचा ही विचार तात्विक दृष्ट्या चांगला आहे. लोकांची सुधारणा व्हावी असाच तिघांचा पूर्ण मानस आहे. प्रस्तुतच्या बिलांतील सुधारणा आपणास नकोशी नाहीं व ती अवश्य पाहिजे हें कोणी ही सूज्ञ कबूल करील अनिनी लगामानें फार खेचली ह्मणजे घोडा ताब्यांत न राहता बेफाम ही होत असते हें ही सर्वांनीं मनात वागविलें पाहिजे. प्रत्येक पक्षानें आपण होऊन स्तुत्य हेतू साठीं हार मानिली पाहिजे व कांहीं तोड जोड काढून सरकारास कायदा नको अशी विनंती करण्या पेक्षा अशा सवलतीनें व युक्ती प्रयुक्तीनें कायद्याचा कमजोर व्हावा, कायद्यानें विवाहित स्त्रिपुरुषांच्या संबंधास कोणत्या ही स्थितींत जबरी संभोगाचें स्वरूप येऊं नये, संमतीच्या वया पूर्वीच्या संभोगाच्या अपराधास विवाहिता संबंधानें निराळ्या प्रकारें गौणत्व आणावें, अपराध्यांचा व त्यांच्या आप्तमित्रांचा छळ न होईल अशा रीतीनें शिक्षेचें मान बदलावें, विवाहिता संबंधानें चौकशी चालली असतां माजिस्ट्रेट व पोलीस हे आपल्या कर्तव्यांत चुकल्यास फार कडक शिक्षा असाव्या, विवाहितास जनापवाद व न्यायकोडतांतील अपराधी म्हणून होणारा अपमान अत्यंत दुःसह असल्या कारणानें त्यांच्या अपराधा बद्दल शिक्षा दंडाच्या रूपानें व्हावी व त्यांतील दंडाची बरीच रक्कम बायकोच्या नांवानें तिच्या सरंक्षणार्थ सरकारच्या देखरेखी खालीं सुशील आप्तमित्रांच्या स्वाधीन करावी इत्यादि प्रकारच्या अटी नवीन बिला प्रमाणें कायदा होते वेळीं नमूद केल्या जाव्या अशा मतलबाचे सरकारास अर्ज करावे अशी आमची सर्व लोकांस व अर्थात येथील गणेश मंदिरांतील सभेच्या सभासदांस विनय पूर्वक सूचना आहे.

## मि. चार्लस् ब्रॅडलॉह्यांचा मृत्यु

आह्मांस कळविण्यांस फार वाईट वाटतें कीं आपल्या हिंदुस्थान देशाचे खरे कैवारी चार्लस ब्राडला ह्यानीं गेल्या शुक्रवारी प्रातःकाळीं इहलोक सोडून परलोकाचा मार्ग धरला. अशा ऐन आणि बाणीचे प्रसंगीं त्या थोर माहात्म्यास मृत्यूनें अकालीं घाड घालून हिराऊन नेल्यामुळें ह्या देशावर काय घोर प्रसंग गुदरला—लोकांस दुखार्णवांत बुडऊन किती उद्विग्न करून टाकिलें ह्याची कोणास तरी कल्पना करितां येईल काय? —मग त्याचें वर्णन तर दुरापास्तच. मि. फॉसेट, ब्राईट प्रभृति मंडळींनीं ह्या देशाचा पक्ष उचलून प्रसंग विशेषीं खरी भूतदया, न्यायबुद्धि, निष्कपटप्रेम, वाक्‌नैपुण्य, सदसद्विवेक, व शुद्धाचरण ह्याच्या जोरानें ग्लॅडस्टन सभेत घोर वादयुद्ध करून प्रतिपक्षाचें खंडन करून त्यास जेरीस आणून आपलीं मतें सिद्ध करून व त्या मुळें ह्या देशाचे अमोलीक फायदे करून आणि बाणीच्या वेळीं आमच्याच दुर्दैवानें परलोकाचा रस्ता धरला. त्याच प्रमाणें ही हा पुण्यशाली थोर पुरुष आपल्या विचित्र चरित्राची आठवण मात्र ठेवून एकाएकीं नाहींसा झाला. इसवी सन १८८९ सालच्या अखेर महिन्याचे शेवटील दिवसांची आठवण वाचकांनीं केली कीं पुरे. ते दिवस व आजचा दिवस ह्यांतील फरक त्यांचे डोळ्या पुढें लागलीच येतो. त्या दिवसांत मुंबईस त्यांचे आगमन- राष्ट्रीय सभा- त्यांत त्यांचा आदर सत्कार, त्यावर मान मात्रांची गर्दी व त्यांची हास्य मुद्रा ही सर्व डोळ्या पुढें तशीची तशीच उभी रहातात. त्या काळीं त्यांनीं आम्हां भिन्न धर्मी, भिन्नवर्णी, भिन्नदेशी व भिन्नचारी लोकांस मोठ्या कळवळ्यानें, सदय व शुद्ध अंतःकरणानें किती शिकविलें- आम्ही त्यांचा वक्तृत्व सुधाधारांचे स्तब्ध व निश्चल पणानें प्राशन करीत कोणत्या अप्रातिम आनंद सागरांत उचंबळ्या मारीत होतो- त्या समयीं केवढाली आश्वासनें दिलीं- काय अशा आह्मांस लावून दिल्या- व शेवटीं देशीं परत जातांनां आमचे किती तरी समाधान केलें.:- नन्तर तेथें जाऊन त्या सफल करण्या बद्दल काय काय दीर्घ प्रयत्न केले व इच्छित हेतु तडीस गेला नाहीं तरी अधीक धीर धरून धीमें पणानें पुढें सरसाऊन, आमची गाऱ्हाणी पार्लमेंट पुढें सांगण्यास काय आवेशानें धावले—इत्यादि मागील गोष्टींची आठवण केली कीं आह्मांस कसेंचे कसेंच होतें. एकदम पर्वताचें शिखरावर मजबरोबर चला असें सांगून, आह्मांस मार्गीं लावून ते दूर अन्तरावरून नाहींसे झालें व आह्मास तळाशीं बेसावध असतांनां एकदम ढकलून दिले. अशा बिकट प्रसंगीं जगन्नियंत्यावर पूर्ण भरंवसा ठेवून दुसरा सहायकारी येण्याची वाट पाहण्याचा प्रसंग आला आहे.

हा पुरुष तर गेलाच. पण त्याची कीर्ति मात्र येथें चिरकाल राहील. त्यांची सत्यतेची निस्सीम आवड, तत्व शोधून काढण्यांत अलेले अडथळे दूर करण्यांत दीर्घ प्रयत्न,—समकालीन देश बांधवांनीं केलेल्या दुर्धर छळास न जुमानून स्वविचार शक्तीस योग्य दिसलेल्या मार्गाचा स्वीकार करण्याकडे त्यांच्या मनोदेवतेची सतत धांव, प्रामाणिकपणा, निःस्पृहत्व, शान्तता इत्यादि त्यांचे अंगीं वसत असलेल्या गुणांची कीर्ति आमचे हृदयांत राहील ज्ञानचक्षु चोंहो कडे फेकून जो विस्तृत ज्ञानराशि मिळविला त्याचा योग्य पात्रीं योग्यकाळीं व योग्यरीतीनें व्यय करून ते ज्ञानवृद्ध झाले अशा या ज्ञानवृद्ध व वयोवृद्ध पुरुषाचें चरित्र कोणवरें विसरेल?

---

अलिशान रेसिडेंट साहेबांस मागें कळविल्या प्रमाणें ता. २६ रोजीं संध्यांकाळीं ४॥ वाजतां टाऊनहालांत येथील म्युनिसिपालिटी कडून व जिल्हा बोर्डा कडून मानपत्र देण्यांत आलें. समारंभास सर्व आफिसर व जिल्ह्यातील इतर संभावीत गृहस्थ व जमिदार लोक बोलाविले होते. सुमारें ५०० वर मंडळी जमली होती. मानपत्रांत मुख्य तीन मागण्या केल्या होत्या. (१) अकोलें शहर जिल्ह्याचें मुख्य ठिकाण असल्या मुळें येथें सर्वांच्या सोई साठी. पाण्याचे नळ करण्याकरितां सरकारनें अर्ध्या खर्चा बद्दल मदत द्यावी. (२) लोकल फंडाचे आफिस जिल्हा बोर्डाला मिळून द्यावें (३) लोकल कमेट्या ज्या गांवांत आहेत तेथील कामें जिल्हा बोर्डास करितां यावीत. या वरील तीन व आणखी इतर गोष्टी संबंधानें बोलतांना अलिशान साहेब असें म्हणाले कीं ह्या सर्व गोष्टी फार महत्वाच्या व विचाराच्या आहेत या संबंधानें निरनिराळ्या खात्याच्या अधिकाऱ्या कडून योग्य रीतीनें लिहून आल्या शिवाय व त्याचा पूर्णपणें विचार केल्या शिवाय कांहीं जबाब देतां येत नाहीं. तर या बद्दल चांगला विचार करीन असें त्यांनीं अश्वासन दिलें. त्या नंतर हार गजरे, पानसुपारी वगैरे वाटली जाऊन समाज बरखास्त झाला. पान सुपारी वाटण्याच्या अवकाशांत अलिशान साहेबांस मे. डेपुटी साहेब म्युनिसिपल मेंबरा संबंधानें व जिल्हा बोर्ड मेंबरच्या संबंधानें माहिती देत होते. दुसरे दिवशीं आ साहेबांनीं जिल्ह्यातील ठळक ठळक १९ इसमाच्या गांठी घेतल्या. त्याच दिवशीं पुनः टाऊनहालांत मुलींचा बक्षीस समारंभ अलिशान साहेबांच्या कन्येच्या अध्यक्षते खालीं झाला. त्या नंतर ता. २८ रोजीं अलिशान साहेब दिवसा २ वाजताच्या गाडीनें रवाना झाले. त्यां दिवशीं स्टेशन फार सुशोभीत केलें होते व येथील म्युनिसीपालिटीनें तेथें पान सुपारीचा थाट केला होता खामगांवच्या मंडळीनें आग्रह केल्या वरून जळंबच्या स्टेशनावर साहेबांनीं त्यांची पानसुपारी घेतली व पुढच्या खेपेस येईन तेव्हां खामगांस अवश्य येण्याचें कबूल केलें. ही संधी पाहून कांहीं मंडळी त्यांच्या कडे कागाळी करण्यास मेली होती त्यांत अकोली जाहगीर येथील सुमारें ३००० इसम तेथील जाहगीर दारावर अर्ज देण्या करितां आले होते. परंतु येथल्या येथेंच त्या अर्ज दारांना आपला निकाल समजला नाहीं. पुढें काय निकाल होईल तो पहावें. अलिशान साहेबाच्या सन्मानार्थ

and conclusive arguments at such a critical and decisive moment that his article will go a great way to cast fruitful seeds of liberal ideas deep into the minds the ordinary Hindu public, to grow and to bring about a favourable and timely revolution in the actions of the Hindu community. He emphatically declares that 'the endeavour, therefore to compel the Hindus to keep a girl untouched before the age of twelve should be welcomed by them as being conceived quite in the spirit of the old Rishis. If it succeeds it will make them more faithful followers of those sages and more essentials religious Hindus than in these corrupt times they are.

The article has already grown its due and proper limits. Let us cut it short, though abruptly the Ganesh Mandir-Sabha think once more over the prospects of the bill and it will then learn so to shape its conduct as to get the most of what is going on in regard to the 'age of consent' bill.

---

We have just received the mournful intelligence of the death of India's English champian, Mr. Charles Bradlaugh.

---

For want of space we have kept back the communications received from "X" and "Traveller" and shall insert them in our next issue.

---

## बऱ्हाड

आज या जिल्ह्यांतील दारू, गांजा, अफू वैगरे अबकारीच्या मक्त्याचा हरास येथें डेपुटि कमिशनरचे हापिसांत आहे.

गेल्या म्या. प. पसार झालेले विद्यार्थ्यां पैकीं बळवंत विठ्ठल देऊळगांवकर, दामोदर चिंतामण व रामचंद्र मार्तंड गुप्त यांस प्रत्येकीं २० रु० प्रमाणें स्कालरशिप्स माळाल्या.

अकोलें हा० स्कूल पैकीं सदाशिव तुकाराम गेल्या म्या. प. त. पास झाल्याचें मागहून प्रसिद्ध झालें आहे.

---

### नोटीस.

मारूती खडसे राहणार गोत्र तालुके अकोले यास नोटीस देणार विठोबा व० पुंनाजी बदरखे राहाणार अंदुरा तालुके बाळापूर नोटिशीनें असें कळवितोकी तुमची मुलगी नामे तानी हिजशी माझें लग्न होऊन अदमासे अकरा बारा वर्षें होत आलीं. या बेळात आमच्या तुमच्या चाली प्रमाणें सासर माहेर जाहले गेल्या दिपवाळींत तुह्मी तिजला दिपवाळी करिता घेऊन जातो व दिपवाळी जाहाल्यावर बिदा करितो ह्मणून सांगून घेऊन गेला त्यास आज पावेतो तुह्मीं तिजला पोंचती केली नाहींत. व तिजला बोलावणे करिता- आमचे मेव्हणे नामें लक्ष्मण व० चाहादाजी राहाणार अंदुरे यास व आह्मी स्वतः चारपाच वेळा आलों तुम्ही लाऊन देतो ह्मणून कोरडें सांगता परंतु पाठवीत नाहीं याजवरून अपल्यास ह्या नोटिशीनें असें कळविलें जाते कीं नोटीस पावल्या पासून ८ दिवसांत माझी बायको व तिजला तुह्मी माहेरी नेताना जे सोन्या चांदीचे जिनस व नितांवर रुपये ९०चा दागीं चांदीचे कंपरवाळी भार १६ तोळे, गुंढाळ्या भार वीस, पाटल्या चारभार हसळी नउभार अरशी तिनभार, सोन्याचे दागीने बाळ्य मासे साहा, टीकर मासे४, नथ मासे तिन येणें प्रमाणें सर्व जिनस सुद्धा याशे कायकोसह नोटीस पावल्या पासून ८ आठ दिवसांत अंदुऱ्यास पोंचती करावी न केल्यास तुम वेवर सदरील सर्व जिनसा बद्दल व बायको ताब्यात घेण्या बद्दल रिती प्रमाणें कम चालवून सर्व निकाल होई पर्यंत व ह्या नोटिसीचा खर्चं सुद्धा सर्व खर्च भरून घेतला जाईल. म्हणून दिली नोटीस तारीख ३१।१।९१ इ०

( सही )

विठु वल्लद पुंनाजी बादरख
राहणार अंदुरे ता० बाळापूर जि० आकोले
दस्तुर खुद्द.

---

### नोटीस

चिरंजीव राजश्री गणेश मोरेश्वर देशपांडे प्रगणें पिंपळगावराजा यासी नारायण पांडुरंग देशपांडे प्रगणें पिंपळगांवराजा तालुके मलकापूर याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची व आमची समाईक शेती खालीं लिहिलेल्या गांवीं आहे ति.

मौजे नारखेड मौजे नीपान मौजे काळबाई मौजे भालेगांव मौजे अपसरी मौजे कुंबेफळ कसबे पिंपळगांवराजा. सदर्हू गांवीं जें जें नंबर तुमचे अथवा माझे नांवें आहेत त्याची वांटणी निमेनिमे ही नोटीस पावल्यापासून एक महिन्याचे आंत करून आपसातला तंटा मिटवून टाकावा नाहींतर सदर्हु जमीन वाटून घेण्याकरितां रीती प्रमाणें दिवाणींत दावा करणें भाग पडेल. व त्याचा खर्च तुह्मांस द्यावा लागेल.

सन १२९९ फसली सालचे नारखेड येथील समाईक जमिनीचे आपण रुपये १०० घेतले त्यावर निमे हिसा रुपये ५० माझे मला दिले नाहींत ते ही नोटीस पावतांच आठ दिवसाचे आंत द्यावे नाहींतर या नोटिसिचे अधारें दिवाणी मार्फत रुपये घेण्यात येतील. व ह्या बद्दल खर्च आपल्यास द्यावा लागेल.

हल्लीं तुम्ही आपले जुनें हवेलीचे उत्तरेस तुम्ही खाजगी जागेवर नवीन इमारत बांधण्याचे काम सुरुकेलें आहे त्या जागेचा पुरातन वापर दक्षीणे कडचा असून तुम्ही पूर्वेकडे ठेऊं इछिता परंतु त्या जागेचे पूर्वेकडे लागूनच आपला सामाईक कोठा आहे तर कोठ्यातील निमे अमचे हिशाची जागा टाकून बाकीचे तुमचे हिशाचे जागेत दरवाजा पाडला असतां माझी हरकत नाहीं परंतु माझी हिशाची जागा सोडून देता आपला दरवाजा कराल तर त्या बद्दल योग्य तजवीज केली जाईल.

सदरहू नोटिशाचा जबाब नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत द्यावा कळावें तारिख २६-१-९१ इ०

( सही )

नारायण पांडुरंग देशपांडे
दस्तुर खुद्द.

---

वर्तमानसार,

येथें जो वर्गणी जमा करण्यांत आली होती ती व्यांकेंत ठेवून त्यांच्या व्याजांत दरसाल मुसलमाना करितां एक व हिंदु मुलां करितां एक अशी दोन बक्षिसें आसाहेबांच्या नांवानें ठेविण्यांत आलीं हा मागील आठवडा येथें फार गडबडीचा व उत्साहाचा गेला. व अल्लिझान साहेब येथील सर्व व्यवस्था पाहून बरेच अंशीं खूष झाले असावे अशी आमची खात्री आहे.


## The Berar Samachar

MONDAY, FEBRUARY, 2, 1891.


In its session at Calcutta the National Congress had some novel questions before it. One of them was direct reference to its meetings since Government Servants were under absolute prohibition from attending as visitors the meetings of political or quasi political assemblies. Accordingly the Lieutenant Governor of Calcutta declined with thanks the invitation of the Reception Committee in his own behalf as well as in the behalf of his family-members. In one of its resolutions the last Congress had requested the Viceroy to explain and define the precise meaning of the official orders so that the public at large may know the attitude that it behoves Government servants to assume in regard to political meetings. The Viceroy's reply is candid, straightforward and liberal in its spirit. "The absolute prohibition" has been explained as having reference to the *participation* of officials in the proceedings. We would like to request the Government Servants to make a note of the word 'participation.' The Government is frank and open to declare that its orders of the year 1890 were not issued in a spirit, in any way, hostile to the prosperity of the National Congress. The institution Government regards as one of those which are perfectly legitimate in themselves and which private persons are free to promote the welfare of. Lord Landsdown's remark has a philosophical aspect when he says that ' the Government of India recognises that the Congress movement is regarded as representing in India what in Europe would be called the more advanced Liberal party as distinguished from the great body of Conservative opinion which exists side by side with it. They desire themselves to maintain an attitude of neutrality in their relations with both parties so long as these act strictly within constitutional limits." Mr. Hume observes in his letter to the Madras Times that this candid and characteristically British declaration in favour of the freedom of opinion and action in political matters (like Lord Metcalf's in favour of the freedom of the press) encourages us to indulge a hope of, one day, bridging the gulf that has been widening between the European official classes and the Indian public. He has asked the congressionists to join hands and make friends with the officials since much of the original bitterness will, it is hoped disappear with this unambiguous and unmistakable explanation of the orders. It is also settled that the retired pensioners, have all the rights of private citizens.

It is meet that we should now see how far this explanation of the orders will be attended with its desirable practical effects in Berar. The Akola District seemed to have been singular in making great fuss about the old circular. It is an open secret that the uneasiness caused by the Circular was most keenly felt. Mr. H. S. Nicholetts will do us the favour of studying the Viceroy's reply. We do not intend to cast any slur upon him when we single him out in our mention. We have heard people talk well and ill when he persistently desired all his subdordinates to act upto to the orders honestly and to the very letter— His policy would have been more acceptable if he had seen how far his strict measures would attain the desired end. It was advisable for him to settle through reference to higher authorities whether Deshmukhs Deshpandis and others came within the definition of Government servants before he could ask them to obey his orders, We are aware of many of his good qualities though we are forced to say that they are not without some drawbacks. His goodness often takes through enthusiasm and intolerance so high a pitch as to lean to the side of an agreeable weakness in his nature and it is no indiscreet and inopportune praise to say that he is duly proud of his connections with this district. What we want from him at present, is that he should so fashion his actions as to be in conformity with the concluding portion of the Viceroy's reply— "All Government shall abstain from active participation in political or quasi political movements of all kinds."

Calcutta, Janury 20th, 1891.

To

The Editor of Berar Samachar.

Akola.

Sir,

I have received many letters enquiring what has been this result of our late President, Mr. Pheroz Shah Metha's reference to His Excellency the Viceroy, on the subject of certain orders of the Bengal Government to which the Congress took objection.

I am now in a position to publish His Excellency's final orders on this subject. which I hereto annex.

I am quite sure that all thinking men will feel deeply grateful to H. E. for the kindly, straight forward and liberal spirit in which he has dealt with the entire question of the attitude which it behoves Government servants to assume in regard to the Congress, and all other political and quasi-political mvoements working, like the Congress, by open constitutional means. If now officials throughout the country will only loyally abide by His Excellency's explicit instructions—and knowing the service as I do feel confident that the great majoity will do this—much of the bitterness that has hitherto charcterized the struggle for reform will disappear, and it even seems possible that within a few years the time may arrive for another step, and the Government instead of remaining neutral as now, may find itself in a position to co-operate heartily with both our liberal and conservative parties in their efforts for the common good.

Under any circumstances this candid and characteristcally British declaration in favour of freedom of opinion and action in political matters in the cases of all private persons ( no less important in its way than Lord Metcalfe's in favour of freedom of the press ) ought to go far to bridge the gulf which for years, unhappily, has been widening between the European official classes and the Indian public.

Surely, now that the Viceroy has, himself, formally decided that the Congress is a perfectly legitimate movement which every private person is free to join, and that Government Officials are debarred from putting any pressure, upon any one, to induce them to abstain from taking part in it, the best plan for both parties, the Officials and the native community, would be to shake hands and make friends, and, while tolerant of differences of opinion, and regarding the labours of the other party in the most charitable and sympathetic light, each on its own lines and according to its own opportunities, do its utmost to promote the welfare of India and her people.

Yours truly,

A. O. Hume,

General Secretary,

Indian National Congress.

---

Government House,

Calcutta,

January 19th, 1891.

Dear Sir,

With reference to the communications which have recently taken place, first, between Mr. Metha and the Viceroy, and, after Mr. Metha's departure from Calcutta, between yourself and His Excellency, upon the subject of the letter received by the Secretary of the Reception Committee from the Private Secretary of the Lieutenant Governor of Bengal, in reference to the attendance of Government servants at meetings of the Congress, I am authorized by His Excellency to say that Mr. Lyon's letter of Decembr 26th, in which it was stated that "the orders of the Government of India definitely prohibit the presence of Government officials at such meetings, " and the Circular in which that letter was communicated to the heads of departments under the Bengal Government, were issued under a misapprehension as to the purport of the orders of the Government of India. It was at once recognised both by the Government of Bengal, of its own motion, and by the Government of India, that the letter in question went beyond those orders. and an amended Circular, in which it was pointed out that the expression "absolute prohibition" had reference only to the participation of Government officials in the proceedings of a political meeting, was subsequently issued by the Bengal Government to the heads of departments. I enclose herewith a copy of the orders of the Government of India.

These orders, which arose out of a totally different matter, had no special reference to the Congress movement, and were certainly not framed in a spirit of hostility to it. The publications of some of the supporters of the Congress have, in the opinion of the Government of India, been open to serious question; but, apart from this, the movement is regarded as one of those which, in the words of the Circular, are "perfectly legitimate in themselves, and which private persons are free to promote," but from participation in which Government officials are, for the reasons specified in the orders, necessarily debarred.

The Government of India recognise that the Congress movement is regarded as representing in India what in Europe would be called the more advanced Liberal party, as distinguished from the great body of conservative opinion which exists side by side with it. They desire themselves to maintain an attitude of neutrality in their relations with both parties, so long as these act strictly within constitutional limits.

They intend that all Government servants shall preserve a similar attitude of neutrality, and shall abstain from active participation in political or *quasi* political movements of all kinds; and also from putting pressure upon others in order to induce them to take part, or not to take part, in any movement which is legitimate in itself. It was with the above objects that the orders of March 1890 were issued.

In reference to a specific question which you addressed to His Excellency, I am to say that the orders apply only to those who are actually, at the time being, Government Servants, but not to pensioners and others who have quitted the service of the Government for food.

Yours truly,

J. C. Ardagh, Colonel.

*Private Secretary to the Viceroy*

To

A. O. Hume, Esq., C. B.,

&c. &c.

---

### COMMUNICATED.

Sir Andrew Scobble's bill is in its progress through the Committee of the Legislative members. The Committee is to report on the matter within the period of five weeks. There are ninety nine chances out of a hundred for the bill to pass and shortly to become the law of the land. The proposed measure is good in itself but it is rightly apprehended that it will as a law be a formidable machine to work out abundance of abuse and oppression.

The hands of the opposition-party are being strengthened by memorials that are being sent, heaps over heaps, to the Govt. by the monstrous meetings that are being held at different towns and cities to protest against the legislation.

While on the other hand the Hon'ble Mr. Justice Telang has publicly discussed the religious aspect of Sir A. Scobble's bill. Before his invincible and perfectly logical argument Sir R. C. Mitter's religious objections fall to the ground. The legislator's function is to make the laws as he did in regard to the Hindu Wills Act,' the 'Hindu Heir's Relief Act &c, and the highest legislature may act upon its own convictions inspite of Raghunandan's final authority. Raghunandan whom Sir R. C. Mittra has brought in as a conclusive authority on religious matters, is not universally obeyed in his precepts for the consummation of marriage, and besides his rule may be understood as permissive on the sanction of the Dharma Sindhu, the Bhagvat and the Smriti by Parashara— taking prohibition in the sense that the husband & wife shall not meet at any other time. Even if Raghunandana orders consummation of marriage after the appearance of a particular physical phenomenon the sanction in disobedience of the rule is not hard and exacting. Half a *Krichcha* or a thousand *Pranayam* may be exacted as a pename to wipe off the sin in the case of an orthodox Hindu. Mr. Telang further observes that it is for the well-being of child-wives that this breach of a religious law is recommended and besides it is to be the command of the sovereign who must be implicitly obeyed according to the Hindu scriptures. In holding with Mr. Nulkar he says in strong terms that the din of controversy is misguiding and that 'if in such a case where the claims of humanity are implicated the British Govt. is to hold its hand and put forward a plea of *non possumus* it will write itself down as unworthy of its best traditions and will lay down a principle of action that if logically carried out will destroy the possibility of any solid good resulting from its presence in India.' Dr. R. G. Bhandarkar is another supporter of the bill. His scholarly and almost exhaustive article shedding a full light on this question, is published in the last number of the Sudharak. It commands respect even from the *Shastris* and Pandits. Though his attitude in social matters is of a despairing nature he comes before the public with so strong

(See supplement.)

—लंडन शहरी वर्तमानपत्र कर्त्यांचा एक फंड आहे. तो हल्लीं २६००० रुपये जमला आहे. त्याला ७०० वर्तमानपत्र वाल्यानी वर्गणी दिली आहे. या फंडाचा उद्देश आपला एखादा बंधु अडचणीत सांपडला असतां त्यास मदत करावी असा आहे. फार चांगलें काम! असें आमच्या इकडे कधीं होईल?

—कोल्हापूर येथील सोन्याच्या खाणीतून ६२०००० किंमतीचे सोनें लंडनास जाण्या करितां मुंबई मार्गीनें गेल्या आठवड्यांत रवाना झालें.

—विलक्षण जनावर —मुंबईस वार्तीहराच हपिसांत त्याच्या एका स्नेहानें एक लहानसे काठेवाडी जनावर पाठवून दिलें आहे. त्याच्या सर्वांगावर फणसा सारखे कांटे असून मनुष्याची चाहूल ऐकल्या बरोबर, तें सर्वांग गुंडाळून घेऊन फणसा सारखें अचल पडून राहतें. त्याचा आहार विहार सर्व रात्रींच होतो. दिवसा निमूट पडून असते. विलक्षण प्राणी आहे! या प्रांतांत मुळींच दिसत नाहीं हा हेज हॉग नामक इंग्रजी प्राणी असाव असें कित्येक ह्मणतात, परंतु हा काठेवाडांत सांपडतो. न्ययसिंदु

—मुंबईला येणारी आगबोट कारी ही समुद्रांत आपटून फुटली सर्व माणसें व काहीं सामान मात्र काढण्यांत आलें. सिलोन येथील बराच चहा काढण्यांत आला.

—युरोपांत धुकें पडून अतिशय त्रास झाल्याचें ता. १९च्या तारेवरून समजतें. युरोपांतील कांहीं नद्या व कान्मटन्स व जिनिव्हा ही सरोवरें अगदी थिजून गेलीं आहेत.

—आफ्रिकेसंबंधी इंग्लंड व पोर्टुगाल याजमध्यें नवीन पत्रव्यवहार पुन्हः सुरू झाला आहे.

—मध्यप्रांतांत एक हिऱ्याची खाण सांपडली आहे असें समजते. सु. प.

डांकेच्या गाडीत चोरी— वजिराबाद ( वायव्य प्रांत ) स्टेशनावर गेल्या रविवारी डाकेची आगगाडी आली, त्यांतील २ पार्सलें नाहीशीं झाली आरोपीचा पत्ता नाहीं

हैद्राबाद २२जाने०:- हिंदुस्थानचे कमांडर इनचीफ सरफ्रेडरीक राबर्ड हे ९फेब्रु० येथें येतील त्यावेळीं निजामा कडून त्याला मोठी मेजवानी झडणार आहे. स्वारीचा मुक्काम एक आठवडा होईल. तिजोरीवर हल्ला मारल्याचे खटल्यास जन्मठेपवास झालेल्या शिक्षेतून त्यांस हाय कोर्टानें मुक्त केलें. पण दुसऱ्या एका खटल्या वरून त्यस पुना पकडले आहे.

झारांची खरेदी— रशीयाचे राजपुत्र दिल्ली येथें गेले होते त्यावेळी त्यांणीं २० हजार रु०च्या कलाकौशल्याच्या जिनसा येथें खरेदी केल्या असें समजतें.

कलकत्यात गुदस्तांच्या इनफ्ल्यु एंझा तापानें प्रवेश केला आहे.

बंडावा— चिली ( अमेरिका ) देशांत बंडखोरांनीं मोठा दंगा माजविला असून तेथील सरकारी फौजेतील कांहीं लोक सुद्धां त्यांला मिळाले आहेत. व त्यांणीं दारूण संग्रामाच्या तयाऱ्या चालविल्या आहेत. इंग्लिश, फ्रेंच आणि अमेरिकन सरकारची लढाऊ जाहजें आप आपल्या हितरक्षणासाठीं तिकडे मेलं आहेत असें लंडनच्या तारा सांगतात.

बंगाल नागपूर रेल्वे ता० १२ फेब्रु०रोजीबहुधा सुरू होणार.

सर्पसंघ— पु० वै०चा भिंगार येथील बातमीदार लिहितो कीं, सहल करीत करीत बादशहाणी चांदबिबीचा महाल पहाण्यास मे लों. तेथें सडके पासून कांहीं अंतरावर सुमारे २-३शे सर्प एकामागें एक चालले होते. आह्मी व दुसऱ्या पुष्कळ मार्गस्थांनीं पाहिले. सर्पांची परेड फारेष्टाच्या मानलेल्या जगलांत गेली त्यांणीं मार्गक्रमणाचें वेळी अजमासें एक मैल जा।। व्यापली होती. इजा वगैरे न करितां ते सर्व फरारी झाले. हो मौज एक तास पाविता द्रष्टीस पडली! स. शो.

इंग्लंडांतील कांहीं वैद्यकांनीं असें प्रसिद्ध केलें आहे कीं, चालूं शतकामध्येंच ज्या वनस्पती पासून मनुष्याचें आयुष्य सरासरीनें दोनशे वर्षे पर्यंत वाढेल अशा टॉनिक ( वनस्पतीचा ) शोध लागेल.

कम्बरलंड परगण्यांतील लांगटाऊन येथें एका गाईच्या पोटात एक पिशवी सांपडली त्यांत सोनें, रुपें, तांबें व कांहीं तिकिटें व एक रेल्वेचें रिटर्न टिकिट, हीं सर्वांच्या संबंध सांपडली. ज० मि०

राष्ट्रीय सभेसंबधानें हिंदुस्थान सरकारानें आपले विचार नुकतेच प्रसिद्ध केले आहेत. तेथील लेफ.—गव्हरनरांनीं राष्ट्रीय सभेस जे उत्तर पाठविलें होते त्या बद्दल मि. ह्युम याणी सरकारास एक पत्र लिहिले होते त्यावर वरील विचाराचे हिंदुस्थानसरकाराकडून पत्र प्रसिद्ध झालें आहे. या पत्राचा थोडक्यांत आशय व असा आहे कीं सरकारी कामदारानी राष्ट्रीय सभा किंवा इतर राजकीय सभांच्या कामांत आपलें आंग दाखवूं नये. युरोपांत ज्या प्रमाणें लिबरल व कान्सरव्हेटिव्ह पक्ष आहेत या साठीं अशा वेळीं सरकारानें तिऱ्हाइतपणाच दाखविला पाहिजे. "अगदी बंदी" याचा अर्थ लेफ गव्हरनरानी जसा ध्यावयास पाहिजे तसा घेतला नाहीं ह्मणून त्यांची चूक झाली आहे. हा ठराव जे सरकारच्या चाकरींत आज आहेत त्यासच लागू आहे. पेन्शनर किंवा इतर लोकांस तो लागू नाहीं. या व्हाइसराय साहेबांच्या विचारावरून राष्ट्रीय सभेत सरकारी कामदारांनीं जावें असें होतें यासाठीं यापुढें तरी रुपेरी शृंखला अडकवून घेतलेल्या बड्या कामदारांस या सभेस येण्यास कोणत्याही प्रकारची आड काठी नाहीं असें होतें. पूर्वीच्या ठरावाचा अशा रीतीनें स्पष्टार्थ करून दाखविण्यांत व्हाईसरायानी शहाणपणा केला यांत कांहीं संशय नाहीं.

विलायतचें पार्लमेंट गेल्या गुरुवारीं उघडेल. हें उघडल्या नंतर हिंदुस्थानचे स्टेटसेक्रेटरी लार्ड क्रास यांणी अशी नोटीस दिली कीं, हिंदुस्थानचे कौन्सिल बिल सोमवारीं ह्मउद्या पुढें आणण्यात येईल. या बिलासंबंधानें विशेष रीतीनें खटपट करणारे मि. ब्राडला हें आजारी आहेत आणि हे लार्ड क्रास यांस माहीत असतां याच वेळीं तें बिल पुढें आणण्यांत स्टेटसेक्रेटरीचा कांहीं तरी हेतु असावा असा लोकांचा सहज तर्क होईल.

पार्लमेंट मेंबर मि. स्मिथ यांचें चिरंजीव हिंदुस्थांत येणार आहेत.

फाशीची शिक्षा बंद करण्यांत यावी अशा प्रकारची एक सूचना लवकर पार्लमेंट पुढें येणार आहे असें ह्मणतात.

गानवादनकलाप्रविणाची सभाः— सर्व हिंदुस्थानातील गानवादनकलाप्रविणांची सभा येत्या मे महिन्यांत पुण्यास भरणार असून, तीकरितां होणाऱ्या खर्चास मदत करण्यांसाठी राजेरजवाडे व सरदार यांस विनंति करण्यांत येणार असल्याचे समजतें. या सभेस गानवादनपटु अशा पुरुषांसच पाचारण होणार आहे असें नाहीं तर त्या गुणांत कुशल अशा स्त्रियांसही पाचारण होईल खरें असेल तर हा समाज मोठा प्रेक्षणीय होईल यांत संशय नाहीं.

पंजाब नादारी मुकदमा नंबर ३७

सन १८९०

नमुना (जी)

विद्यमान नादारी कोर्टाचे जडज्य जिल्हे अकोले

सर्वत्र लोकांस नोटीस देण्यांत येतें कीं सेखमहेबु वल्लद सेख ईस्माल मुसलमान रा- तेल्हारे तालुक अकोट हा नादार आहे असा आज तारीख २४ माहे ज्यानेवारी सन १८९१ इ० रोजीं ठराव झाला आहे आणि तारीख १४ माहे फेब्रुवारी सन १८९१ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपल्या तर्फेचा आसाईनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमला आहे.

नादाराच्या सुटके संबंधी ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्या बद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिसींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आणि त्याज बद्दल ज्या साक्षीस समन्सें करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांची नांवें नमूद करावी. ही नोटीस जमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तिन दिवस तरी पूर्वी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेवल्या आहेत.

ज्या नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरें असल्या बद्दल प्रतिज्ञा लेख लिहून त्यावर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांनीं आठआण्याचे छांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडीशिपल ऑफीसरा पुढें तिच्या खरेपणा विषयीं शपत लिहावी. आणि ती यादी टपाला कडून कोर्टास पाठवावी. म्हणजे ते दावे रजिष्टरी दाखल होतील. कळाव. ता० २६–१–९१

Maniksha Rattanji.
नादारी कोर्टाचे जज्ज
जि० अकोलें


## जाहिरात

एलिचपूर येथें होणारा सर्व प्रकारचा माल कोणास पाहिजे असल्यास आह्मांस कळवावें माफक कमिशन घेऊन पाठवीत जाऊं. विशेष माहिती करितां टिकीट पाठवा

जी. डी. कविटकर
मर्चंट आणि कमिशन एजंट
शहर एलिचपूर.

वामन गोपाळ यांचा अनेक औषध मिश्रित

## सार्सापरिला

हा सार्सापरिला अनेक रोगांवर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणाकारी आहे उपदंशजन्य विकार, ( गरमी ) व तिजपासून होणारे पक्षघातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शरिरावर काळे डाग पडणें. संधी दुखणें कळा लागणें, सूज येणें वगैरे सर्व संधिगत वायुंवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग, जसें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज, गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे. सारांश उपदंशजन्यापासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दूषित झाले असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखे दुसरे औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १। रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या

## गोळ्या.

यापासून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्राव यानें झालेली शरिराची क्षिणता जाऊन अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुसकत्व इत्यादि विकार ताबडतोब नाहींसें होतात. यानें सर्व शरिरांतील चैतन्याचा व वृद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकेंद्र ( मेंदु ) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनःरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुची शक्ति वढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा

## कलप

हा कलप प्रत्येक पंधरादिवसांनीं एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन. त्यास तेजी येते. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे याचे दवाखान्यांत वरील सर्व औषधे मिळतील.

आमचा पत्ता—नव्या ठाकुरद्वारा समोर


☞ हें पत्र अकोला येथें क० वा० खंडराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार छापखाण्यांत नारायण खंडेराव यानीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०।३
सहामाही " ३ " ०।८
सालअखेर " ७ " १।८
किरकोळ अंकास………………०।४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ………०।१

Rs.
per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 " 1Rs. 8 as
Six monthly…………3 " 8 as
Single copy………………………4a

Advertisemehts
Below 10 lines…2Rs
per line over10…4 as
Repetition per line3s

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXV AKOLA MONDAY 9 FEBRUARY 1891 NO 6
वर्ष २५ अकोला सोमवार तारीख ९ माहे फब्रूवारी सन १८९१ इ० अंक ६

पंजाब नादारी मुकदमा नंबर ३
सन १८९१
नमुना ( जी )

विद्यमान नादारी कोर्टीचे जडज्य जिल्हे अकोले.

सर्वत्र लोकांस नोटीस देण्यांत येते कीं कुकाजी वल्लद हरी माली रहणार शेगांव तालुके खामगांव हा नादार आहे असा आज तारीख १६ माहे १ सन १८९१ इसवी रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख २१ माहे फेब्रुवारी सन १८९१ हा दिवस नांदाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपल्या तर्फेचा असाईनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्या बद्दल आठ आण्याच्या ष्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी या नोटिशींत ज्या अधार वरून तक्रार सांगणे असेल ते आणि त्याजबद्दल ज्या साक्षीस समन्सें करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांची नांवे नमुद करावीं. ही नोटीस नजण्या करितां नेमलल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पुर्वी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेवल्या आहेत.

ज्या नादारावर दावें नोंदविणें असतील त्यानीं आठ आण्याच्या ष्टांपकागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकिकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञालेख लिहून त्याजवर अर्ज दारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्याचें ष्टांपावर दाव्याची हकिकत लिहून एखाद्या जुडिसियल ऑफीसरा पुढें तिच्या खरें पणा विषयीं शपथ लिहावी. आणि ती यादी टपाला कडून कोर्टास पाठवावी. म्हणजे ते दावें रजिस्टरी दाखल होतील.


Maniksha Rattanji.
नादारी कोर्टीचे जज्ज
जि० अकोले.

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस जोहार होण्या करितां प्रसिद्ध करण्यात येतें कीं ता० २५।१०।८७ इसवी रोजीं नागो वल्लद गंभीरजी वंजारी राहणार मौजे पुंड हल्लीं वस्ती बांबुरडे तालुके अकोट यास कुळमुख्त्यार पत्र दिलें होतें. सदरहु इसमानें माझे विरुद्ध बरीच लबाडीची कृत्ये केली आहेत या साठीं त्याचे मुखत्यार पत्र पुर्वीच रद्द केलेले असून हल्लींहा ह्या जाहिर खबरीनें मुख्त्यार पत्र रद्द केलेल्या बद्दल कळविलें आहे. तरी नागो वल्लद गंभीर याणें माझे संबंधाचा कोणतेच प्रकारचा वेव्हार कोणाशी केल्यास तो रद्द समजून त्या बद्दल मी कोणते ही प्रकारें जबाबदार होणार नाहीं कळावें ता. ४ माहे फेब्रुवारी सन १८९१ इ०

( सही )
भंडारगीर गुरु सोमवारगीर गोसावी
राहणार पुंड तालुके अकोट.
दस्तर खुद.

## सचित्रक्याटलाग



अ[१]. डी. कानिटकर.
आणि कंपनी
मुंबई गिरगांव ह्याचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्धा आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल.

## जाहिरात.

एलिचपूर येथें होणारा सर्व प्रकारचा माल कोणास पाहिजे असल्यास आम्हांस कळवावें माफक कमिशन घेऊन पाठवीत जाऊं. विशेष माहिती करितां टिकीट पाठवा.

जी. डी. कावेटकर
मर्चंड आणि कमिशन एजंट
शहर एलिचपूर.

वऱ्हाडसमाचार

मिती पौष वद्य ३० शके १८१२

गेल्याच्या मागिल मंगळवारीं सालावाद प्रमाणें मुंबई युनिव्हरसिटीची 'कानव्होकेशन' सभा भरली होती त्या वेळीं नामदार मि. जस्टिस बर्डवुड हायकोर्ट जज्ज व युनिव्हरसिटीचे व्हाइस चान्सलेर हे अध्यक्षस्थानीं होते. या सालीं एकंदर १८४ ग्राजुएटांस मुंबई युनिव्हरसिटी कडून निरनिराळ्या शाखा मधील पदव्या देण्यांत आल्या. पदवीदानाचा समारंभ आटोपल्यावर अध्यक्षांचें भाषण थोडक्यांत झालें. त्यांत त्यांनीं मुख्यत्वें करून मुंबई युनिव्हरसिटीचा संक्षिप्त इतिहास सांगून तिचा भावी उत्कर्ष कोणत्या दिशेनें होईल याचें संदिग्ध रीत्या दिग्दर्शन केलें. मुंबईकडे मिसेस पिची फिप्सन नांवाच्या बाई डाक्टरणीच्या धंद्या वरून प्रसिद्ध आहेत त्यांस युनिव्हरसिटीचे यंदा 'फेलो' (मंत्री मंडळींचे सभासद) नेमण्यांत आलें आहे. स्त्रियांस हा अधिकार देण्याचा युनिव्हरसिटीनें पहिला मान वरील अति योग्य व अनुभविक बाईस दिला आहे ही आनंदाची गोष्ट होय. ह्या बाई नेटिव स्त्रिया विषयीं फार कळवळा दाखवितात आणि यांचा आपल्या स्त्रिया संबंधानें शास्त्रीय आनुभव असा आहे कीं आपल्या मधील विवाहित स्त्री पुरुषांचा गर्भाधानविधि जितका उशिरानें होईल तितका पाहिजे आहे. 'आर्टस' ग्राखेचा तीन वर्षांचा शिक्षणक्रम वाढवून तो चार वर्षांचा केला तरी परीक्षा पूर्वी प्रमाणें तीनच कायम केल्या आहेत. नवीन शिक्षणक्रमांतील पाहिले वर्षांचे अध्ययनाची इयत्ता व पुस्तकें नियमित झाल्या प्रमाणें नवीन चार वर्षांच्या शिक्षणक्रमास सुरुवात चालूं साला पासून करण्यांत आली आहे. पुढील अभ्यास अद्याप नेमस्त झाले नाहींत तरी या वर्षांत ही पद्धत पूर्णपणें सर्व लोकांसमोर येईल व तिची पूर्ण अंमलबजावणी होण्यास आणखी दोन वर्षें लागतील म्हणजे यंदा नवीन क्रमाप्रमाणें शिकलेले विद्यार्थी अखेरच्या बी. ए. परीक्षे साठीं तयार होतील. एल. एल. बी. च्या अध्ययन क्रमांतही बराच फरक केला आहे. तो हा कीं पाहिली एल. एल. बी. या नांवाची नवीन परीक्षा घेण्याचें ठरून तो चालूं वर्षीं नव्यानें सुरू होणार. आणखी पुढील कायद्याच्या राहिलेल्या दोन वर्षांच्या अभ्यासाच्या संबंधानें प्रस्तुतच्या व्याख्यान क्रमांत पुष्कळ फरक व्हावयाचा आहे. म्याट्रिक्युलेशन परीक्षा अजीबात काढून टाकण्या विषयीं पुष्कळांची सूचना आहे त्या विषयीं ही विचार चालला आहे. ही परीक्षा बंद झाल्यास तिच्या ऐवजीं निरनिराळ्या पाठशाळांतून प्रवेश परीक्षा होतील. वर्डरे साहेब विलायतेस गेल्यामुळें युनिव्हरसिटीची मोठी नुकसानी झाली आहे कांकीं त्यांच्या सारखे शिक्षण संबंधाच्या गोष्टींत वाकबगार व प्रवीण गृहस्थ फार विरळा सांपडतील असें व्हाईस चान्सेलरांनीं भाषणाच्या आरंभीं उपोद्घातांत बोलून दाखविलें. प्रस्तुत युनिव्हरसिटीकडे फक्त परीक्षा घेण्याचें काम आहे त्या शिवाय शिक्षणाचें ही काम युनिव्हरसिटीवरच सोंपविलें पाहिजे परंतु सध्याचे स्थितीवरून ती समर्थ व सधन नाहीं ही दिलगिरीची गोष्ट होय. मद्रास व कलकत्ता येथील युनिव्हरसिटीस सरकारच्या मदतीवर फार करून अवलंबून रहावें लागत नाहीं त्या प्रमाणें मुंबईसही व्यवस्था होत गेली पाहिजे आणि त्यासाठीं शिक्षणास खर्च फार पडल्या मुळें फीचे दर वाढले पाहिजे. तरी लोकांनीं या गोष्टीस तयार असावें असें अध्यक्षांनीं मोठ्या खुबीनें प्रदर्शित केलें. युनिव्हरसिटींतील मुख्य मुख्य अधिकाऱ्यांची नेमणूक सरकारांतून करण्याची पद्धत चालत आली आहे त्या ऐवजीं लोका कडून निवड होण्याची रीत सुरू होणें अगत्याचें आहे असा ही एक अध्यक्षांच्या भाषणांतील फार मुद्याचा विषय होता.

राष्ट्रीय सभेचे जनरल सेक्रेटरी मि. ए. ओ. ह्यूम साहेब यांनीं वर्तमान पत्रांतून एक पत्र प्रसिद्ध केलें आहे त्याचा आशय असा आहे कीं राष्ट्रीय सभेच्या मंडपांत सामाजिक सभेस जमण्यास परवानगी देऊं नये असा पुण्या कडील मंडळीनें विशेषें करून आक्षेप घेतला होता त्या बद्दल राष्ट्रीय सभेच्या सभासदांचा सल्ला विचारतां तो आक्षेप चांगला व सर्वमान्य नसून अगदीं क्षुद्र दृष्टीचा आहे. राष्ट्रीय सभा भरण्या पूर्वीं आमच्या अभिप्राया साठीं वरील आक्षेपाचें पत्रक आम्हांकडे आलें होतें त्या वेळींही आम्ही आपलें विरुद्ध मत आशाच प्रकारें प्रदर्शित केलें होतें राष्ट्रीय सभा व सामाजिक सभा एकं स्थळीं भरल्यानें आम्हांस कांहीं एक बाध वाटत नव्हता व नाहीं आणि त्या साठीं आम्ही पुन्हां आणखी दुबार सूचना करितों कीं सामाजिक सभेच्या विरूद्ध पक्षा कडील गृहस्थांनीं वरील ह्यूम साहेबांच्या म्हणण्याचें चांगलें मनन करावें. विलायतेस राष्ट्रीय सभेची 'ब्रिटीश एजन्सी' म्हणून मि. डिग्बी साहेबांच्या अध्यक्षतेखालीं एक थोर गृहस्थांची मंडळी आहे. त्या मंडळीची खुद्द मि. डिग्बी साहेबांच्या 'इंडियन पोलिटिकल एजन्सी' शी पुष्कळ लोक घोटाळा करितात तो अगदीं चुकीचा आहे. दोन्ही संस्था निराळ्या आहेत. आणि संबंध काय तो एवढाच कीं पोलिटिकल एजन्सीचे मालक मि. डिग्बी हे पहिल्या मंडळीचे अध्यक्ष आहेत. उभय संस्थास हिंदुस्थानांतून द्रव्यद्वारा मदत मिळणें फार आगत्याचें आहे तरी पोलिटिकल एजन्सीचा मुख्य उद्देश नेटिव राजे रजवाड्या संबंधानें पार्लमेंटांत योग्य चौकशी होण्या विषयीं आहे. या राजेरजवाड्या मंडळींचा छळ कमी करण्या कडे व त्याचा राज्यकारभार सुयंत्रित चालण्याकडे पोलिटिकल एजन्सीचा विशेष कटाक्ष आहे परंतु खेदाची गोष्ट अशी कीं त्या एजन्सीचा राजे रजवाडे योग्य उपयोग करून घेत नाहींत.

मि. ह्यूम व मि. यूल या उभय गृहस्थांनीं उदार मनानें राष्ट्रीय सभेसाठीं प्रत्येकीं हजार हजार रुपये वर्गणी दिली आहे. मि. केन साहेबांनीं आपल्या सामर्थ्या प्रमाणें शंभर रुपये वरील सभेस दिले आहेत. राष्ट्रीय सभेस वर्गणी गोळा करण्या साठीं काय काय परिश्रम व मेहनत करावी लागते आणि शहाण्या शिकलेल्या लोकांकडूनही पैसे जमा करितांना किती विघ्नें व अडथळे येतात या विषयीं विचार केला म्हणजे वरील गृहस्थांची आमच्या कल्याणा साठीं सर्वेपरीनें कळकळ पाहून आमची आम्हांसच लाज वाटली पाहिजे. कर्तव्य स्मरून त्या प्रमाणें वर्तन ठेवण्यास शिकणें हाच पहिला धडा अद्याप शिकावयाचा आहे.

येत्या खानेसुमारीच्या समयीं गणती करितांना नवऱ्याचें नाव सांगण्या विषयीं बायकांवर कोठें मात्र सक्ती होऊं नये म्हणून म्हैसूर कडे खटपट चालली आहे तिकडे आपल्या प्रतांतील लोकांचे लक्ष पोंचणें जरू-

रीचें आहे. कलकत्या कडील क्षुद्र ज्ञातीतील लोकांनीं सरकारास विनंती केली होती कीं खानेसुमारीच्या कागदीं पत्रीं आमच्या जाती स चांडाळ सदरा खालीं लोटतात त्या सदराचा आम्हांस मोठा तिटकारा आहे व लोकांमध्येंही चांडाळ संज्ञेस फार गौणत्व देतात. त्या अर्थी आमचा समावेश शूद्रांतील एका निराळया प्रकारच्या ज्ञातींत व्हावा. त्यांच्या अर्जास मान मिळून सरकारांतून त्यांच्या म्हणण्या प्रमाणें व्यवस्था होण्या साठीं हुकूम सुटले आहेत हें ऐकून संतोष वाटतो.

---

हें निर्विवाद आहे कीं लोकांचें बहुमत कायद्यास प्रतिकूळ आहे. कायदा नको असें म्हणणारे गृहस्थ पुष्कळ आहेत इतकेंच नव्हे तर त्या मताच्या लोकांशीं कायदा पाहिजे म्हणणाऱ्यांची तुलना केल्यास जमीन अस्मानीचें अंतर दिसून येईल. कायदा मागणाऱ्या लोकांची संख्या सर्व राष्ट्राच्या मानानें फारच फार अल्प आहे. लोक मताची मातबरी लक्षांत आणिली म्हणजे प्रत्येकास प्रांजळपणें कबूल करावें लागेल कीं कायदा पसार होण्यास लोकांकडून क्षुद्र कुमक मिळणार आहे.

बंगाल्यांत शहरों शहरीं सभा भरून सरकारास अर्ज पाठविले जात आहेत कीं नेटिवांच्या सामाजिक गोष्टींत नवीन कायदा पसार करून हात न घालण्याची मेहेरबानी करावी. मद्रासेस सभावर सभा भरल्या आहेत व भरत आहेत त्या सर्वांची ओरड सरकारच्या कायद्या विरुद्ध आहे. उत्तर हिंदुस्थान, मध्यप्रांत, वऱ्हाड, पुणें, साताऱ्या खालील सर्व प्रांत, मुंबई व कोंकण, गुजराथ व काठेवाड कडील शहरों शहरीं कायदा नको म्हणणाऱ्या लोकांच्या जंगी सभा भरून लोक आपापले अभिप्राय गव्हरनर जनरल साहेबांस कळवीत आहेत कीं प्रस्तुत सामाजिक व्यवस्थेंत फरक करणाऱ्या संमतीच्या वयाचे बिलाचा दुसरा भाग अजिबात काढून टाकण्या साठीं सरकारनें नीट विचारानें तजवीज करावी. प्रत्यक्ष मुंबई नगरीचे गृहस्थ अशा प्रसंगीं कैलासवासी मंडलिकांची फार आठवण काढतात कां कीं त्यांच्या मरणानें नेटिवांच्या धर्माचा एक जंगी आधारस्तंभ नाहींसा झाल्या सारखें झालें आहे. काल रोजीं दोन प्रहरीं फार मोठी सभा भरून सरकारास कायदा करूं नये म्हणून अर्ज करण्याचा बहुमतानें ठराव होणार होता. हजारों लोक त्या सभेस लोटतील असा सर्वांचा तर्क आहे.

---

## हे प्रयत्न खरे.

इंग्लंडांतील डिगबे वेडरबर्न, व केन साहेब प्रभृति मंडळीचा या देशाच्या कल्याणार्थ चाललेला प्रयत्न पाहून आमच्या कित्येक मंडळीस अशी शंका येत असते कीं, ह्या सर्व कृत्यांत लपंडाव फार असले पाहिजेत. वरील साहेब मंडळ व त्यांचे अनुयायी यांनीं आह्मांबद्दल कळकळ दाखवावी व त्यांलिसचरी, क्रॉस वगैरे बड्या लोकांनीं त्यांचें म्हणणें हाणून पाडण्याच्या प्रयत्नांत असावें व वादाचा निकाल लावण्याची संधीच न येईल अशी व्यवस्था ठेवावी या योगानें इकडील लोक आपल्या बद्दल खटपट चालली आहे असें समजून संतोषानें रहातील. अशा प्रकारच्या कारस्थानाची योजना इंग्रज लोक करणार नाहींत असें जरी म्हणतां येत नाहीं तरी डिगबे साहेब व त्यांचे मसलतगार वेडरबर्नादि मंडळी असले डावपेंच करतील अशी शंका घेणें म्हणजे त्यांनीं आमच्यावर आजवर केलेल्या उपकारावर विरजण घालणें होय. वरील प्रकारच्या शंका अज्ञान व अविचारी लोकां कडून निघत असतील ही गोष्ट निर्विवाद आहे; परंतु अशा लोकांस ही साहेब मनकुरांचे आपणा बद्दल होत असलेले प्रयत्न विदित होणें जरूर आहे. आम्ही या साहेब लोकांचे गेल्या दहा वर्षांत इंग्लंड मध्यें आमच्या खातर झालेले प्रयत्न काय आहेत ह्याचा शोध घेऊं तर त्यांच्या बद्दल अनुदार उद्गार एकाही हिंदूच्या मुखातून ऐकूं येणार नाहींत.

हिंदुस्थानातून गेल्या नंतर १८८१ साला पासून इंग्लंडातील लोकांस हिंदुस्थानची हालहवाल ऐकूं येईल अशी डिगबे साहेबांनीं खटपट चालविली. लोकमताभिमानी मंडळ्याचे प्रमुख जे 'न्याशनल लिबरल फिडरेशन' त्यास 'इंग्रजासाठीं इंडियाचे प्रश्न' असा एक लेख लिहिला व त्याच्या हजारों प्रती लोकांस वांटल्या त्यावर तेथील वर्तमान पत्रांतून बऱ्याच भवती नभवती होऊन त्या लोकांपुढें येथील गोष्टी येऊं लागल्या. व तेव्हां पासून लोक नियुक्त सभासद प्रतिनिधी सरकारच्या दरबार मंडळांत असावेत असें बऱ्याच लोकांस भासूं लागलें. परंतु तेथील लोकांचें आमच्या विषयीं अज्ञान, आमचे पुरस्कर्ते डिगबे साहेब यांचें तेथील एका प्रत्याहिक पत्राचें धुरीधरणत्व असल्या मुळें आमच्या संबंधांत हात घालण्यास वेळेचा अभाव इत्यादि गोष्टीनीं दुसऱ्या वर्षी आमच्या गाऱ्हाणी ची उठावणी झाली नाहीं. परंतु १८८३ आणि ८४ सालीं ब्रिटीश इंडिया कमेटी नांवाची संस्था स्थापन होऊन तिनें आपलें काम बऱ्याच नेटानें चालविलें. पैशाच्या अभावामुळें व तिच्या सारखीच हिंदुस्थानांत एखादी संस्था नसल्या मुळें तिला आपलें काम चालविण्यास बरेच अडथळे आले. सर वुइल्यम वेडरबर्नसाहेबांनीं पार्लमेंट मध्यें हिंदुस्थानच्या वतीचे लोक असावेत. म्हणुन बरीच खटपट केली परंतु त्यांस यश आलें नाहीं. १८८५ सालीं कंपनी सरकारच्या राज्यावर ज्या प्रमाणें नजर ठेवण्याचा पार्लमेंट सभेस हक्क असे तसाच हक्क गतांही असावा अशा बद्दल बरीच हालचाल करून पाहिली परंतु यशाचा वाटा मिळाला नाहीं तरी याच वर्षी येथून पांच गृहस्थ हिंदुस्थानच्या वतीनें पार्लमेंट सभेत सभासद होण्याकरितां विलायतेस गेले व त्यांची सर्व व्यवस्था डिगबे व आपले परम प्रिय ह्यूम साहेब यांच्या देखरेखी खालीं होती. सभा भरवून व कांहीं सभांत भाषणें करून हिंदुस्थानची खरी स्थिति इंग्रज लोकांच्या पुढे मांडण्याची कसूरी या लोकां कडून मुळींच झाली नाहीं. याच वर्षाच्या शेवटीं कांग्रेस सभा स्थापन झाली, ही तेथील लोकांस जोर आणण्यास कारण भूत झाली'

---

नमुना नंबर १४२

दिवाणी कोर्टास सूचना

अज्ञानाच्या मालमिळकतीच्या वहिवाटाचें सरटिफिकिट मिळण्या विषयीं अथवा अज्ञानाचें पालन व त्याच्या मालमिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमण्याविषयीं सन १८५८ चा आक्ट ४० कलम ६ प्रमाणें.

अर्जीचा नंबर सन कि. क्लास. नंबर १३

मि. नंबर १ सन १८९१

स्पे० अ० कमिशनर साहेब जिल्हा आकोला यांचें कोर्टांत.

अर्जदार मलकारजून अ० पा० करणार मातोश्री इरुबाई मर्द दाणाआपा मुखत्यार लक्ष्मण जाणाआपा राहणार अकोला.

वरील ( अज्ञान ) मलकारजून. बापाचें नांव जाणाआपा जात. राहणार आकोलें तालुके अकोला जिल्हा आकोला. याचें पालन व मालमिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमला जावा म्हणून अर्ज दिला आहे यास्तव मृत्युपत्राचें आधारें किंवा दस्तैवजा वरून किंवा अगदी जवळचे नातलगपणाचे कारणावरून किंवा इतर प्रकारें ज्या कोणा मनुष्यास सदरहू अज्ञानाचे माल मिळकतीवर सांभाळ कर्ता या नात्यानें कबजा करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्या सर्वांस या लेखानें कळविण्यात येतें कीं, यानीं तारीख २ माहे मार्च सन १८९१ इ० रोजी वरील अर्जाची चौकशी होणार आहे ते वेळी या कोर्टात हजर होऊन आपापल्या हक्काची लेखी हकिकत दाखल करावी. तारीख २८ माहे जानेवारी सन १८९१ इ०

Mahomed Yassinkham

स्पे० अ० कमिशनर.

---

# The Berar Samachar

**MONDAY, FEBRUARY, 9. 1891.**

## "WHY TWELVE AND NOT SIXTEEN."

We disapprove of the advocacy of the bill increasing the Age of Consent on the ground that it asks too little and for that little it shakes to its foundations the very trust and confidence of the public in the government. If Suttee was abolished at one stroke by legal interference let the government abolish the consumation of marriage before the age of sixteen and India will justly be proud of the British rule in raising the age of consent to such an extent as no nation has yet reached. Legislation is indeed a most effective instrument for modifying as well as intensifying public opinion in the direction in which it is desirable that it should progress. The Natives, loyal as they are, are certain to obey the law even if their life be at stake; and in the present case the claims of humanity will indeed sanctify even a strict legislation though bitterly felt it may be Dr. K. R. Kirtikar was the first to give expression to such candid and liberal views as will command our urgent consideration about the matter.

On Wednesday last some of the advocates of social reforms in Berar assembl ed to express their opinion in favour of Scoble's Age of Consent Bill. Their memorial will enlighten the government on the convictions which some of the reformers in Berar carry with them in regard to the effects of governmental action within the sphere of social and domestic concerns. We trust them with honest intentions but we are afraid of the nature of the measures they have adopted to improve their homes in one phase of marriage customs by the raising of the age of consent. We also fail to see how their approval of the first part of the bill as it stands accords with both their far advanced moral sense and judgment.

The first part of the Bill has in its view the prevention of premature prostitution. Those unchaste women who make it their profession to enter into casual and temporary sexual intercourse with scores of men are found to spoil their young girls when they are so immature and unripe as to be quite incapable of such unhealthy intercourse. The government intends to protect them till they are twelve and after that period they are free to choose any course of life they like. Sir Steuart Bayley has proposed to the government to raise the age of consent to fourteen. It is certainly incumbant upon these reformers if they want to be consistent with their principles at all to attempt to raise the age of consent as high as it would be wise and circumspect to do from a physiological point of view. People, as a general rule, care a fig if the young nonwives be required by law to be sixteen before they announce their bodies for sale. Though this unhappy class forced as it is for variety of reasons social as well as moral, to a life of exclusive misery, shame and obscurity receives a severe & inhumane treatment from the other classes, still it is unquestionable that it forms a necessary, important and valuable element in the composition of society. The strength and progress of morality in any society depends much on the measure and manner of restrictions imposed upon this class. If legal interference the so-called reformers commend, on the ground of the interests of humanity should it not be their prime duty to attempt to check with strict measures premature prostitution prevalent in India? If for the sake of husbands wives the age of consent should at least be twelve much more should it be in the case of non-wives who are to make warm beds for hundreds or thousands. We are averse to be explicit on this subject but we are forced to overside that aversion in order to convince the advocates of the bill that their acquiescence in the bill is not far reaching in its mark and is far short of the desired aim which will not be realized by the present bill. If the medicinal and religious authorities are quoted to prove that wives should be sixteen before they are fit for enjoyment it is a *fortiori* evident in the case of non-wives that the age of consent should not be twelve or fourteen. We should like to request these go-ahead gentlemen so to adjust their memorial as to square with the high and liberal views which they possess.

(To be continued.)

---

The Vice-chancellor of the Calcutta University has given expression to his ideas about female education while he was congratulating the ladies upon their success in arts and medicine. In his speech he proceeds to remark:-

The encouragement of Female Education by its degrees and other marks of distinction must rank as one of the highest useful functions of the University. No community can be said to be uneducated community unless its female members are educated i. e. not simply taught to read and write but educated in the full and true sense of the word. For however proud man may boast of his intellectual superiority over the gentle sex the simple truth must be admitted that woman is the primary

educator of humanity. With the first dawn of reason and before our baby-lips even learn to lip, our real education begins in the mother's arm and every fond word she speaks and every anxious look she casts impresses silently but indelicely some lasting lesson on the growing mind. And what moralist is there that can teach the cultivation of the finer feelings than a loving mother, a loving sister, a loving wife and a loving daughter? It is therefore that our eastern mind, notwithstanding its supposed antipathy towards the fair sex, conceived the genius of learning to be a female divinity and it is therefore that our sage law-giver Manu, notwithstanding the harshness to females which characterizes orchaic codes, has inestiated that immorable precept "where women are honoured there the Gods rejoice; where they are not honoured there all rites are fruitless."

COMMUNICATED

## MEETINGS REGARDING THE CONSENT BILL.

A meeting of the supporters of the Age of Consent Bill was held at Amraoti on the evening of the 5th in the Native City Library at Amraoti. The Bill is preeminently the topic of public discussion at present and is exercing the minds of the arthodox and the Reforming communities in India. Government has called for opinions regarding the Bill of the educated natives of India and it was with a view to see what number of adherents the Bill had at Amraoti that the meeting was held. Handbills had been circulated the day before the meeting by the orthodox party which were calculated to rouse the public indignation and totally mislead the public mind by inflammatory insinuations against the Bill. Those who were responsible for publishing these pamphlets had evidently not the courage of their opinions as no resignatures were attached to the handbills. When such things were going on, the party of Reform thought it best to muster up and declare in a body their opinions in unmistakable language. Accordingly a meeting of the supporters was held on the evening of the 5th instant and after two or three speeches to the point, the meeting unanimously adopted a memorial to Government declaring they were entirely in favour of the Bill.

A counter meeting was held on the evening of the 6th instant of the orthodox party. Mr. Pandurang Govind our townsman who is well known all over Berar, took the chair. It must in fairness to this gathering be said that it was a very large gathering indeed for a place like Amraoti. We believe however that for obvious reasons the promoters of the meeting would have done well if they had not admitted the High School boys to that meeting. The meeting of the 6th contrasted very strongly with that of 5th so far as members went. The open site, in front of the temple of Ramchandra in the very heart of the town was fully crowded and people could get in only with great difficulty. Speeches were delivered by Messrs Khaparde and other gentlemen. Such of the Reform party as had gone to the meeting tried to give the other side of the picture to the audience but as was fully anticipated, the labour was all lost on the audience already predisposed against the Bill. Two resolutions were passed to the effect that Government should not undertake legislation in the matter of the age of Consent and that the meeting put on record its protest against the Bill. Both resolutions were carried by very large majorities. It was proposed by way of amendment by the party of Reform that while asking the Government not to legislate from without, the meeting should pass a resolution that the caste punchayats should try to stop all cases of premature intercourse by making definite rules and thus show that the Hindu communities were in real earnest by adopting measures to stop the evil by efforts from within. A second amendment to the effect that a law should be passed raising the minimum marriageable age itself to twelve was also proposed. Both the amendments were of course lost, thus clearly proving the great necessity of the present Bill in as much as no body seemed to be willing to begin to do anything or to accept any compromise.

We are not concerned so much with the stupid ignorance or unmeaning opposition of the masses regarding such subjects but we confess it was a matter of the greatest regret to us to find that educated people should have been against passing at the Bill. The Government of India looks hopefully particularly to the educated natives of this country to support Government in the measure and to strengthen its hands in passing the Bill into Law, and it would undoubtedly disappoint a great many of our English friends and the Government of India itself. We think pro test meetings throughout India are a standing disgrace to the nation.

The evils which are sought to be removed by the present Bill are flagrant that they most amply justify a foreign Government to intercede in the matter. The interests at stake are so great, the evil effects of the pernicious system are so far reaching that the passing of the Bill into law is a pressing need and is altogether within the legitimate functions of the state. The Government of India is only removing for disgraceful blot on its Indian Administration, by trying to pass the Bill. We do not mean to discuss the various arguments in favour of and against the Bill as they have been discussed far more ably than they could ever be discussed in these columns but we must we believe pronounce emphatically our opinion on one great objection which the orthodox party has to the Bill. The objection is that legislation from without is undesirable but if after waiting these four or five years the Government see no signs of any work ing from within and finding the present attitude of the public to be still hostile to any reform or any honest attempt towards reform in a matter of such vital interests to its subjects the Government we say, will be quite justified in over ruling this specious objection and passing the Bill into Law. We hope oil thrown over the troubled waters very soon by the Government of India passing the Bill into Law without further delay.

## CORRESPONDENCE

We are not responsible for the truth of what appears under this column.

Sir,

To continue my last letter I am very glad to announce the going of the Deputy Commissioner to Pusad in the last week. The sawkars did not let go an opportunity of presenting their petitions to the Deputy Commissioner for arm licenses Being much surprised to see the extraordinary things happening so so often in the Taluka the Deputy Commissioner to spread terror among the decoits, and to preserve the public safety, was kind enough to go to Sirpur notorious for its decoity for satisfying himself with the circumstances under which the decoity was committed.

By the presence of the Deputy Commissioner and the trouble he took of going to Sirpur the people took heart not to a small extent. But they are not fortunate to have his presence for a long period in the Taluka where the public peace is so much in danger. He inspected the treasury, the Extra Assistant Commissioner's Court, the public station, paid visits to both the schools and went back to khandala to go to Basim— The precarious and unsafe state of the Taluk wants badly his presence again—

I find much pleasure in making a mention that the police come off successful in arresting some perpetrators of the robbery at *Kupti*. The persons arrested are under trial. Some say they belong to the same gang of decoits that have been doing their devilish work throughout the whole District. The trying Magistrate will, it is hoped, award the severest punishment possible to the offenders so that their accomplices will be aware of the dreadful consequences and will leave the District for good.—

28-1-91 Yours
"Traveller',

Basim
28th January 1891

Dear Sir,

We are having a very dull time of it in Basim. In addition to the other ills which the birth right of a District situated so far from the Metropolis as dacoities in the District the temporary closing of some Courts of justice the absence of good and lighted streets &c. Mr. C. Shamrao had been on sick leave for a time but he has now joined his duty. Mr. Krishnarao Jaikrishna has gone to Pusad to fill up the vacancy made by Mr. Ajudhia Persad for some time-Pandit Suraj Narayen is shortly to proceed on leave. One more court is still wanted in Basim. The administration of justice is so clogged that suits remain without being called on for six or seven or any number of days. No adjournments are given; the parties and their witnesses are required to attend for so many days continually every day. You will see what trouble the parties are required to undergo and what loss they undergo on account of being detained so long. But this is not enough; even a suit on hand goes on for years and there are continude adjournments. The Judicial Commissioner will, it is hoped, take notice of this. For his information we quote Nos. 906 and 947 of 1890. This is nothing when compared to other things which some times go on in this benighted district of the benighted province "our pen must stop here" The idea of English justice is far from the minds of the Courts except one or two.

In the last but one issue of your paper there appeared a letter in which it is written that a certain census supervisor had a quarrel with the special Magistrate at this place and on the report of the supervisor he gave as his explanation that he had an attack of epilepsic fits. When the Resident had been in the jubilee Town Hall to receive the Municipal address the special Magistrate had been there and while there he had a fit of the disease but it does not appear that he there assaulted any body as he did the supervisor; nor is any patient attacked by that disease ever observed to assault other persons. It appears that the special Magistrate is not popular here and as for his legal knowledge we do not wish to speak of it. We only want to request that the Judicial Commissioner will in his mercy for the poor wretched beings of this District send Mr. Obbard to examine the gentleman and his records. If the Local Govt. wanted to recognize the high birth of the man it ought to have conferred some big title upon him or a grant of some land as a yearly pension. Let Mr. Obbard or the Judicial Commissioner once examine the records of this office and speak with him for half an hour and we say that we would abide by his able opinion and judgment. It is apractice in the Bombay and other presidencies that the sessions judge or the High Court itself examines or cause to be examined the records of every office within the limits of his or its jurisdiction. We earnestly hope that the practice may be brought into operation here to check the excessive irregularities and the gross injustice which has been going on here. As an example it may be stated that the Courts except one or two dispense with the necessity of reading over the deposition of a witness to him.

Yours truly
"X"

## वऱ्हाड

साम्युएल पाल, राजरत्न चारा, अबदुल अझीजबेग हे तिघे हैद्राबाद मेडिकल स्कुलांत शिकून थर्डक्लास आस्पिटल असिस्टंटचें काम करण्यास लायक ठरले व त्यांना वऱ्हाडांत मे. सानिटरी कमिशनर साहेबा कडे उमरावतीस हजर होण्यास हुकूम झाला आहे.

मि. देवराव रामचंद्र खोलापूर येथील सबराजिस्ट्रार यास दोन महिन्यांची रजा मिळाली व त्यांचे जागीं व्यंकटेश नारायण मोहरीर यांस नेमलें.

पंडित सुरज नारायण अ० क० यांनीं वाशिमच्या म्युनसिपाल कमिटीच्या आपल्यां मेंबरच्या व चेअर मनच्या जागेचा राजिनामा दिला व त्यांचे मेंबरचे जागीं त्या जिल्ह्याच्या डे० क० साहेबांस नेमले.

मि० अनवर अली तहसिल्दार आणि मि० जगदेवराव हणमंतराव पाटील यांस मंगरुळ तालुका बोर्डाचे मेंबर भि० रावेजी माहदजी आणि बळवंत श्रीरामयांच्या जागीं नेमलें.

मि० रुस्तुमजी फरदुमजी अ० क० यांना सेकंड माजिस्ट्रेटचे आधिकार मिळाले.

इंडियन सेन्सस आक्टांचे कलम २ अन्वयें आलिशान रेसिडेंट साहेबांनीं कोणत्याही मनुष्यास त्याच्या हुद्यानें किंवा नांवानें खानेसुमारी करण्यास, ती करण्याचे कामीं मदत करण्यास अथवा ते वर देखरेख करण्यास नेमण्याचा अधिकार डेपुटी कमिशनरास दिला आहे.

डे. क. अथवा वऱ्हाडचे सेन्ससचे सुपरिंटेंडेंट यांच्या मजुरातीनें, सेन्सस अक्टा अन्वयें व्हावयाचे ते मोकदमे, हद्दीतील फर्स्ट क्लास माजिस्ट्रेटापुढें चालतील.

मि० इ० ए० हबसन अ० सु० पोलीस फर्स्ट ग्रेड यानीं पेनशन घेतलें व त्यामुळें मि. राबर्ट ग्याल्केंव यांस फर्स्ट ग्रेड अ० सु० व मि. एफ. सी. क्राफर्ड यांस सेकंड ग्रेड अ० सु० व हे निजाम सरकाराकडे नोकरीस असल्यामुळें त्यांचे जागी मि० जे० टी० बी० डी० सुएल यांस सेकंड ग्रेड अ० सु० नेमलें.

मि० सफदर अलिबेग ए० अ० क० यांना ता. ५ जानेवारी १८९१ पासून किंवा ते घेतील त्या तारखे पासून तीन महिन्याची रजा मिळाली.

मि० विष्णु मोरेश्वर महाजनी, एजुकेशनल इन्स्पेटर, यांना ता. ५ मार्च १८९१ पासून किंवा पुढें घेतील त्या तारखेपासून एक महिन्याची हक्काची रजा मिळाली.

कर्नल रेनिक डे. क. एलिचपूर यांना एलिचपूर सिटी म्युनसिपाल कमिटीचे चेअरमन निवडलें.

फर्स्टक्लास अस्पिटल असिस्टंट परमश्र दयाळ चारिटेबल डिस्पेंसरी दर्यापूर यांस तीन महिन्याची हक्काची रजा मिळाली दयाळ त्यांच्या जागीं सेकंड क्लास आस्पिटल असिस्टंट सय्यद मोहिमुद्दीन यांस नेमिले.

## वर्तमानसार,

सन १८८९।९० सालांत, हिंदुस्थान सरकारनें सर्व तुरुंग खात्याचा खर्च जातां कैद्यांच्या श्रमापासून दोन लाखां पेक्षां अधिक रुपये वसूल करून घेतले शिवाय ठगी स्कूल ऑफ इंडस्ट्री पासून १० हजार रुपये मिळविले, ते निराळेंच.

चौतिस हजार पत्रांची पाकिटें एका तासांत गोंद लावून सुद्धां तयार होण्याचें एक यंत्र निघालें आहे.

ब्राह्मणांत वेद पाठ करण्याची जो चाल पडली आहे त्याचें मूल कारण शोधून पाहतां पूर्वी लेखन प्रचात फार कमी होता ह्मणून पडल्याचें कळतें.

न्या. सिं.

हत्ती शंभर वर्षांवर जगतो व व्हेल नांवाचा मासा २००-३०० वर्षें जगतो. धुव्राजवळील एक आस्वल पकडलें असून तें आज ३७ वर्षें जिवंत आहे. एका बागेंत एक पोपट नुकताच मेला तो ५० वर्षें जगला होता. मनुष्याचें आयुष्य मात्र कमी कमी होत आहे!

आह्मांस कळविण्यास संतोष वाटतो कीं, श्री. होळकर सरकार व त्यांच्या मातोश्री यांच्या दरम्यान खानगी वहिवाटी संबधानें तंटा उपस्थित होऊन बहूत दिवस सरकार दरबारही चाललें होतें. त्या तंट्याचा आता आपसांत निकाल लागला. ही आपसांत तोड जोड लावण्याचें यश गव्हरनर जनरलांचे नवीन एजन्ट मि. क्रास्थवेट साहेब यांनीं घेतल्याचें समजतें.

ह्मैसुरांत हत्ती पकडण्यासाठीं एक इंग्रज गेला असून त्यानें बरेंच हत्ती पकडले आहेत असें ह्मणतात. या गृहस्थास हिंदुस्थान सरकाराकडून ह्मैसुरच्या महाराजांनी मुद्दाम मागून घेतलें असून त्यानें गेल्या जानेवारीच्या पहिल्या तारखे पासून ८०-९० हत्ती पकडले आहेत. या गृहस्थास १८९३ पर्यंत महाराज आपल्या तैनातींत ठेवणार असून या योगानें संस्थानचा बराच फायदा होणार असें ह्मणतात. सध्यां गोऱ्याचो चैन आहे एवढें मात्र खरें.

रावळपिंडीकडे टोळांनीं इतका त्रास दिला आहे कीं रेल्वेही बंद पडली आहे रेल्वेच्या रुळावर त्यांची अतीशय चरबी पडल्या मुळें अतपर्घांही होऊं लागले आहेत.

बड्या युरोपियनाकडून बड्या नेटिवाचा अपमान :—युरोपियन लोक नेटिवांस किती योग्यतेनें वागवितात याचें एक उदाहरण नुकतेंच ठाण्यास घडून आलें आहे. गेल्या बुधवारीं एक महत्वाचा खटला येथील जज्ज मि. सी. इ. जी क्राफर्ड यांचपुढें चालू होता या खटल्यांत मुंबईचे प्रसिद्ध डाक्तर मि. भालचंद्र कृष्ण भाटवडेकर हे साक्षीस आले होते प्रथम शपथेचा विधी झाल्यानतर खुर्ची मिळण्याबद्दल जज्ज व भाटवडेकर यांच्यांत पुढील संवाद झाला:—

मि. भाटवडेकर:—जज्ज साहेब, मला खुर्ची मिळणें जरूर नाहीं काय?

जज्ज:— नाहीं, मला तसें वाटत नाहीं.

मि. भाटवडेकर.— हायकोर्टांत व इतर ठिकाणीं मला खुर्ची देण्यांत येते.

जज्ज:—नाहीं.

मि. भाटवडेकर— मि. एक्सपर्ट ह्मणून येथें आलों आहे.

जज्ज:— तुम्हीं एक्सपर्ट ह्मणूनच आला आहां किंवा कसें हें मला माहीत नाहीं. खुर्ची मिळावयाची नाहीं असा मी ठराव करतों. जास्त बोलण्याची जरूरी नाहीं. चुप बसा.

अशा रीतीनें आपल्या ठरावाचा सोडगा जज्ज साहेबानीं उगारल्या बरोबर मि. भाटवडेकरांस उगीच बसणें प्राप्त झालें.

चिली प्रांतांत दंगा:— व्हालपेरेझो येथून ता. २३ मिनहू रोजीं आलेल्या तारे वरून समजतें कीं, बंडखोरांनीं तारापाका नावाचा प्रांत काबीज केला आहे. त्या प्रांताचा प्रसिडेंट बालमासिडा याणें आपल्या जागेचा राजीनामा दिला नाहीं, तर सर्व सैन्य बंडखोरांस मिळेल असें म्हणतात. लंडनची गेल्या २७ व्या तारखेची तार सांगते कीं व्हालपेरेझो येथून आलेल्या बातमीवरून समजतें कीं, बंडखोरांनीं करानल येथें छापा घातला आहे आणि तेथील कित्येक लोकांस ठार मारलें आहे व कित्येकांस जखमी केलें आहे.

ठा० अ०

मामलेदारास कळवावें कीं, आह्मांस एक दुपती म्हैस विकत घ्यावयाची आहे, शोध करून पाठवून द्यावी. मामलेदारबिचारे म्हैस विकत आणून देतात व ती म्हैस काय देतें हें पाहण्या करितां साहेब पांचचार महिनें तिला आपले जवळ ठेवितात, आणि ती दूध देईनाशी झाली ह्मणजे, म्हैस पसंत पडत नाहीं म्हणून मामलेदाराकडे परत पाठवितात. मामलेदार पाटलाकडे परत पाठवितात आणि पाटील गवळ्याकडे परत पाठवितात. पाटलाच्या धाकानें गौळी चप, मामलेदाराच्या धाकानें पाटील चप, साहेबाच्या धाकानें मामलेदार चप, अशी जिकडे तिकडे चप चप चप स्थिति होतें!!! गरीबाचें रक्षण व्हावें कसें?

प्रसिद्ध गजेंद्रगडकर यांचे घराण्या पैकीं ग्वाल्हेरीस असलेले वे. शा. सं रामाचार्य गजेंद्रगडकर यास देवाज्ञा झाल्याचें वर्तमान आलें आहे. हे गृहस्थ अंती विद्वान असून वृद्ध होतें. व याना सिंदेसरकारचा आश्रय होता.

प्रयागास महामारीचा उपद्रव सुरू असल्याचें कळतें.

काबूलचे अमीर अब्दुलरहिमान यांस देवाज्ञा झाल्याचें दुःखकारक वर्तमान आलें आहे. खरें असल्यास गडबड व घांदल पाहण्याची वेळ नजीक आली असें ह्मणावें लागेल.

अमळनेर तालुक्यांतील एका खेड्याचा पाटील ता० १० शनिवार रोजीं येथें (जळगांव) मे० कलेक्टर साहेब बहादूर यांचे बंगल्यावर दिवसा मशाल व नागवी तरवार घेऊन आला होता पोलिसांनीं त्यास धरून अटकेंत ठेविलें. त्याचें म्हणणें असें आहे. कीं माझी खानगी जागा सरकारानें सरकारी ठरविल्यामुळ माझा न्याय होतनाहीं म्हणून त्यांनीं हा प्रकार केला. [illegible]प विचत्र हा!

पु. वै.

लढाईचे वेळीं घोड्यांस लागणारी वैरण काढून प्रेसांतून दाबून लहान गठ्यांतून नेण्याची व्यवस्था झाली असून ती करणारे साहेबांस ५००० रु० इनाम सरकारानें दिलें.

नागपुराहून थेट कलकत्याच्या पर्यंत तार नेण्याची योजना होत आहे.

दुष्काळ कोलंबो येथील पत्रावरून समजतें कीं, तिकडील मागमपाटु जिल्ह्यांत दुष्काळ पडला आहे. लोकांस अन्न मिळत नाहीं. मक्याचे कच्चे दाणें लोक खाऊं लागले आहेत व ह्या मुळें अजार उत्पन्न होऊन लोक मरत आहेत.

सत्यशोधक.

---

वऱ्हाड वक्तृत्वोत्तेजक सभेचा
अठरावा समारंभ

सर्वांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं, शहर उमरावती येथें या सभेचा समारंभ शुक्रवार तारीख २७ माहे मार्च सन १८९१ रोजीं सुरू होणार आहे. समारंभाची जागा पुढें कळविण्यांत येईल.

चालूं सालीं भाषणा करितां दोन विषय नेमले आहेत.

विषय १ ला.

सुधारलेले देशांत कुटुंब व्यवस्था / Domestic Covernwment ) किती प्रकारची आढळते. त्यां पैकीं आपले देशांत कोण कोणत प्रकारची होऊन गेली, व हल्लीं तिचें स्वरूप कसें आहे? तींत सुधारणा करण्यास जागा आहे कीं काय, असल्यास ती कोणत्या रीतीनें करणें इष्ट आहे हें सांगावें.

विषय २ रा.

राज्य व्यवस्थेचे निरनिराळे प्रकार कोणते आहेत? त्या प्रत्येकाची माहिती देऊन त्यापासून रयतेचें कसें हिताहित होतें तें सांगावें व त्यां पैकीं हिंदुस्थानच्या हल्लींचें स्थितीस कोणती राज्यव्यवस्था योग्य आहे याचें सकारण विवेचन करावें.

बक्षिस—पहिल्या विषयाला पहिलें बक्षिस रुपये ३० चें व दुसरें रुपये १५ ठेविलें आहे.

दुसऱ्या विषयास पहिलें बक्षिस रुपये २५ चें व दुसरें १० चें ठेविलें आहे.

(१) उमेदवाराचें वय १८ वर्षांहून कमी नसावें.

(२) प्रत्येक उमेदवाराचें भाषण अर्ध्या तासांत संपण्या जोगें असावें, परंतु अयोग्य वाटल्यास अर्ध्या तासापूर्वींच भाषण बंद करण्याचा किंवा अधिक वेळ पर्यंत चालूं ठेवण्याचा अधिकार परीक्षकांस आहे.

(३) कोणी उमेदवार कोणाही व्यक्तीस अनुलक्षुन भाषण करील किंवा सरकारच्या विरुद्ध भाषण करील, किंवा अमित्स शब्द भाषणांत आणील तर त्याचें भाषण बंद करण्यांत येईल.

(४) प्रत्येक उमेदवारानें आपलें भाषण लिहून सभेच्या सेक्रेटरी जवळ आणून दिल्या शिवाय त्यास भाषण करण्याची परवानगी दिली जाणार नाहीं.

(५) नेमलेल्या विषया पैकी कोणत्याही विषयावर भाषण करण्यास उमेदवारांस परवानगी आहे.

(६) भाषण करण्यास येणाऱ्या उमेदवारांनीं आपले अर्ज ता० १५ माहे मार्च सन १८९१ इसवीचें आंत सेक्रेटरींकडे उमरावती प्रमोदसिंधु छापखान्याचे पत्यावर पाठवावे, आणि समारंभाच्या पूर्व दिवशीं सेक्रेटरीस भेटावें.

खरेदी— हिंदुस्थानांतील लढाई वरील सैन्यास प्रसंगाच्या वेळीं उपाहारास उपयोगीं पडण्या करितां दरसाल २८ हजार मांस बिस्किटांचें दास्तान करून ठेवण्यास सरकारानें मंजुरी दिली आहे ह्या खरेदी साठीं दरसाल रुपये १६६०० ची परवानगी झाली आहे.

नेमलेल्या अगर दुसऱ्या एखाद्या स्वतंत्र विषयावर सन्मानार्थ भाषण करण्याची कोणा गृहस्थांची इच्छा असल्यास त्यांस सवड प्रमाणें परवानगी देतां येईल.

गोपाळ वामन बापट बी. ए.
यशवंत गोविंद केसकर
व० व० स० सेक्रेटरी.

---


बामन गोपाळ यांचा अनेक औषध मिश्रित

## सार्सापरिला

हा सार्सापरिला अनेक रोगांवर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणाकारी आहे उपदंशजन्य विकार, (गरमी) व तिजपासून होणारे पक्षघातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शरिरावर काळे डाग पडणें. संधी दुखणें कळा लागणें, सूज येणें वगैरे सर्व संधिगत वायुंवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग, जसें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज, गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे. सारांश उपदंशजन्यापासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दूषित झाले असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखे दुसरे औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १॥ रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या

## गोळ्या.

यापासून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्राव यानें झालेली शरिराची क्षिणता जाऊन अशक्तता, अग्नीमांद्य, जीर्णज्वर, नपुसकत्व इत्यादि विकार तावडतोब नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरिरांतील चैतन्याचा व वृद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकंद (मेंदु) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनःरुज्जीवन होते. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुची शक्ति वढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा

## कलप

हा कलप प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन. त्यास तेजी येते. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे याचे दवाखान्यांत वरील सर्व औषधे मिळतील.

आमचा पत्ता—नव्या ठाकुरद्वारा समोर


---

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार छापखाण्यांत नारायण खंडेराव यानीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०।३
सहामाही " ३ " ०८
साळअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास........................ ०४

per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 "1Rs. 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..................................4a

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........०१

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per lin3se

THE BERAR SAMACHAR

VOL XXV AKOLA MONDAY 16 FEBRUARY 1891 NO 7

वर्ष २५ अकोला सोमवार तारिख १६ माहे फेब्रूवारी सन १८९१ इ० अंक ७

## पत्रव्यवहार

या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्यांच्या मतास मिळून असतील असें समजूं नये.

✓ रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

वि० वि० आजपर्यंत वऱ्हाडच्या लोकांनीं सार्वजनीक व राष्ट्रीय कामांत चांगलें नांव मिळविलें. याचें एक कारण— हा प्रांत संपन्न व देव भोळ्या लोकांनीं भरला आहे हें होय. दुसरें कारण–येथल्या पुढारी लोकांचा समंजसपणा व तन्मूलक ऐक्य आणि त्यांचें औदार्य. परंतु ही वऱ्हाडची कीर्ति गत गोष्ट होऊं पाहते ही मोठी दिलगिरीची गोष्ट आहे. याचा कारण उमरावतीचे सुधारक पुढारी व त्यांची पत्रें. सुधारणेचें पिसें वऱ्हाडांत आज पर्यंत छपून होतें परंतु आतां तें समरांगणांत आल्या मुळें सार्वजनिक कृत्यांची कदाचित व्राण करील असें वाटतें. या करितां येथें नवीन बनलेल्या तेवीस सुधारकांच्या टोळी विषयीं व त्यांच्या वर्तमानपत्रा विषयीं चार शब्द लिहितों तर जागा द्याल अशी आशा आहे.

गेल्याच्या मार्गील आठवड्यांत येथें तीन सभा झाल्या पहिली–गोरक्षण सभा शनिवार ता० ३१ जानेवारी या दिवशीं झाली. सभेस दोन हजारावर मंडळी जमली होती. या सभेकरितां नागपुराहून मुद्दाम मेसर्स भिडे, नारायण स्वामी, केशवराव कावळे, बळवंतराव यादवराव, वगैरे बरीच मंडळी आली होती. सभा फार चांगली झाली कामही बरेंच झालें.

दुसरी सभा बुधवारी लायब्ररींत तेवीस सुधारकांची झाली यांत सर्वानुमतें असें ठरलें कीं "कन्सेंट बिल" धर्माच्या आड बिलकूल येत नाहीं, उलट फार हितकारक आहे, त र सरकारांनीं तें पास करावें.

तिसरी सभा कन्सेंट बिलाचा विचार करण्या करितां गुरूवारीं राममंदिरांत भरली होती. चारहजारावर लोक जमले होते. तेवीस सुधारकां पैकीं प्रमुख मंडळी सभेंत होणारे ठराव हाणून पाडण्याच्या निश्चयानें कडेकोट तयारी करून आले होते. अलाहाबादच्या कांग्रेसमध्यें जसें राजा शिवप्रसादचें बोलणें ऐकून घेऊन स्वागत केलें तद्वत ष यांचें स्वागत झालें. व यांची कर्णकटु भाषणें मंडळींनीं शांतपणें ऐकून घेतली. त्यांचे वक्ते संपले ह्मणून सांगितल्यावर, मुळ ठरावास पुष्टि करणारांचें एक भाषण राहिलें होतें तें होऊन ठराव मंडळी पुढें ठेविला. त्याला विरुद्धमतें कायती पंधरावीस सुधारांकचीच. परंतु सुधारकांना धन्य मानून घेण्याला एकच कारण सांपडलें. ते ह्मणाले कीं आमच्या कालच्या तेवीस लोकांच्या गुप्त सभेंत ठराव सर्वानुमतें पास झाले. व तुमच्या चार हजार लोकांच्या सभेंत आह्मी पंधरा वीस जणांनीं येऊन तुमचे ठराव सर्वानुमतें तर पास होऊं दिले नाहींत; हें काय थोडें झालें! हाच आमचा मोठेपणा.

ही सभा होऊं न देण्या विषयीं सुधारकांनीं आपल्या कडून पराकाष्ठा केली. वृद्ध सुधारक म्हणाले कीं तुमची सभची हॅन्ड बिलें आम्ही छापीत नाहीं कारण त्यांतील मजकूर आमच्या प्रज्वलीत बुद्धीला राजद्रोहाचा दिसतो. दुसऱ्या एका मनुष्यानें छापून देतो म्हटलें म्हणून त्यालाही कांहीं सुधारक मंडळीनीं मोठी भिति घालून बाबरवून सोडविलें. हॅन्डबिलें छापून बाहेर निघाल्यावर एक सुधारक त्याचें भाषांतर करणार व सदई भावी भाषांतर साहेब लोकांकडे जाणार व तिकडून आरोपित राजद्रोही मंडळीवर खटले सुरू होणार अशा बातम्या उठल्या. परंतु त्याचा तादृश्य परिणाम न होतां उलट सभा फारच मोठी झाली. वास्तविक पाहतां या वरील सभा होण्या बरोबर यांची हकीकत मी आपणांस पाठवावी परंतु प्रथमारंभीं त्याची आवश्यकता वाटली नाहीं. कारण या तिन्ही सभा मध्यें प्रमोदसिंधु कर्ते बरीच खटपट करीत होते त्या मुळें या सभांचा मजकूर कसाबसा प्रसिद्ध केला जाईल अशी आशा होती. परंतु गेल्याच्या मागचा प्रमोदसिंधु व वैदर्भ यांनीं दिलेल्या हकीकती वरून त्यांनीं केलेल्या सत्यापलापाचे आश्चर्य वाटून त्यांच्या कारस्थानी लोकांचें शक्तिनुसार कौतुक करावें असें वाटलें

एवढी मोठी गोरक्षण सभा झाली असून व राजश्री यशवंतराव केसकर या सभेचे सेक्रेटरी असून त्यांच्या प्रमोदसिंधूत सभे बद्दल एक शब्द लिहिण्यासही ते धजले नाहींत. जणूकाय गोरक्षण या शब्दानें त्यांचे सुधारक पत्र विटाळेल. बुधवारच्या तेवीस सुधारकांच्या सभेची मात्र साद्यंत हकीकत इंग्रजींत व मराठींत अशा दोन्ही ठिकाणी छापून आणखी कांहीं जागा, प्रसिद्ध होऊं पहाणाऱ्या तेवीस सुधारकांची नांवें मोठ्या टायपांत असून त्यांचे हुद्दे व पदव्या होतील तितक्या लांबलचक करून छापिल्या आहेत. जणूकाय या युक्तीनें तेवीस सुधारकांची कीर्ति अजरामर होणार, तरी तीन कालम राहिलेच. त्यांत वैदर्भांतलें उष्टें व शिळें असें पत्र छापून मिटक्या मारीत गोरक्षण सभे बद्दल "स्थलसंकोच" असे कारस्थानीं उद्गार काढण्यास वृद्ध सुधारक तयार होऊन बसले. आतां राहिली राममंदिरातली सभा. सरशेवटीं जेव्हां ती सभा भरली तेव्हां सुधारक चमू येण्यापूर्वी सभास्थानीं प्रमोदसिंधूकार येऊन बसले होते सभेचें काम सुरू झाल्यावर आपल्या सैनिकांना केलेल्या सर्व शास्त्रांचा परिहर जुनेमत स्वीकारणारांनीं सहज केला व कायद्या विरुद्ध संवमत जसें असावें तसें कराविलें हे पाहून प्रमोदसिंधूकारास सहज वाईट वाटलें असावें व कोंध भरात यथार्थ ज्ञान झालें नाहीं असें वाटतें चार हजारावर लोक असून यांना पुरते हजार ही दिसेनात. आपल्या पक्षातील सर्व विद्वान आहेत व उलट पक्षांत सारे तीन चारच विद्वान आहेत. असें दिसू लागलें. विद्वान याचा अर्थ पदवी धर असा जरी घेतला तरी त्यांच्या पक्षाला सात व उलट पक्षाला चार होते पण विद्वान याचा यथार्थ अर्थ घतल्यास शेंकडो विद्वान गृहस्थ बिलाच्या विरुद्धच आहेत कायदा पाहिजे ह्मणणें हेंचजर विद्वत्तेचें चिन्ह असलें तर मात्र उमरावतीस तेवीसा बाहेर विद्वान सांपडणें कठीण तीन चार मंडळी खेरीज करून सर्व शहर बिलाच्या विरुद्ध आहे. हे तीन चार गृहस्थ व त्यांचे अनुयायी मिळून अवघे तेवीस बाकी कांहीं उदासीन मंडळी खेरीज करून शहरचे सर्व लोक बिलाच्या विरुद्ध आहेत. असें असून प्रमोदसिंधूकार म्हणतात कीं येथें दोन तट आहेत. असल्या तेवीस मंडळींची गुप्त सभा झाली ह्मणून त्याला तट ह्मणावयाचे असल्यास दोनच कां पण पंचवीस तट आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. रा० खापर्डे म्हणाले कीं बिल पुढें आणण्या मध्यें सरकारचा हेतु चांगला आहे पण प्रमोदसिंधू काराला बिलाचा हेतु चांगला आहे. असें ऐकूं आलें पुढें सुधारक वक्त्यांनीं "तुम्ही कांहीं करा सरकार बिल पास करणारच, बिलतर पास होणारच" असें सभासदास पुन्हां पुन्हां सांगून या भक्कम मुद्यामुळें तुम्ही बिलास अनकूळच मत दिलें पाहिजे नाहींतर कमेटी नेमिली पाहिजे अशी भीति घालूं लागले.

सुधारकवृद्धांचा कळस रा० जनार्दन शास्त्री यांनीं केला व ते म्हणाले "बारा वर्षां पर्यंत लग्न करण्याचें बंद करण्याचा कायदा सरकारा जवळ मागावा म्हणजे झालें" खाशी युक्ति! युक्ति काढणाराची बुद्धि अचाट खरी! शास्त्री हे नांव धारण करणाऱ्या वृद्ध मनुष्यास सुधारका कडून शाबासकी मिळविण्यास ही युक्ति रामबाण उपाय यांत कांहीं शंका नाहीं. प्र० नें ही कारस्थानीयुक्ति तारेनें हिं० स० सारी कळवावी म्हणजे सध्या हिं० स० ज्या गोंधळांत पडलें आहे तो गोंधळ क्षणमात्रांत नाहींसा होईल व विद्वत पूज्य जनार्दन शास्त्री व त्यांचे युक्ति वाहक प्र० कर्ते यांची कीर्ति निदान हिंदुस्थान भर तरी होईल. आणि स्टेट सेक्रेटरीला जर शास्त्री बोवांनीं ती युक्ति कळविली तर हें बिल पास झाल्यास असाच उहापोह व भानगड होऊन पाच वर्षां नंतर जें बिल येण्याचा संभव आहे तें आजच येईल; व स्टेट सेक्रेटरी शास्त्री बोवांचे फार फार आभार मानितील व फांदीच्या टोंकावर बसून सुलभ रीतीनें खालीं येण्या करितां मुळा पासून फांदी तोडणाऱ्या चतुर मनुष्या प्रमाणें शास्त्री बोवांची कीर्ति होईल. पुढें मेसर्स जोग, मुधोळकर, जोशी, जनार्दन शास्त्री, व केतकर यांच्या भाषणांनीं लोकांचा झालला गैरसमज रा० भाटे व वालेवालकर यांनीं दूर केला. तेव्हां रा० भाटे व वालेवालकर यांचीं भाषणें प्र० रांनान आवडल्या मुळें ऐकूं आलीं नाहींत असें दिसतें. परंतु कदाचित हीं भाषणें ऐकिली असा पुरावा देण्या पासून सुधारक पक्ष सबळ होईल असा पोक्त व दुरवर विचार करून 'स्थल संकोचास्तव सवड नाहीं' असा कारस्थानी शेरा ठोकून देऊन या सभेचा कंटाळवाणा विषय त्यांनीं टाळला आहे केला.

आतां तरुण सुधारक जो वैदर्भ त्याचें थोडेसें कौतुक करून हा लेख लवकरच संपवितों. "बापसें बेटा सवाई" या म्हणी प्रमाणें यानें तर वृद्धावर ताण केली आहे तेवीस सुधारकांची गुप्त सभा बुधवारीं व जाहिर सभा गुरुवारीं असें असून सुधारकांचीच सभा गुरुवारीं झाली असा वैदर्भास भ्रम पडला. येथ पासूनच यानें सत्यापलापास सुरवात केली. तेवीस सुधारकांच्या सभेला वै० ह्मणतो बहुतेक पुढारी व विद्वान लोकांची सभा. सगळ्या उमरावतींत पुढारी व विद्वान मिळून हे तेवीसच. "खापर्डे, बापट, दाते व वालवालकर हे उपपद धारी मंडळी खेरीज करून बाकीची सर्व पदवीधर व ठळक ठळक मंडळे" कायती ही तेवीसच कां? शाबास वैदर्भा! तुझ्या अतिशयोक्तीची कमाल झाली! कोणाचें लग्न होत असल्यास खोटें बोलण्यास हरकत नाहीं अशी एक जुन्या अडाणी लोकांत म्हण आहे. तशी सुधारणा होत असल्यास लागेल तितकें खोटें बोलावें अशी विद्वत्तेच्या शिखरास पोंहोंचलेल्या सुधारकांची ह्मण आहे असें वाटतें. गुरुवारच्या सभेविषयीं लिहितांना वै० नें वरच्या ह्मणीस उदार आश्रय दिला आहे असें दिसतें. गांवांतील बहुतेक शास्त्री, पंडित, वैदिक अधुनिक विद्वान, शेट सावकार, व्यापारी, दुकानदार, व हायस्कुलांतले जाणते विद्यार्थी असे मिळून चार हजारावर लोक जमले होते. परंतु वैदर्भ ह्मणतो हे सर्व "शाळेंतील मुलें, तेली, तांबोळी, तमासगीर, व इतर असेच लोक होते." हेंच जर खरें तर सुधारकांनीं शिराताण ताणून केलेली खटपट कां बरें चालली नाहीं? व दुर्मुखलेले हांत्साते त्यांना कां बरें जावें लागलें? असें खोटें लिहिल्यानें सुधारक पक्षास पुष्टि आणितां येईल असें मंदमेंदु सुधारकांस वाटत असावें असें वाटतें. असो वैदर्भानेंही रा० जनार्दन शास्त्री यांचें भाषण "अयुक्तिक व तोंड जोडपर" ह्मणून त्यांची पाठ थोपटली आहे. तेव्हां याचाही बेत त्यांच्या कीर्तीचा वांटे करी होण्याचा दिसतो. या नंतरच्या रा० भाटे व वालेवालकर यांच्या भाषणानें लोकांस गैर समज झाला असें वैदर्भाचें मत. यांत कितपत तथ्य आहे हें पुन्हां सांगावयास नकोच. शेवटीं सभेचें काम सुयंत्र तडीस गेल्या बद्दल कसातरी शोक प्रदर्शित करून सात दिवस अस्वस्थ निद्रेचा उपभोग घेण्यास वैदर्भकार जाता झाला.

हा लेख लिहिण्याचा हेतु उमरावतीस नवीनच उद्भवलेल्या तेवीस सुधारकांच्या टोळीस इसारा देणें हा होय 'पुढल्यास ठेंच ब मागला शहाणा, या न्यायानें बंगाल्यातील व मुंबई इलाख्यातील सुधारकांची कायस्थिती झाली याचा त्यांनीं विचार करावा. सार्वजनीक व कांग्रेस सारख्या राष्ट्रीय कामाला हो सुधारणा किती बांधेल याचाही विचार त्यांच्या बधिर मेंदूनें होत असल्यास करावा. उमशचंद्र बानरजी व सुरेंद्र नाथ बानरजी हे या कायद्याच्या विरुद्ध कां आहेत हें आमच्या पिसाळलेल्या सुधारकांस समजेल तर त्यांनीं पहावें आपल्याच पायावर कुऱ्हाड मारून घेऊन रडत बसणारा मनुष्य तिरस्कारास पात्र होतो व कोणाही समंजस मनुष्यास त्याची बिलकूल दया येते नाहीं हेंहि त्यांनीं खूप समजावें इतकें ऐकूनही सुधारक वेळेवर जागे न होतील तर त्यांचे नशीब, त्याला लोक काय करणार!

१० फे० १८९१ आपला

( उमरावतीस्थ सत्य भक्त )

एडिटर यांस

महाराज,

आपली व माझी ही प्रथमच भेट आहे; अनादर होणार नाहीं अशी आशा आहे, पण नको. ही शंका तरी कशाला! आह्मा सर्व हिंदु लोकांवर व आमचे सनातन वैदिक धर्मावर दुसरी एक भयंकर गदा येऊन पडणार, अशा प्रसंगीं आह्मा पामर हिंदुचीं व विशेषतः हिंदू धर्माची कींव येऊन, माझ्या पत्रास जागा द्याल व सर्व हिंदु धर्माभिमानी लोकांस वेळेवर जागे कराल अशी खात्री आहे.

आतां या हिंदु धर्माचें होणार तरी कसें! या विचाऱ्यानें कोणत्या दिशेकडचे तरी प्रहार सोसावेत? इकडे अनादि वेद, स्मृति, पुराणें वगैरे खरें ज्ञानमार्ग सोडून आंग्ल भाषाद्वारें मिथ्या ज्ञान मद्यानें संध्या, जप, होमादि वर्ज केलेल्या युनिव्हर्सिटीची उपपद धारण करणाऱ्या सुधारक मंडळीची अवहेलना सोसावी? किंवा आंग्ल विद्येनें कलुषित मनें झालेल्या व मद्यमांस सेवन सशास्त्र असें कृतीवरून दाखविणाऱ्या परंतु संध्या, पोथी वाचन, भव्य गंधादि हिंदु धर्माच्या ठळक निशाण्या बाळगणाऱ्या दांभिक हिंदू पासून बचाव करावा? किंवा आमच्या कनवाळू मळबारी प्रभृति विजातीय मित्र मंडळींनीं आमचे सोंवळे धर्मांत चालविलेली ढवळाढवळ सोसावी? किंवा आमच्या बारा वर्षांचे आंतील बाल भार्यांचे शरीर उपभोगाचा हक्क काढून घेणारे स्कोबल साहेबापासून बचाव करावा? आपण कदाचित समजाल कीं हिंदू धर्माची संकट परंपरा येथेंच संपली. तर नाहीं. आमचे सरकार आमच्या अल्पवयस्क ऋतुमती बालांच्या भ्रतारास आजन्म कैदेंत टाकूनच तृप्त रहातें असें नाहीं तर आह्मां सर्व आर्यांचें निर्मूलन करण्याची सरकारानें एक नवीनच युक्ति काढली आहे. ती कोणती हें आपण समजलाच असाल. किंवा कदाचित नाहीं कारण आपण पडला सुधारक चमू पैकीं. पहा लक्ष्य द्या चालू महिन्याचे २६ तारेखस रात्री आह्मा प्रत्येकाचे घरीं सरकारचे दूत जाणार व घरांतील सर्व मुलेंबाळें स्त्री पुरुष वगैरेची गणना करणार. आपण ह्मणाल कीं प्रजागणती सरकार करीत आहे; स्तुत्य प्रकार आहे कारण गेले दहा वर्षांत समाजांत काय काय व कसे कसे फेरबदल झाले आहेत, लोकांत आंग्ल विद्येचा प्रसार कितपत झाला आहे, लोकांची सरासरीनें आयुष्य मर्यादा काय आहे वगैरे महत्वाची माहिती मिळते—तर आपणास आमचे हिंदू धर्माचें एक जंगी तत्व अवगत नाहीं असें ह्मटलें पाहिजे. कुटुंबातील इसमांची गणती केल्यानें प्रत्येक कुटुंबातील निदान एक दोन प्राण्यांचे आत्मे देहापासून यमराज निराळे करील हें धर्मांचें जाडें तत्व आपण श्रुति स्मृति वगैरे ग्रंथ धुंडाळा ह्मणजे समजून येईल किंवा प्रो. टिळकादि हिंदू धर्माचे स्तंभांची प्रार्थना करा ह्मणजे गाढ आधार दाखवितील.

तर हे सकल हिंदु धर्म रक्षकहो अज्ञ हिंदुजन समुदाय स्तुति प्रिय डिग्रीवालेहो उठा वेळेवर जागे व्हा पुन्हा एकवार मंडळीचे थवे गोळा करा व एतदर्थ "आर्य धर्माचा अधःपात होत आहे" वगैरे भीतिप्रद हस्त पत्रिका वाटा व हे येणारें "सेन्सस" ह्मणजे प्रजागणना नाहीं तर केवळ आर्य लोकांचें निर्मूलन होय असें प्रतिपादा. व हिंदु समाजातील गांवढळ मंडळी जमवून सह्यांचें जाडें ओझें आणखी एकदां लाट साहेबाकडे पाठवा व ज्या प्रमाणें स्कोबल साहेबांचे बिलाचें टर उडविली त्या प्रमाणें "सेन्सस" रूपीं संकटापासून हिंदू धर्माचें रक्षण करा.

ता० १४।२।९१ आपला

"दिखाऊ शत्रू"

वऱ्हाडसमाचार

मिती माघ शुद्ध ८ शके १८१२

फ्याक्टरी कमिशनचा रिपोर्ट बाहेर येऊन फार दिवस झाले आहेत व त्यांतील सूचना अमलांत आल्यास गिरणी वाल्याचा व गिरण्यांतील मजूरांचा कांहीं एक तोटा असल्या कारणानें निराळा व्यत्यय येण्याचा फारकरून कांहीं संभव दिसत नाहीं. या कमिशनचे रिपोर्टावर उत्तर हिंदुस्थानांतील मेंबर आफ कामर्स कडून अनकूल अभिप्राय प्रदर्शित झाले आहेत तरी त्यांनीं कमिशनाच्या चौदा वर्षां खालील मुला संबंधानें अर्धा दिवस काम करून घेण्याच्या सुचनेस आक्षेप काढिले आहेत व ते आह्मांस चांगले व मुद्देसूत वाटतात. चौदावर्षां खालील मुलांस कामाचा अर्धा दिवस नियमित केला तरी कमिशनच्या ह्मणण्या प्रमाणें ते शाळांतून चांगले शिकतील किंवा नाहीं या विषयीं मोठा संशय वाटतो. मुलाच्या योग्य संगोपना साठीं व शिक्षणा साठींही अर्ध्या दिवसाची सूचना आहे खरी परंतु वास्तविक गिरण्यांतील मुलांचें काम भारी नसून त्यांचें योग्य संगोपन होत असेंत व ते सूचने प्रमाणें त्यांनीं शाळे संबंधानें हेळसांड केल्यास एकीकडून अर्ध्या दिवसाची मजुरी बुडेल व शिक्षणही नीट होणार नाहीं.

संमतीच्या बिला संबंधानें अहोरात्र सर्व ठिकाणीं निरनिराळ्या प्रकारें विचार चालले आहेत त्या विचार सागराचें मंथन सहसा होणें नाहीं तरी आलिकडील अभिप्रायांचा रोंख असा दिसतो कीं हिंदुस्थानांत इतर देशा प्रमाणें कांहीं राक्षसी चाली आहेत तरी त्यां वरून नेटिवांवर अमानुषत्वाचा किंवा राक्षसी क्रूर वर्तनाचा अपराध येईल अशा प्रकारची कांहींएक वस्तुस्थीति नाहीं. सध्यां जी प्रचंड चळवळ चालूं आहे तिचे मूळ कारण परधर्मी राजाचें शासन शास्त्र आपणांवर लागू करण्याचा प्रयत्न चालला आहे हें होय. प्रथम इंग्रजी कायद्या वरून मि. मनमोहनघोस यांनीं साधार दाखविल्या प्रमाणें नवरा बायको मधील कोणत्याही दुष्ट संभोगास जबरी संभोगाची व्याख्या विशेषतस लागूं होत नाहीं. कां कीं त्याच्या मध्यें लग्नाला आवश्यक संमतीचें वय कायद्यानें ठरविलें आहे त्या ईयत्ते पूर्वी लग्न होऊं शकत नाहीं व त्या वया नंतर लग्न झाल्यावर कोणता ही अपराध जबरी संभोग या सदरा खालीं येऊं शकत नाहीं. लग्ना नंतर बायकोच्या तेरावे वर्षा पूर्वी होणाऱ्या अमानुष अपराधा बद्दल दोन वर्षे पर्यंत सक्त मजूरीची शिक्षा कायद्यानें सांगितली आहे त्या ठिकाणीं हिंदुस्थानांतील पत्नीच्या तेरावे वर्षा पूर्वीच्या भयंकर संभोगादि अपराधास बारा वर्षांच्या नवीन संमतीच्या कायद्यानें जबरी संभोगरूप अपराधाच्या सदरा खालीं आणून नवऱ्यास काळेपाणी किंवा दहा वर्षे पर्यंतची शिक्षा दिली जाईल. असा न्यायास सोडून भलता प्रकार घडत असण्याचें कारण नेटिव लोकांमध्यें अमुक वर्षी लग्न व्हावें अशी कायद्यानें ईयत्ता ठरविली नाहीं सबब अल्पवयांत लग्न झाल्यावर मागील जुन्या कायद्यानें दहा वर्षा पूर्वीच्या संभोगास जबरी संभोगाचें स्वरूप येत असे, परंतु तसले प्रकार घडणें संभवनीय नव्हतें व लोकांसही या अपराधा संबंधानें शंका येण्यास कांहीं कारण नव्हतें. नामदार नूलकर यांनीं कायदे कौंसिलांत बोलून दाखविलें कीं तीस वर्षां मागेंच कायद्यानें बारावें किंवा चवदावें वर्ष हें संमतीचें वय असें ठरविलें असतें तरी कांहीं एक बोभाट न होतां सर्व गोष्ट चांगली सुरळीत चालली असती; परंतु या म्हणण्याचा सारांश पाहूं गेलें म्हणजे लक्षांत येईल कीं नामदारांचें मत चुकीचें आहे कां कीं बारा किंवा चवदा वर्षाच्या कायद्यानें कांहीं निराळें खटले जबरी संभोगाच्या सदरा खालीं आलें असतें व त्या मुळें लोकांस त्या अपराधाचें खरें स्वरुप समजलें असतें. परंतु गृहस्थितींतला दुष्ट प्रकार उजेडांत आणण्यास मनुष्य कधीं तयार होणार नाहीं व साध्वी स्त्री नवऱ्या संबंधानें कोर्टांत तक्रार आणण्यास मरणान्त धजणार नाहीं. अशी समाजस्थिति राहील तों पर्यंत अपवातादि संभोगाचे प्रकार खेरिज करून कोणत्याही दुष्ट संभोगा संबंधानें सरकार दरबारांत खटला येणार नाहीं ही गोष्ट नामदारांनीं लक्षांत आणिली असती तर त्यांस प्रस्तुतच्या कायद्याची व नव्या बिलाची उपयुक्तता काडीमात्र झाली नाहीं व पुढेंही होणार नाहीं आणि त्या योगें इष्ट हेतु सिद्धीस न जातां फक्त नीतिविचारास व लोकमतास विसंवादी अशा कायद्या मध्यें जबरी संभोगाचा अपराध विवाहित स्त्री पुरुषांच्या व्यवहारा संबंधानें नमूद केला आहे तो फार कडक रीतीनें केला जाईल, आणि अशा प्रकारचें निराळें लांछन नवीन बिलानें कायद्याच्या पुस्तकांत पुन्हां नमूद केल्या सारखें होईल असा आमचा समज होत चालला आहे. इंग्रजी कायदेकानू सामाजिक प्रकरणांत सर्वैव लागू करावेत हा एक उत्तम मार्ग आहे. किंवा सामाजिक गोष्टी नेटीव धर्म संस्थावर सोपवून त्यांचे अधिकार जुन्या सुधारकांच्या अभिप्राया प्रमाणें निःशस्त्र होऊं न देतां त्यांस चांगला सरकारी जोर दिला पाहिजे; आणि प्रथम कायद्या मध्यें जबरी संभोगाची व्याप्ति विवाहिता संबंधानें काढून टाकण्याची योग्य तजवीज केली पाहिजे.

संमती वयाच्या बिला वरील भवति नभवती पासून एक अनिष्ट परिणाम असा घडत आहे कीं भिन्न भिन्न लोकांचें विचारवैचित्र्य लोका समोर येऊं लागल्या मुळें सुधारणा ही संज्ञा देखील लोकांस भेडावण्यास पुरशी झाली आहे आपली आपण सुधारणा करावी आणि सरकारी कायद्यानें सुधारणा होऊं नये ही गोष्ट कितीही खरी असली तरी सध्यां जें मोठें खूळ माजलें आहे त्यावरून लोकांचा सामाजिक प्रकरणांत उन्नती न होतां एका प्रकारें त्यांच्या बऱ्या वाईट आचार विचारांस चांगलें स्थैर्य येईल. पहिले रजोदर्शनाचे वेळींच गर्भाधान संस्कार झाला पाहिजे किंवा शास्त्रांनें कालावधीनें हो करण्यास सवड दिली आहे कां कीं तशी सवलत शास्त्र द्वारें मिळाल्यास सरकारी कायद्यास शास्त्रीय दृष्ट्या कोणत्याही प्रकारें प्रत्यवाय येणार नाहींत. बारावें वर्षा पूर्वी ऋतुप्राप्ति झाल्यास सरकारी कायद्याचें परिपालन करण्या साठीं शास्त्राची संमती असल्या कारणानें गर्भाधान लांबणीवर टाकतां आलें म्हणजे धर्म व कायदा या उभयतांची ही आज्ञा मोडल्या सारखें होणार नाहीं. तेव्हां शास्त्रांचें यथास्थित परिशीलन करून कांहो जणांनीं कायद्यास अनुकूल असे आधार काढिले आणि त्यावर कांहीं जणांनीं 'केसरी' पत्रांतून त्यो शास्त्राधारांचें योग्य खंडन करून सांप्रतच्या रूढ व्यवहारास शास्त्राधार दाखविले आहेत साधारणपणें कोणता ही पक्ष खरा ठरला तरी लोकांमध्यें धर्म संबंधीं रूढी व प्रचार आहेत त्यांस लोक धर्म मानतात आणि आपणांसही त्यांसच लोकांचा वास्तविक धर्म मानणें भाग आहे. या प्रस्तुत धर्मा प्रमाणें नवीन बिलानें लोकांच्या धर्म प्रकरणांत सरकारनें हात घातल्या सारखे होत आहे हें कोणाही प्रांजळ मनुष्यास कबूल करावें लागेल. अशा प्रकारें शास्त्राचे आधार दाखविल्यानें लोकांचीं मनें आपल्या प्रचारांतील धर्मावर आसक्तीनें कायम होत जातील तेव्हां बारावर्षे पर्यंत बिवाहिव तरुण मुलींचें कायद्यानें संरक्षण करण्याचा सरकारचा हेतु वृथा होईल असेंही वाटतें. कारण कायदा नको कां कीं त्या मुळे सरकारचा धर्मांत हात पोंचतो व सरकारच्या कायद्या शिवाय सुधारणा होणार, कां कीं त्या वाचून लोकांची प्रवृत्ति 'शास्त्रोक्त' वर्तना पासुन तिळप्रायही टळणार नाहीं असें एका तऱ्हेचें कोठें सूज्ञ सुधारकां पुढें असण्याचा संभव आहे आणि अशा कठीण अवस्थेंत कायदा

पसार होतां किंवा कायदा पसार झाला नाहीं तर निदर्शनाला या वादाविवादाची काय फलश्रुति होईल याचें कांहींच अनुमान बांधतां येत नाहीं. लोकांनीं हें पूर्णपणें लक्ष्यांत वागविलें पाहिजे कीं कायदा पसार होवो किंवा न होवो त्या कायद्यांतील मतलबाहून हो फार मोठी सुधारणा आपल्या प्रस्तुतच्या चाली रीतीत अवश्य झाली पाहिजे.

The Berar Samachar

MONDAY, FEBRUARY, 16, 1891.

## "WHY TWELVE AND NOT SIXTEEN?"

(Continued from our last issue.)

The second object of the bill is to prevent immature cohabitation. The object is indeed commendable. But the question is whether society should of its own accord agree to it or the Govt. should force the society to do it.

The first objection to legal interference is grounded on the Proclamation issued by Her Majesty the Empress of India. Diversity of race and religion made it a necessity on the part of government to declare non-interference in religious matters and this Indian Magna Charta is included in the public document of Her Majesty's Proclamation of 1858. The Viceroy has interpreted the bill in a manner that there is no interference if the protection accorded to non-wives be extended to child-wives and has further declared that the Proclamation does not lay down *absolute* non-interference. But the plea of humanity put forth by Mr. Nulkar, the former legislation in Hindu Wills Act &c, as quoted by Mr. Telang in justification of further encroachments in social matters, and the mention of 'no new crime in the bill' by Mr. Scobble are in themselves sufficient proofs to point out the aggressive nature of the bill which threatens to interfere with social and religious customs. We are highly obliged to the Editor of the 'Kesari' and are much surprised to see how a man like Dr. Bhandarkar could with all his ability misrepresent and obscure the religious texts to drown the truth into his hobbies. Howsoever true and triumphant, consistent and accurate may be the scholarly criticism travelled against Dr. Bhandarkar's note and the rather shallow views of Mr. Telang the Kesari has it appears done full justice to the *permissive* nature of the religious texts on Garbhadhana.

Hence the reader is naturally led to conclude that the law is directly interfering with religious convictions of the Hindus. We are not at the same time unmindful of the importance of having some texts of scripture fully and faithfully accepted and revered for keeping the mass in the proper and virtuous path— and also of the pressing necessity of teaching them to view the religious doctrines in a manner to facilitate a constant progress and reform. But much caution and wisdom should be employed in giving a proper turn to the minds of the public. If morality serves Religion as her hand maid the mistress' directions given only in outline will be wisely interpreted and carried out by her hand maid in so far as the persons under the latter's sway, do learn to respect and revere the force of religious tendencies of the public, to strike out the just balance resulting therefrom, and to weight the resultant force not according to its quantity but quality.

To develop these resources of social happiness is in short the way to social improvement.

Even if allowed, the legal interference is not necessary as far as the present bill goes. It will first give a fierce shock to the naturally delicate feelings with which religious matters are entertained and will tend to unsettle the sense of Duty. It will greatly lessen the confidence of the public in their government when the latter is *prima facie* going to undo, to the very letter, the Indian Magna Charta. It is wise and polite to regard the interests of humanity in spite of all the inconsistencies and difficulties in which it involves us. The question next springs whether there are any such claims which society disregards. Dr. Kirtikar has boldly asked the reformers to observe with scrupulous and religious anxiety the sincerity of purpose which the interests of humanity require of them. If society allows of exceptions— and very few they are— to consummate marriage before the age of twelve it is not of prime importance and vital interest in these days of enlightenment and the gradual progress of social reform to raise the age of consent from ten to twelve when society is checking these evils of immature cohabitation by its mysterious and natural growth. Even the present threatening of legal interference will go a great way to have the desired effect without any active measure. The proposed reforms will therefore need no governmental action.

If the bill is educative and is to strengthen the hands of the fathers of girls we should not shrink from going a step further to ask of our reformers as true patriots a memorial to the government to raise the age of consent to sixteen. Religion affords some strong authority for this reform. If the public is to be shocked at all by legal interference, let us have a good move or none at all. Otherwise the present remedy is worse than the actually prevalent morbid state.

The majority— and that too an over whelming majority- is against the bill It is fighting for the sake of a principle of action involved in the question of legal interference. While the advocates of the bill are crying for the simple reform which initself no single member of the Native community is unwilling to introduce smoothly in his house. We shall fairly condemn the loud cry of this 'enlightened minority' and hold up to ridicule their tactics of making light of religion and public opinion. The machine is not certainly worth the grease.

We are aware that the need of ultra-reform which we are proposing for the acceptance of reformers will require of them an accurate, severe and diligent study of social dynamics before they adopt any measure to have it brought into force. Any argument that one will hold in favour of this bill will equally hold water for a new bill to raise the age of consent to sixteen. In fact the present bill is useless which the new one will be impossible. Let the reformers understand the proper degree of parental responsibility and let them educate the masses in the light and learning they will acquire from a due consideration of the prospects of life a graphic description of which we give below.

To raise the average quality of life and not its *quantity* we should have a more rational competition for the privilege of parentage. Before the smallest prospect is visible of decent nurture and training men and women are free to have children to be handled, both sexes together, in squalid dens where morality and religion are well-nigh impossible, to be launched with no start in life on a glutted labour- market: the men goaded by hunger— a constant menace to social order, and the women with the only choice between prostitution and the brink of starvation. Unless we shut our eyes to the conditions of life, unless we forget that but for some sort of parental prudence and fore-thought in the past the whole race might at this moment be grovelling in abject poverty; unless we ignore the fact that wages fall with increased competition, that mankind have an indefinite capacity for adding to their numbers and that almost every form of human weal and woe tends to be inherited there is but one conclusion open to us. The only remedy for half the evils that flesh is heir to is to teach parental responsibility to avoid 'the world cannot but be well-stocked with want and misery.'

Lastly, a word of advice to the advocates of the bill. They disregard the ties and bonds of their society when they claim to act upon the light of their individualized minority. They are chimerical; when they ridicule the religion they are born in and the social status they inherit from their ancestors. Though elective principle is demanded in political matters through their activities and movements society is still certain to trust them with no representative character in social affairs. Indeed their mischievous excesses are appalling and will only tend to one more most detested sect.

---

Captain R. V. Garrett, Bengal Staff Corps, an Assistant Commissioner of the 2nd (Officiating 1st) class, is appointed to be Assistant Director of Land Records and Agriculture, in the Hyderabad Assigned District, with effect from the date of his assuming the charge.

G. I.

---

ACKNOWLEDGEMENT.

We acknowledge with thanks the receipt of the following:—

Report on the Administration of H. A. D. for the year 1889-90.

---

## नोटिशीचें उत्तर.

राजश्री नारायण पांडुरंग देशपांडे प्रगणें पिंपळगांवराजा यांस नोटिशीचें उत्तर देणार गणेश मोरेश्वर देशपांडे प्रगणें पिंपळगांवराजा तालुके मलकापूर जिल्हा बुलढाणें. याजकडून नोटीस देण्यांत येतेकीं, आमची व तुमची जमीन आहे तिच्या वाटण्या झाल्या आहेत. फक्त परगांवची जो जमीन अहे ती वाटण्याचा राहिली आहे. काळबाई व कजबे पिंपळगांव येथील जमीन वाटली आहे, मात्र बाकीचे जमिनीचें हिस्से आपणांस देण्यांस मी तयार आहे. पूर्वीं ज्या वाटण्या झाल्य, त्या पंच मार्फतच झाल्या आहेत. त्या पंचांचीं नांवें खालीं लिहिलें प्रमाणें.

१ भगवंत चिमणाजी कुळकर्णी राहुडकर २ सदाशिव मारोती कुळकर्णी. ३ गोविंद सखाराम गुमास्ते कुळकर्णी.

येणें प्रमाणें पंच होते. त्यांचे समक्ष ह्या वाटण्या आल्या आहेत आणि बाकी राहिलेल्या जमिनीचें हिस्से मी पंच मार्फत देण्यास कबूल आहे.

सन १२९९ फसली सालचे मौजे खेडे प्रगणें नांदुरा तालुके मलकापूर येथील इनामाचे रुपये ५० पन्नास दिलें नाहीं तर आपण मौजे कुंत्रे फळ येथील इनामाचे रुपये मी आपले हातानें तेथून रक्कम आणून आपणांस नगदी रोख २०० रुपये दिलें ही रक्कम आपण आपले कन्येचें लग्न करितां घेतली होती. त्या पैकीं तुमचे हिशाचें शंभर जाऊन बाकी माझे तुमचे कडेस शंभर रुपये येणें होते त्यांतून तुम्ही मजला पन्नास रुपये दिलें बाकी पन्नास रुपये येणें राहिलें आहेत. ते आज तारखे पासून आठ दिवसाचें आंत द्यावे. नाहींतर त्याजबद्दल रीतीप्रमाणें कोर्ट मार्फत तजवीज करावी लागेल व जो कोर्ट खर्च लागेल ता तुह्मास द्यावा लागेल.

आपली समाईक जो जुनी हवेली आहे. तिचे पश्चिम ह्मणजे दिवाणखान्याचे मार्गे वाटणींत आपण माझें संमती खेरीज तुह्मी आड खोदला. आणि माझे जमिनीचा एक भाग खोल पाडला बरें जर आपण ती जागा माझी मजला परत द्यालतर मी हीं आपली समाईक जागा ह्मणजे गाईचे गोठ्यांतील तुमची जो भागनी आहे ती मी आपणास परत देईन. नाहींतर त्याचें ऐवजी ह्या संबंध जागेवर मी आपली पूर्ण मालकी आहे असे समजून हल्लीं जी मी जागा नवीन बांधीत आहे तिच्या वापरण्याच्या मोठ्या दरवाजाचें काम सुरू करितो. अगर तसे तुह्मास मंजूर नसलतर भार्गे जी तुह्मा माझे जागेवर तुमची मालकी करून घेतली आहे ती जागा माझी मला ही नोटीस पावल्याचे आठ दिवसांत परत द्यावी नाहींतर रीतीप्रमाणें तजवीज करून खर्च सोसवा लागेल. व दुसरें तुह्मी माझा सार्वजनिक लोकांचा बाजारांत हरहमेश जाण्या येण्याचा मार्ग होता. तो आपन बंद केला आहे तो वडिलोपार्जित चालत आलेला असून आपण सरकारला चपार गांवांतील कोणाही संभावित गृहस्थांस न विचारतां एकदम बंद केला तर तो मार्ग नोटीस पावल्या दिवसांसून आठ दिवसाचें आंत खुला करावा नाहींतर सरकार तर्फे त्याचा बंदोबस्त करीन व त्याजबद्दल जो खर्च लागेल तो आपणांस द्यावा लागेल. कळावे तारीख १३ माहे फेब्रुवारी सन १८९१ इसवी.

( सही )

गणेश मोरेश्वर देशपांडे

पिंपळगांवराजा.

दस्तुर खुद्द.

---

## वऱ्हाड.

आह्माकडे उमरावती व वाशीम या दोन ठिकाणाहून इंग्रजी व मराठींत बरींच पत्रें आली आहेत परंतु स्थलसंकोच्यामुळें ती घेतली नाहींत.

मि० ढेअर यांना वऱ्हाडांत डायरेक्टर ऑफ ल्यांड रेकार्डसआणि आग्रिकलचर अ० क्या० आर० व्ही० ग्यारेट अ० क० याना असिस्टंट डायरेक्टर आफ ल्यांड रेकार्डस आणि आग्रिलचर नेमिलें.

मि० गोविंद नाईक अभ्याची यांची एलिचपुराहून उमरावती येथें बदली झाल्या प्रमाणें तेथें येऊन कामावर रुजू झाले.

रा० रा० बळवंत नरसिंह डे० ए० इं० बुलढाणें यांनीं दोन महिन्याची रजा वाढविली आहे. त्यांचे जागी रा० रा० श्रीधरपंत पिंपळखरे उमरावती येथील अ० व्ह० स्कू०चे हेडमास्तर यांना नेमिलें आहे.

अकोल्यास म्युनिसिपल इलेक्शनमध्ये रा० सा० देवराव विनायक रा० रा० गोपाळराव सावरकर, मि० सिलिमखा, डा० हरी वामन भट मौलवी हकीमुद्दीन व मि० गॉडफ्री हे मेंबर निवडले गेले आहेत.

---

## वर्तमानसार.

सुरतेंत खारी मशीदी जवळ राहणारा महंमद बीसा मुमा म नांवचे मुसलमानास तारीख १५ गुरुवार दिवशीं उजव्या हाताचे आंगट्याच्या किंवा आंगठ्याचे नखांस एक कांटा लागला तो काढल्या नंतर चार चार मिनिटानें त्याच नखांतून अणखी कांहीं कांटे निघूं लागले दुसरे दिवशीं शरीराच्या दुसऱ्या भागांतूनही तसेंच कांटे निघू लागले. नंतर तोंडातूनही निघूं लागले. हा चमत्कार पाहण्या करितां डाक्टर, मंत्री वैद्य, असे निरनिराळ्या करामतीच्या लोकांचा मोठा मेळा जमला परंतु वितर्क्यास ही त्यांतील इंगीत कांहीं कळेना. त्यांतील एक कांटा मुंबईस "कासिदे मुंबई" या पत्राच्या मालकानें आपल्या हापिसांत लोकाव लोकनार्थ ठेवला आहे. भूत, डाकीण, मंत्र, तंत्र, झूट म्हणणारांनीं तो अवश्य पाहून खात्री करून घ्यावी आणि त्यांना कांहीं त्यांतील इंगित कळून आल्यास मेहरबानीनें प्रसिद्धीस आणावी.

स्वयं प्रकाशित वनस्पतिः—उकिरड्यावर, शेणाच्या गाध्यावर वगैरे ठिकाणीं उगवण ऱ्या छत्र्या आमच्या वाचकांस ठाऊक असतील परंतु त्यांतच अशा कांहीं असतात कीं त्यांच्या आंगीं असा प्रकाश असतो कीं साधारण बरेंच मोठे छापील अक्षर त्यांच्या हातावाली धरून वांचलें असता वाचतां येतें. वटाव्याच्या आंगीं सुद्धा प्रकाश आहे. त्यांतील सत्वाचें पृथक्करण होऊं लागले म्हणजे तो प्रकाश पडत असतो. अमेरिकेंत तर कांहीं लहान झाडें व गवतें आहेत तीं जेथें उगवलेली असतात तेथें त्यांचा रात्रीं चांगला प्रकाश पडतो,

स्वभाषेचें ज्ञान पक्कें झाल्या वांचून परकी भाषा शिकविली जाऊं नये म्हणून पुण्यास एक सभा स्थापन झाली असून तिचा विचार या संबंधानें सरकारांत कायदा मागण्याचा आहे असें ज० हि० कर्ते लिहितात.

२०० वर्षांचा एक पाळणा इराणी राज घराण्यांत आहे किती तरी राज घराण्यांतील इसम निजले असतील!

बंगाल इलाख्यांतून ५८४७४३९ रु० म्हैसूर प्रांतांतून ५११३१०४ रु०, मद्रास इलाख्यांतून ३३८८७०७ रु०, मुंबई इलाख्यांतून ५९०५६०२ रु०, ब्रम्हदेशांतून १३११६६७ रु०, पंजाब प्रांतांतून १२८०३६६ रु०, राजपुतान्यांतून १२२६८०३ रु०, असाम प्रांतात ९८०८५२ रु०, मध्य वायव्य व औंध प्रांतांतून १३३८७८९ रु० निजाम प्रांतांतून ३३७३६७ रु०, मध्य हिंदुस्थानांतून २४७७९४ रु०, बलुचीस्थानांतून १२११७० रु० बडोदें प्रांतांतून ७८९२२ रु०, काश्मीर प्रांतांतून ४५३५८ रु०, अजमीर मारवाड प्रांतातून ३५७४० रु०, कुर्ग प्रांतांतून २८१८५ रु० चेखनीज पदार्थ ( सोनें, चांदी, लोखंड, तांबे, क्षार, नवरत्नें, रॉक आईल, अंबर, हिरे, अमोलिक खोंडे, जस्त, पितळ, कोळसे दगडी व मोती इ० ) निघाले असें १८८९।९० सालच्या रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे त्यावरून कळतें. पृथ्वीला नवरत्ना वसुंधरा अशी जो संज्ञा आहे ती कांहीं खोटी नाहीं.

मुंबई येथें रा. रा. मदनराव माधवरावी फडके या नांवाचें पेन्शनर गृहस्थ मोठे कसब असून कल्पक आहेत. यांनीं पुढील प्रमाणें कळीच्या जिनसा तयार केल्या आहेत—:
( १ ) कळीची पेटी— या पेटीस किल्ली दिली म्हणजे या वरील दोन नायकिणी व मागील सार्जिंदे सुमारें १५ मिनिटें आपापलें काम उत्तमरीतीनें बजावितात. ( २ ) कळीचा मोर—यास किल्ली दिली म्हणजे आपला पिसारा वर धरून नाचूं व चालूं लागतो ( ३ ) कळीचा हत्ती हाही सुमारें १५ मिनिटें चालू लागतो ( ४ ) पितळेचा डोलाराचावी दिल्यावर ६ कलाक आपोआप हालत असतो. ( ५ ) कळीचा पंखा—एकदां चावी दिली म्हणजे ६ तास एकसारखा मनुष्यानें हालविल्या प्रमाणें हालतो व वारा चांगला येतो. ( ६ ) पाण्याचें कारंजें—एक सारखें उडत राहतें. ( ७ ) माग--नव्हतऱ्हेच्या फिती यावर निघून स्वस्तात पडतात.

ग्या० सिं०

अमेरिकेंतल्या मडमा इकडील पार्शी बायका सारख्या साड्या नेसून पदर घेऊं लागल्या आहेत. नव्या तऱ्हेचे शौक युरोपियन व अमेरिकन स्त्रियांना फार आहे हें ज्यांस माहित आहे त्यांस वरील बातमी ऐकून फारसे आश्चर्य वाटणार नाहीं.

काच खाणारा शिद्दी— इंग्लंडांत वेस्ट मिनिस्टर येथें व्हिट्रिओ या नांवाचा एक शिद्दी आला आहे. व तो तेथे कांच खाण्याचा आपला अद्भुत पराक्रम लोकांना दाखवीत आहे. नुकताच त्यानें तेथील डॉक्टर व वर्तमानपत्रकर्ते, यांच्यापुढें आपला चमत्कार करून दाखविला. त्याला सकाळी थोडासा फराळ करावयाचा होता, व त्या फराळाला सर्वांसमक्ष त्यानें कांहीं कांचेच्या चिमण्या ग्लोब तोंडांत घालून कडाकड चाऊन खाऊन दाखविली नंतर कोळसा, कुप्या, पेंढा, फुटक्या बशा, बरण्या बाटल्या, इत्यादि वस्तू तोंडांत घालून, त्याप्रमाणेच करून दाखविलें. मागाहून त्याचे तोंड तपासलें परंतु त्याला कोठेंच इजा झालेली दिसली नाहीं. सी. ब.

मद्रासेंत दुष्काळ— मद्रास इलाख्यातील चिंगलपट, बेलोर, कडाप्पा, उत्तर आणि दक्षिण अर्काट आणि तिनिवेली ह्या जिल्ह्यातील पिकें पाऊस न पडल्यामुळें अगदी वाळून गेली. मैलापूरची स्थीति फार भयंकर झाली आहे सरकारास ह्या जिल्ह्यातील भयंकर स्थीति माहीत असल्या मुळें जागो जाग रिलीफची कामे सुरू करण्यासाठीं मद्रास सरकारानें तुर्त ५ लक्ष रुपयांचें सांक्शन दिलें असून कित्येक ठिकाणी रिलीफची कामें सुरूही झालीं आहेत. बोर्ड आफ रेव्हिन्यूचे एक मेंबर दुष्काळ ग्रस्त भागची प्रत्यक्ष स्थिति कशी आहे हें पहात त्या भागास फिरत आहेत. तांदूळ अतीशय महाग झाला आहे.

खोजकचा बोगदा— सरहद्दीवर जो नवी रेल्वे बांधण्याचें काम सुरू आहे त्या रस्त्यावर हा बोगदा तयार होत आहे. हा तयार करण्यास दर यार्डास १०००रुपये किंवा एकंदर बोगदा तयार करण्यास पन्नास लक्ष रुपये खर्च होईल. हिंदुस्थानांत एवढा मोठा बोगदा दुसरा नाहीं.

शु० सु०


## सचित्रक्याटलाग



आर. डी. कानिटकर.
आणि कंपनी
मुंबई गिरगांव ह्याचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्ध्या आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल.



## जाहिरात.

एलिचपूर येथें होणारा सर्व प्रकारचा माल कोणास पाहिजे असल्यास आह्मांस कळवावें माफक कमिशन घेऊन पाठवीत जाऊं. विशेष माहिती करितां टिकीट पाठवा.

जी. डी. कविटकर
मर्चंड आणि कमिशन एजंट
शहर एलिचपूर.


पंजाब नादारी मुकदमा नंबर ३३ सन १८९०

( नमुनी जी )

विद्यमान नादारी कोर्टाचे जज्ज जिल्हे आकोले.

सर्वत्र लोक यांस नोटीस. देण्यांत येतें कीं विठोबा वल्लद जानजी व पुरनाजी वल्लद विठोबा राहणार मौजें सांगव तालुके खामगांव हा नादारी आहे असा आज तारिख ७ माहे फेब्रुवारी सन १८९१ इसवी रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख ७ माहे मार्च सन १८९१ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपल्या तर्फेचा असाईनी नेमून देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जीचा निकाल करण्या करितां नेमला आहे.

नादाराच्या सुटके संबंधी ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्या बद्दल आठ आण्याच्या ष्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आणि त्याज बद्दल ज्या साक्षीस समन्स करण्याची इच्छा असेल त्यां साक्षी दारांचीं नांवें नमूद करावी. ही नोटीस जमण्याकरितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवसतरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्याकरितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत.

ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यानीं आठ आण्याच्या ष्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञालेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे ष्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल ऑफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ लिहावी. आणि ती यादी टपालाकडून कोर्टास पाठवावी. म्हणजे ते दावे रजिष्टरी दाखल होतील. कळावे ११।२।९१ इ.

Manicksha Rattanji
नादारी कोर्टाचे जज्ज.
जिल्हा आकोले.

वऱ्हाड वक्तृत्वोत्तेजक सभेचा
अठरावा समारंभ

सर्वांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं, शहर उमरावती येथें या सभेचा समारंभ शुक्रवार तारीख २७ माहे मार्च सन १८९१ रोजीं सुरू होणार आहे. समारंभाची जागा पुढें कळविण्यांत येईल.

चालूं सालीं भाषणा करितां दोन विषय नेमले आहेत.

विषय १ ला

सुधारलेले देशांत कुटुंब व्यवस्था (Domestic Coverament) किती प्रकारची आढळतें. त्यां पैकी आपले देशांत कोण कोणत प्रकारची होऊन गेली, व हल्लीं तिचें स्वरूप कसें आहे? तींत सुधारणा करण्याप जागा आहे कीं काय, असल्यास ती कोणत्या रीतीनें करणें इष्ट आहे हें सांगावें.

विषय २ रा.

राज्य व्यवस्थेचे निरनिराळे प्रकार कोणते आहेत? त्या प्रत्येकाची माहिती देऊन त्यापासून रयतेचें कसें हिताहित होतें तें सांगावें व त्यां पैकीं हिंदुस्थानच्या हल्लींचे स्थितीस कोणता राज्यव्यवस्था योग्य आहे याचें सकारण विवेचन करावें.

बक्षिस—पहिल्या विषयाला पाहिलें बक्षिस रुपये ३० चें व दुसरें रुपये १५ ठेविलें आहे.

दुसऱ्या विषयास पहिलें बक्षिस रुपये २५ चें व दुसरें १० चें ठेविलें आहे.

( १ ) उमेदवाराचें वय १८ वर्षांहून कमी नसावें.

( २ ) प्रत्येक उमेदवाराचें भाषण अर्ध्या तासांत संपण्या जोगें असावें, परंतु अयोग्य वाटल्यास अर्ध्या तासापूर्वींच भाषण बंद करण्याचा किंवा अधिक वेळ पर्यंत चालूं ठेवण्याचा अधिकार परीक्षकांस आहे.

( ३ ) कोणी उमेदवार कोणाही व्यक्तीस अनुलक्षून भाषण करील किंवा सरकारच्या विरुद्ध भाषण करील, किंवा बीभत्स शब्द भाषणांत आणील तर त्याचें भाषण बंद करण्यांत येईल.

( ४ ) प्रत्येक उमेदवारानें आपलें भाषण लिहून सभेच्या सेक्रेटरी जवळ आणून दिल्या शिवाय त्यास भाषण करण्याची परवानगी दिली जाणार नाहीं.

( ५ ) नेमलेल्या विषया पैकी कोणत्याही विषयावर भाषण करण्यास उमेदवारांस परवानगी आहे.

( ६ ) भाषण करण्यास येणाऱ्या उमेदवारांनीं आपले अर्ज ता० १३ माहे मार्च सन १८९१ इसवीचें आंत सेक्रेटरीकडे उमरावती प्रमोदसिंधु छापखान्याचे पत्यावर पाठवावे, आणि समारंभाच्या पूर्व दिवशीं सेक्रेटरीस भेटावें.

नेमलेल्या अगर दुसऱ्या एखाद्या स्वतंत्र विषयावर सन्मानार्थ भाषण करण्याची कोणा गृहस्थांची इच्छा असल्यास त्यांस सवडी नुसार परवानगी देतां येईल.

गोपाळ वामन बापट बी. ए.
यशवंत गोविंद केसकर
व० व० स० सेक्रेटरी.

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची अगाऊ रु० ५ टांक हाशील ०।२
सहामाही " ३ " ०८
साळअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास.......................... ०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........०१

Rs.
per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 "1Rs. 8 as
Six monthly............3 " 9 as
Single copy.......................................4as

Advertisements
Below 10 lines...2R
per line over10...4 as
Repetition per line3

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXV AKOLA MONDAY 23 FEBRUARY 1891 NO 8

वर्ष २५ अकोला सोमवार तारीख २३ माहे फेब्रुवारी सन १८९१ इ० अंक ८

### RULES IN REGARD TO REGISTRATION OF BIRTHS AND DEATHS.

The following rules for securing a proper registration of births and deaths made at a special meeting by the Municipal Committee of Akola, under section 116.C of the Berar Municipal Law, 1886, having been confirmed by the Resident are hereby published for general information. They will be brought into force from the 1st of April 1891:—

*Rule* 1.— On every birth of a child within the limits of the Municipality, the father or the mother or guardian of the child, or in case of their absence, or death, or inability on account of sickness, or other similar cause, any person living in the house in which the child was born, or any person who was present at its births, shall within 72 hours from the time of birth give information on the following points at the municipal office, or to the divisional member of the committee in whose division the child was born, or to his peon, or to any other member of the committee appointed for the purpose, or to the Conservancy Inspector if there is one:—

(1) The division and street of the municipality in which the child was born.

(2) Names of its parents.

(3) Caste, occupation and religion of the parents.

(4) Sex of the child.

(5) Date of the child's birth.

(6) Whether] the child was born alive, or was still-born, or whether having been born alive it died immediately after birth.

*Rule II.*--- on every death within the limits of the municipality a member of the family to which the deceased belonged, or in case of there being no such member, or such member being unable on account of absence, sickness, or other similar cause, any person living in the house in which the death took place shall, within 72 hours from the occurrence of the death, give information on the following points at the municipal office, or to the divisoinal member of the committee in whose division the death took place, or to his peon, or to the member of the committee who has care of the conservancy and sanitation of the town, or to the Conservancy Inspector:—

(1) The division and the street of the municipality in which the death took place.

(2) The name, caste, religion, sex and age of the deceased.

(3] The disease causing death and how many days ill.

(4) The date of the death.

(5) The occupation of the deceased.

*Rule III.*--- Any municipal officer receiving information under Rules I and II from any person shall, if required furnish him with forms in the form given in the appendices A and B to these rules as may be repuired, and shall, on the receipt of the information, give a receipt to the person furnishing it in the form given in Appendix C.

*Rule IV.*—Whoever refuses or neglects to give information in accordance with Rules I and II, it being his duty under those rules to give information, shall, on conviction before a Magistrate, be liable to pay a fine not exceeding Rs. 5.

B.289

17-2-91 V. R. Mudholkar
Secretary Municipality
Akola.

APPENDIX A.

| | |
|---|---|
| Serial No. | |
| Name of division | |
| Names of parents. | |
| Caste, occupation and religion of parents. | |
| Sex of the child. | |
| Date of child's birth | |
| Whether child was born alive or was still-born died immediately after birth. | |
| Name of informant. | |
| Signature of the informant. | |
| Remarks. | |

Dated 189

*Signature of Municipal Officer*

APPENDIX B.

| | |
|---|---|
| Serial No. | |
| Name of division | |
| Name of street | |
| Name of the deceased | |
| Caste, religigon and occupation | |
| Sex | |
| Age | |
| The cause of death and how many days ill | |
| The date of death | |
| Name of informant | |
| Signature of informant | |

Dated 189

*Signature of Municipal Officer*

APPENDIX C

Serial No.

*Receipt for having given information of* { *birth and death*

Year 189

Municipality's Seal.

No fee is charged for this receipt.

## सचित्रक्याटलाग



आर. डी. कानिटकर.
आणि कंपनी
मुंबई गिरगांव ह्याचा नवीन
तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी
अर्धा आण्याचें तिकिट
पाठविल्यास मिळेल.

## जाहिरात.

एलिचपूर येथें होणारा सर्व प्रकारचा माल कोणास पाहिजे असल्यास आह्मांस कळवावें माफक कमिशन घेऊन पाठवीत जाऊं. विशेष माहिती करितां टिकीट पाठवा.

जी. डी. कविटकर
मर्चंड आणि कमिशन एजंट
शहर एलिचपूर.

वऱ्हाडसमाचार

मिती माघ शुद्ध १५ शके १८१२

## लोकमतवृद्धि

(२ अंकावरून पुढें चालूं)

सतराव्या शतकाच्या आरंभापर्यंत इंग्लंडांतील वर्तमान पत्रांची स्थिति बिलकूल चांगली नव्हती, त्यांना उघडपणें आपलें मत प्रदर्शित करण्याची मोकळीक नव्हती. वतमान पत्रकार फार अशिक्षित होते. त्यांना आपली खरीं कर्तव्यकर्में काय हें बिलकुल अवगत नव्हतें. यामुळें त्यांना सर्वांशीं अधिकारापन्न प्रधानमंडळावर अवलंबून रहावें लागत असे. शिवाय प्रधान मंडळ व राजा प्रजेचें बरें वाईटाकडे लक्ष न देतां स्वसत्तेच्या जोरावर राज्यकारभार करीत असत यामुळें त्यांना ही आपल्या प्रतिपक्षाचा मोड करण्याकरितां या अप्रतिष्ठित वर्तमान पत्रकारांची मदत घ्यावी लागत असे. या वेळेचे लेख इतके निंदापर व बिभत्स शब्दांनीं पारेपुरित आहेत कीं ते हल्लीं आपण वाचले तर आपणाला वीट आल्यावांचून रहात नाहीं. ज्या कालीं पोप जानसन, गोल्डस्मिथ तसेंच ह्यूम, राबसन वगैरे असे मोठमोठे प्रसिद्ध ग्रंथकर्ते होऊन गेले त्याविळीं वर्तमान पत्रांची अशी शोचनीय स्थिति असावी हें मोठें नवल नव्हे काय? परंतु तिसरा जॉर्ज सिंहासनारूढ झाल्यावर वर्तमान पत्रांत फरक दृष्टीस पडला. विद्या प्रसार बराच झाल्यामुळें लोकांची वर्तमानपत्रें वाचण्याची उत्कंठा पुष्कळ वाढली व ते सर्व जनिक कृत्यांत बरेंच मन घालूं लागले. लोक शिक्षण वाढविण्या विषयींही या वेळेस पुष्कळ परिश्रम केले. अ.ढलता-हलक्या दराचे लोकांना सोईवार शिक्षण देण्या करितां ठिकठिकाणीं शाळा स्थापन झाल्या. मजूरदार लोकांना आठवड्यांतून रविवारींच फक्त रिकामा वेळ सांपडत असल्या मुळें त्या दिवशीं त्यांना या शाळांतून विद्यादान देण्याचा परिपाठ घातला. तसेंच या लोकांना या दिवशीं वर्तमानपत्रें वाचण्यास मिळावीं म्हणून सोंप्या भाषेंत लिहिलेलीं वर्तमानपत्रें याच दिवशीं होऊन तीं फुकट गरिबागुरिबांना वाटली जाऊं लागलीं हल्लीं आपल्या इकडे मुंबईंस फक्त एक सर्क्युलेटिंग लायब्ररीची स्थापना नुकतींच झाली आहे. परंतु इंग्लंडांत याची स्थापना होऊन ७५ वर्षें होऊन गेलीं आहेत. तसेंच लहान लहान शहरांतून छापखाने सुरू झाले. लोकांना समजेल अशा तऱ्हेनें शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार होण्या करितां लहान लहान निबंध लिहून फुकट वाटून देत असत. सर्व विद्या संग्रह कोशांची मदत मिळाल्या मुळें पुष्कळ उपयोग झाला मजुरदार व व्यापारी लोकांनीं वाचन शाळा काढल्या व तेथें ते व्यवहारिक विषयांवर नेहमीं वादविवाद करूं लागले. कोर्टांत विशेष महत्वाचे खटले येत त्यांच्या चौकशीची अथ पासून इतिपर्यंत हकीकत दररोज वर्तमान पत्रांतून प्रसिद्ध होऊं लागली अशीं कांहीं वर्तमानपत्रें निघालीं कीं त्यांत फक्त राज्य प्रकर्णी संबंधीच विषय येऊं लागले. दिवसानुदिवस लोकांची विद्याभिरुचि वृद्धिंगत होत गेली व त्या मुळें विलक्षण परिणाम घडून आला. पूर्वीं वर्तमानपत्र कारांना श्वानवृत्ति धारण करून आपल्या पुरस्कर्त्या प्रधान मंडळालाच खुष करावें लागत असे. परंतु आतां लोकांना विद्या व वाद यांची अभिरुचि लागल्या मुळें त्यांना आपलें स्थित्यंतर करावें लागलें त्यानीं पूर्वींचा आरला निंद्य क्रम सोडून देऊन लोक कल्याणार्थ परिश्रम करण्याचा यत्न चालविला. लोकांच्या हिताहिताच्या ज्या गोष्टी पार्लमेंट मध्यें होतें त्या सर्व पत्रांत ते प्रसिद्ध करूं लागले. त्या गोष्टी लोकांना समजल्यामुळें घरीं दारीं-समाजांत, मित्र मंडळींत, क्लबांत, व मोठ मोठ्या सभांत त्यांचेवर चर्चा होऊं लागली, व त्यांचें खरें स्वरुप बहुश्रुत होऊं लागलें. वर्तमान पत्रकारांची अशी जेव्हां लोकांना मदत मिळत गेली तेव्हां त्यांना असें वाटूं लागलें कीं हौस ऑफ कॉमन्सचे बीस सभासदांपेक्षां एक उत्तम प्रकारचें शिक्षण मिळालेला व आपलीं मतें निःशंकपणे व बेधडक प्रसिद्ध करणारास ज्याची छाती आहे असा वर्तमानपत्रकार बरा. मग काय विचारता लोकांनीं आपलें तनमनधन वर्तमानपत्रांनां स्वातंत्र्य मिळवून देण्याकडे लावलें प्रथमतः लोकांना हे हक्क न मिळावे ह्मणून राजां

नीं व अधिकारापन्न प्रधान मंडळानें पुष्कळ खटपट केली. वर्तमान पत्रातून सरकारनें केलेल्या कृत्यांवर जेव्हां टीका होऊं लागल्या तेव्हांतर राजांचें व प्रधान मंडळीचें पित्त खवळलें. त्यांनीं स्वातंत्रेच्छु लोकांची देमाय धरणी ठाय अशी अवस्था करून सोडण्याचा प्रयत्न चालविला. ज्युनिअस् वाक्स अॅडमस, मार्टन्स व वेक्स फिल्ड अशा पन्नास जणावर निंदा लेख प्रसिद्ध केल्याचे आरोप ठेवून त्यांची चौकशी केली. व ज्या ज्या लोकांवर गुन्हे शाबीत झाले त्या त्या लोकांना होतील तितक्या कडक शिक्षा दिल्या आणि हें सर्व प्रायश्चित त्यांनीं आपलीं उघडपणें मतें प्रसिद्ध केल्याबद्दल त्यांना भोगावें लागलें. कांहीं खटल्यांत असें झालें कीं जुरर्स लोकांनीं राजेच्छे विरुद्ध कित्येकांस दोषमुक्त केलें. तेव्हां १७९१ सालीं एक नवीन कायदा अमलांत आणला.

कैलासवासी चार्लस ब्राडला साहेब मरण पावल्यामुळें सर्व हिंदुस्थानदेश हळहळत आहे. त्यांच्या मरणा निमित्त सर्व हिंदुस्थानभर सभा भरत आहेत व दुःखप्रदर्शक पत्रें साहेब मजकुरांच्या कन्येस व नार्दिनटमच्या मत देणाऱ्या गृहस्थास रवाना होत आहेत. आणि ब्राडलाच्या स्मारका साठीं फंड ठिकाठिकाणीं उभारले जात आहेत हें ठीक आहे परंतु अशा प्रसंगीं आह्मांस दोन सूचना करणें भाग वाटत आहे. त्यापैकीं पहिली गोष्ट खुद्द ब्राडला साहेबांच्या खासगी गृहस्थिती विषयीं आहे. ब्राडला साहेबा सारखे लोकहित कर्ते श्रीमान असतात असा प्रकार विरळा घडतो श्रीमंती व विद्वत्ता यांचें वास्तव्य फारकरून एका ठिकाणीं नसतें ब्राडला साहेब अगदींच सामान्य व हलक्या स्थितीतून फार मोठ्या उच्च व लोकमान्य स्थानीं येऊन बसले तरी पैशा अडक्या संबंधानें त्यांना बरीच टंचाई पडत असे. हिंदुस्थानांत येण्यापूर्वीं त्यांच्या वर यमाचा पहिला घाला पडून तो निष्फळ झाला त्या वेळेस निरनिराळ्या खर्चाच्या बाबीमुळें त्यांस बरेंच कर्ज झालें होतें व त्या पूर्वींही त्यांच्यावर कांहीं खटले झाले होते त्या मुळें ते पुष्कळ खर्चाच्या फेऱ्यांत आले होते. हर प्रयत्न करून ते जिवंत असते तर त्यांनीं केव्हांच आपल्या विलक्षण चातुर्यानें कर्जाची नीट फेड करून टाकिली असती परंतु ईश्वरी संकल्प कांहीं निराळा होता. हिंदुस्थाना संबंधानें त्यांनीं फार कळकळ दाखविली व आपली आयुर्मर्यादा हिंदुस्थानच्या पायीं खर्ची घालण्याचा निदानीं निश्चय केला त्यां कृत्यांची फेड करण्याची वेळ सध्यां आपल्यावर आली आहे व या प्रसंगीं आपण मनाचा थोरपणा व गुणग्राही स्वभाव करण्यास विसरतां कामा नये. आमच्या मतें शहरशहरच्या सभांतून स्मारकानिमित्त उभारले ल्या पैशाचा उत्तम व्यय झाला म्हणजे सर्व हिंदुस्थानांतून ब्राडला साहेबांच्या कन्येस किमानपक्षीं वीस हजार तरी रुपये पोंचते होतील अशा बेतानें कांहीं रक्कम निराळी खर्ची घालावी. ब्राडला साहेब आसन्न मरण असतांना त्यांना डाक्टरांनीं उष्ण देशावर पर्यटण करण्यास सांगितलें होतें परंतु पैशाच्या अडचणी मुळें त्या थोर पुरुषानें त्या बाबतींत कोणाजवळ चकारही काढिला नाहीं त्या अर्थीं खुद्द त्यांनीं हिंदुस्थानांतील कोणत्याही देणगीचा स्वीकार केला नसतां तेव्हां हा कठीण वेळ जाणून व लोक हिताच्या परिश्रमाचें बीज होऊन लोकांस त्या गोष्टीची चाड लागावी ह्मणून हिंदुस्थानांतून निदान वीस हजारा एवढी रक्कम ब्राडला साहेबांच्या कन्येस नजराणा ह्मणून धाडावी अशी आमची फार शिफारस आहे दुसरी सूचना ब्राडला साहेबांचा पुतळा हिंदुस्थानांत एखाद्या स्थळीं उभारण्या विषयीं आहे. त्या संबंधानें आह्मी कांहीं विशेष आग्रह करूं इच्छित नाहीं व ही गोष्ट सर्वांच्या संमतीनें जुळल्यास व पैसा त्या कामा साठीं पुरेसा गोळा झाल्यास होण्या सारखी आहे लार्डरिपन साहेबा सारख्या कांहीं कनवाळू व मोजक्या गृहस्थाचे पुतळे अद्याप उभारले नाहींत तेव्हां आमच्या या दुसऱ्या सूचनेचा लोकांच्या मनावर कितपत ठसा उमटेल या विषयीं आम्हांस मोठा संशय आहे. वरील पहिल्या सूचने विषयीं लोकांनीं अगत्य विचार करण्यास काडीमात्र विसरूं नये.

संमतीचें वय बारव्यावर्षा पर्यंत वाढलें पाहिजे असा ज्यांचा ग्रह आहे त्यांनीं आपल्या प्रतिपक्ष्यांस बोध केला आहे कीं राष्ट्रीय सभेसाठीं तरी निदान त्यांनीं आपला दुराग्रह सोडून सरकारचे बिलास पूर्ण संमति दर्शवावी कांकीं तसे न केल्यानें राष्ट्रीय सभेचे जनरल सेक्रेटरी मि. ए. ओ. ह्यूम हे राष्ट्रीय सभेशी आपला संबंध तोडून विलायतेस जातील. सामाजिक गोष्टीत नेटीव लोक या प्रमाणें अगदीं मागें आहेत तेव्हां ते राष्ट्रीय सभे सारख्या संस्थेला लायक ठरत नाहींत असाही आक्षेप आणण्यास कायदेबाज मंडळी प्रवृत्त आहेत हें पाहून नवल वाटतें. ह्यूम साहेबांनीं लोकांस सांप्रतच्या बिलासंबंधानें आपलें अभिप्राय दर्शविले आहेत आणि आपल्या पक्या समाजा प्रमाणें बोधपरही गोष्टी सांगतल्या आहेत त्यांचें पत्र लोकांनीं पूर्णपणें मान्य केलें ह्मणजे त्यांच्या मताचे चांगलें मनन करून नेटिवांच्या गृहस्थिती संबंधानें साहेबांस पाहिजे तितकी माहिती नाहीं असें निर्णयात्मक ठरविलें. आमच्या मध्येंच प्रस्तुतच्या चळवळी संबंधानें एवढा मोठा मतभेद झाला आहे तर मग आमच्या सामाजिक व्यवस्थेच्या प्रकरणांत त्रयस्थ अशा गृहस्थाचे विचार लोकमान्य होणार नाहींत यांत कांहीं आश्चर्य नाहीं. आरंभी त्या पत्राच्या अखेरीस खुद्द ह्यूम साहेबांनीं टीप मारली होती कीं हें पत्र मीं आपल्या खाजगी नात्यानें लिहिलें आणि त्यांत राष्ट्रीय सभेच्या जनरल सेक्रेटरीचा संबंध कोणी निराळा नवीन जोडू नये. इतकी परीस्फुटता झाली असूनही वरील विलक्षण युक्ति लढविण्यास सुधारक शिरोमणी पुढें सरसावले ही मोठी दुःखाची गोष्ट होय. गेल्या रविवारीं मुंबईस माधव बागेंत संमतीच्या बिला विरुद्ध टोलेजंग सभा भरली होती त्यावेळीं राष्ट्रीय सभेचा अशा सभामुळें ऱ्हास होत चालला आहे अशा मतलबाची पद्यें एका दूरदर्शीनें छापून वाटली. असो आतां आह्मांस कळविण्यास परम संतोष वाटतो कीं खुद्द ह्यूम साहेबांनीं दुसरें पत्र लिहिलें आहे त्यांत मी वार्धक्या मुळें विलायतेंत जाणार होतों परंतु लोकांनीं सध्यांच्या कायद्या संबंधानें माझें मत लोकमता विरुद्ध आहे या मुळें जाणार आहे अशी शंका घेतल्या कारणानें आणखी एक वर्षभर हिंदुस्थानांत राहण्याचें योजिलें आहे; आणि राष्ट्रीय सभा मोडकळीस येत आहे किंवा तिचे पुढारी तिला सोडून जाणार आहेत इत्यादि कल्पना खोट्या असून माझ्या मतें राष्ट्रीय सभेनें चांगलीं कामें केलीं आहेत व ती उत्तरोत्तर चांगल्या उर्जित दशेस येईल असें त्यांनीं स्पष्टपणें लिहिलें आहे.

प्रस्तुत सर्व हिंदुस्थानभर मुख्य चळवळ संमतीच्या कायद्याच्या बिला संबंधानें आहे. या बिलाशीं हिंदू व मुसलमान या दोन जातींचा प्रत्यक्ष संबंध आहे तरी पार्शी व युरोपियन गृहस्थही आपल्या शहाणपणाचा व अनुभवाचा लोकांस अनेक प्रकारें उपयोग करून देत आहेत. कायदा पाहिजे असें म्हणणाऱ्यां गृहस्थांस कांहीं एका तऱ्हेचें वैभव आल्या सारखें झालें आहे. कायद्यास अनुकूल अभिप्राय दर्शविल्यानें त्यांस एक मोठी परवानगी मिळाली आहे ती अशी कीं त्यांनीं बिला विरुद्ध पक्षा कडील लोकांवर वाटेल त्या रीतीनें तोंड सुख द्यावें. बिलास अनुकूल अभिप्राय म्हणजे मनुष्याच्या विद्वत्तेचें व सुधारकत्वाचें दर्शक होय असें मानतात. आणि हीच कसोटी इतर गृहस्थांस लागून त्यांच्या अनुकूळ किंवा प्रतिकूळ मता प्रमाणें ते लोक विद्वान किंवा मूर्ख, व सुधारक किंवा दुर्धारक म्हणून जाणवले जातात. कायदा नको म्हणतात त्यांनींही उरटा किंवा उचलला आहे. तेलंग, भांडारकर, चंदावरकर इत्यादि गृहस्थ सामाजिक गोष्टींवर अभिप्राय सांगण्यास नालायक आहेत; त्यांचीं धर्मबंधनें फार शिथील आहेत आणि त्यांच्या इंग्रजी विद्येचा प्रभाव आपल्याच समाजावर तुटून पडण्याचा आहे तेव्हां असली विशयती मंडळी ज्या प्रकरणांत पडतात त्या पासून लोकांनीं निमुटपणें वेगळें राहावें इतकेंच नव्हे तर लोकांनीं समाजाशीं द्रोह करणाऱ्या लोकांप्रमाणें त्यांस पुरतेपणीं समजून वागावें. उभय पक्षांस निवळ टाळ्या वाजविणारे लोक पुष्कळ मिळतात आणि सध्यां कायद्यास प्रतिकूळ जो प्रचंड जनसमूह आहे त्यांत प्रतिपक्षाच्या विरोधी व द्वेषोत्पादक वर्तनामुळें विलक्षण प्रकारची चळवळ चालली आहे आणि बहुत लोकांच्या प्रवृत्ति जुन्या चाली रीतीस दृढपणें कायम धरून बसण्याकडे वळत आहेत किंवा किंबहुना प्रस्तुत सामाजिक स्वातंत्र्यास सरकारी कायद्यानें धक्का पोंचत आहे ह्मणून लोक सुधारणेचा मार्ग तत्काळ सोडून देण्याच्या तयारींत आहेत. उभय पक्षीं फारच फार थोडे गृहस्थ सूक्ष्म विचारानें दूरवर दृष्टी पोंचवून कायदा पाहिजे किंवा नको असें ह्मणतात व अशा समाजाच्या अग्रणी लोकांच्या दूरदर्शी व शहाणपणाच्या वर्तनावर समाजांतील अनेक घटका वयवाचें चलनवलन अवलंबून आहे तेव्हां आमची दोन्ही पक्षाकडील पुढारी मंडळीस अशी विनंती आहे कीं त्यांनीं आपापल्या मताकडील लोकांच्या वर्तनांत कोणकोणते बलवत्तर फरक आहेत ते पूर्णपणें लक्ष्यांत आणून फार पोक्त विचारानें अशा आणिबाणीच्या वेळीं लोकांस चांगलें वळण लावून ठेवावें किंवा निदान कांहीं झालें नाहीं तरी एखादा भलता दुष्ट परिणाम लोकांच्या मनावर न होईल अशी खबरदारी घ्यावी.

## जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं कमेटीचे हद्दीतील कचरा वाहून नेण्याचा, आठवडे बाजारचा कर वसूल करण्याचा, स्टेशनधर्मशाळेचा व स्लाटर हाऊसचा कर वसूल करण्याचे हक्काचा लिलाव ता० २२ माहे मार्च सन १८९१ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहॉलांत सन १८९१–९२ साला बद्दलचा होणार आहे. ज्यास घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहू तारखेस हजर व्हावें कळावें ता० १८–२–९१.

(सही)

महमद हुसेन सेक्रेटरी

आ० मु० क०

# The Berar Samachar

MONDAY, FEBRUARY, 23, 1891.

We are for reform but not for the bill. The present bill turns upon a question of principle. The principle refers to legislation on social and religious matters. If Government decide to interfere we have certainly to make a better proposal than the present bill. The bill is an advance upon a 'dead letter' in the Penal Code and promises to continue a dead letter if it pass into a law. There is a sound measure to strike at the very root of the evil. There was a deep sense in the proposal of the experienced Shastri of Amraoti. Mr. Janardan Shastri has our complete approval to his view of the age of consent to matrimony. But we express our acceptance of it hypothetically. We argue this on the condition that there is only one alternative left us. We are either to accept the Scobble bill or a proposal in regard to matrimony. We are indeed for the latter. We think the guilt of rape between husband and wife as a moral stain on the national character. Besides the mischievous prosecutions will have no room when marriage time is settled by the law.

The memorialists to the Viceroy in Council are in fact running wild. The supporters have their tacties. Women are also going to memorialize. What a frenzied step it is! The opposionists stand on a destructive platform. They will not allow a word of reform.

The bill is no doubt every thing but satisfactory. But reform should be shouted from housetop. And it is on this account that we heartily approved of the Social Association for Berar under the auspices of Rao Bahadur Jatar. We want every thing that will smoothly strengthen the hands of such institutions. Growth and progress are the course of nature. To anticipate nature is to accelerate the progress of society. To observe the forces in action to introduce a salutary check or stimulous is the work of the go-a-head gentlemen. They must approach society with due reverence and society too will in return honour them as their champions. This is in short the process of social progress. Society is not built up in a day. It is the growth of centuries together. The onward progress should be gradual. No hasty measure will do the work. The present bill is no hasty step but it is an indiscreet step. The return from Simla surprised the nation with the Scobble bill. The national stir is the natural result of it. When the whole of India with the exception of a microscopic minority is exasperated against

the bill it is a bad work of policy to pass it into a law. Society calls Government the defendence of religion. But when religion is in danger the work of ruin will soon be complete. At least so much of the ruin is certain as much of the danger is certain.

The Hindu religion is a novel production of the human mind. It is social, political and moral. The European criminal laws will find no parallel in them. But all other sides of human knowledges are well represented in it. Let people be thoroughly religious and we shall require no Government to teach us reforms. But mostly people make it a matter of gain and loss in the observance of religion. It is unreligiously preached and is considered more honoured in the breach. We would expect men to be strictly religious and would promise them in all moral certainly, every thing that is good and praiseworthy. Besides the Hindu religion is not nonpromovent. It adopts itself to any change in the life of man. This no new reform will make us abandon our religion. The people must, at this crisis, form different communities to smoothen social reforms and must bind them selves to abide by their rules of religion and custom under the penalty of social exclusions more or less.

But if Government resolve to give us a law inspite of the unrepresentative character of its councils we would request them to fix the age of consent to matrimony. But again here is a question whether it should be ten or twelve. We express our views in favour of the former one. The limit of twelve will greatly unsettle the current customs & manners. But if it be ten fathers are at liberty to marry their daughters when they begin their eleventh. It will not be a great obstacle and will at the same time allow religious ceremonies to be gone through in their entirety. It will put a stumbling block in the way of husbands having immature cohabitation. It will aim at indirectly increasing the marriage time. This will give with the social leaders a kind of legal assistance to hasten the reforms they hold in view. It is thus a modicum of reform. Before we proceed to discuss the age of consent to matrimony in detail we would ask the public to think twice over the matter before they decide.

## CORRESPONDENCE

To

The Editor of the Berar Samachar

Sir,

Permit me to write a few lines on the Age of Consent Bill. The object apart from the Bill, is really laudable and Government deserves praise for it. Had this amendment been introduced some 30 years ago, Government would not have seen such an opposition. But masses of the present time oppose this bill not because its object is not good but because they are under misapprehension that certain ultra reformers are insisting on the Government to introduce this bill as a priliminary to carry out their other hobbies, and because in addition to this belief some of the people even consider that their religious beliefs are shaken. Their beliefs may be wrong but they are certainly honest. And as long as they are present in people's mind government will see opposition. Under such circumstances it ought to be the prudent policy of government either to let the things as they are and try to remove the over-anxiety of men or to move in certain other directions suited to and at the same time corrective of the sentiments of men.

The present bill which protects girl below 12 years interfers with religious custom in so far as it is not going to admit the consumation of girls below 12 even though it is sanctioned by the traditional religious beliefs of people. Lord Landsdown has said that the bill does not interfere with the religious notions of the people. And in order to support it it is urged by some reformers that the Shastras rightly interpreted do not enjoin an express injunction to the effect that the consumation ceremony (Garbhadhan) should be performed on the first appearance of puberty and it is also urged admitting that the Shastras do so the ceremony can be inferred by the introduction of expiations which have been introduced as in the case of many other ceremonies. But I think these two propositions have nothing to do with government. The Shastras may not have expressly sanctioned the garbhadhan on the very first appearance of puberty and expiations may have been introduced in dispensing with all ceremonies except this. But people have all along been carried with contrary beliefs. Usage needs no justification; and it is never intentionally based upon rights and proper interpretations. People may now come to know that their beliefs are falsely founded; and they may of their own accord change them. But up to this time the beliefs are their religious notions and the bill consequently interferes with them. By the bye I say that Dr. Bhandarkar and Mr. Justice Telang have done great service to their country by trying to give a healthy tone to their society. But legislative body is not to rule men according to what their religious beliefs ought to be but what they have been and what they are; and this was also expressed by Lord Dufferin in 1886.

But Lord Landsdown has further expressed that this custom is barbarous and that girls ought to be protected out of natural justice and humanity "Protected" they must be; and we must all thank the government for this sympathy. But I do not go with him in saying that the custom is an evil the abolition of which will not shake religion. The custom is one of the religious notions of men; but it is an evil of such a nature that it ought to be put a stop to. I do not like to see the bill passed for the simple reason that not only will not the bill perform its functions notwithstanding its being made non-cognizable but on the contrary it will be a source of inconvenience and vexation to many families. Excepting certain towns and cities men are not able to appreciate the spirit of the bill because they are not prepared by their want of education to receive the principle of it. Three-fourths of the population of India live in villages and many of them are ignorant. One of their ideals is their being well talked of by neighbours and relatives. Men envious of their good name are not wanting. These men are always busy in finding out means to degrade these good men. This bill will give them one additional means. On their informations many innocent families are likely to come before the court incurring great expenses of coming and going. Their wives will be dragged to the Courts and will be asked many humiliating questions. And supposing they be declared cleared of the charge the advantages of these answers will be now and then taken by men in lowering them among their village circles. In addition to this social degradation it will produce family dissensions. Nevertheless I suppose for a moment that a case has really been made out and that the husband is proved guilty for violating his wife under 12 and is sentenced for life. Now I ask where the protection of girls and humanity lie in this. When her husband is to pass his whole life in some distant country what social elevation has his wife got in a Hindu family. She will be considered a bane to her husband's family and will be consequently driven away. She will not be honoured among the company of women and unless divorce is allowed she cannot marry. She will be obliged therefore to maintain herself by occupations certainly not of an honorable nature. Will humanity take her out from this diplorable difficulty? I may add one more difficulty. supposing the husband remains really innocent of this new offence and supposing that his wife is at his house and that at the end of the 12th year she is found pregnant what will be the result. Either she must declare herself an adultress openly in court or her husband must go to a distant land for ever. And if she chooses to follow the first course will she succeed in finding out her seducer and in making evidence against him. Certainly law in this branch creates more difficulties whereas its functions ought to lessen them.

Therefore I say that the Bill is productive of many evils and will also be inoperative in the case of those families who have got either authority or any influence of wealth over their subordinates or dependants.

I may not therefore be understood that I play the part of a disingenuous man in first admitting that the evil exists and that it should be soon put a stop to and at the same time in going against the Bill owing to its inoperative and mischievous consequences and thus unpliedly not admitting the evil. Therefore I say that government should give off this way of checking evil but should create better public opinion by persuasion and more effective education and then asking that opinion should create certain civil disabilities.

Yours &c.
D

Bombay
19th February 1891.

### नोटिस

अकोलें म्युनसिपल हद्दींत राहणारे रॉकआईल तेलाचें व्यापारी व इतर लोकांस.

माशुमशा जवळील शेत सरवे नंबर १३ ही जागा राकाईलच्या पेप्या सांठविण्या करितां कमेटीनें मुकर केली आहे त्या ठिकाणीं तुम्ही आपल्या राकाईलच्या पेप्या नेऊन ठेवाव्या, म्युनसिपालिटीच्या हद्दींत इतर कोणते ही ठिकाणी ठेऊ नये अशा विषयीं तुम्हांस बरेच दिवसां पूर्वी लेखी समज दिली असून तुम्ही अद्यापि त्या प्रमाणें केलें नाहीं तरी कमेटीचा तारीख १६ फेब्रुवारी सन १८९१ ईसवीचा ठराव नंबर २ या अन्वयें तुम्हांस आतां शेवटची नोटीस म्युनसिपल कायद्याचें कलम ९२ अन्वयें देण्यांत येतें कीं या नोटिशीच्या तारखे पासून १५ दिवसाचे आंत सदर्हु मुकर केलेल्या जागीं तुम्हीं आपल्या रॉकाईल पेप्या नेऊन ठेवाव्या. तुम्हांस दुकानांत, अथवा वर मुकर केलेल्या जागे शिवाय म्युनसिपल हद्दींतील इतर जागीं फक्त तीन पेप्या ठेवण्याची परवानगी आहे त्याहून ज्यास्त पेप्या ठेऊं नयेत. सदर्हु मुदतींत नोटिसीची अमलबजावणी तुम्ही न केलल्यास म्युनसिपल कायद्याचें कलम १३८ या प्रमाणें तुम्हांवर मुकद्दमे केले जातील तारीख २२ फेब्रुवारी सन १८९१ ईसवी.

V. R. Mudholkar
Secretary Municipality
Akola.

### पोंच

वाशिमकर 'क्ष' तारीख १८चे पत्रांत लिहितात की पावसानें कहर करून दिला आहे गारा पडून शेतें जमीन दोस्त झाली आहेत. त्यामुळें शेतकरी लोक हवालदील आहेत. मि. पांडुरंग विनायक वकील ह्यांच्या अध्यक्षते खाली संमत्ति वयाच्या बिला विरुद्ध सुमारें दोनशें लोकांची सभा भरली होती व त्या सभेंत बिलाबद्दल आपली नापसंती आहे अशा अर्थाचा हिंदुस्थान सरकारास पाठविण्याचें ठरलें. 'क्ष' नें उमरावतीच्या २३ सुधारकांवर व वऱ्हाडांतील दोन पत्रांवर बरीच टीका केली आहे व 'आज पर्यंत राष्ट्रीय कामांत मंडळीनें एक दिलानें मोठी करामत करून दाखविली. सालमजकुरी राष्ट्रीय सभा नागपुरास भरावयाची असें ठरलें आहे, त्या सभेच्या पुढारीपणाचें तिसरा हिस्सा यश वऱ्हाडवासी पुढाऱ्यांना मिळावयाचें हें घेण्यासाठीं मंडळीनें सभेची तयारी चालविण्याचे सोडून देऊन निरर्थक वादांत मन घालून आपसांत वितुष्ट पाडून घ्यावें हें उमरावतीच्या मंडळांना शोभतें काय?' असा प्रश्न केला आहे.

## वऱ्हाड.

मि. अबदुल कुदूस उमरावतीचे नायब तहसिलदार यास अकोल्यास तहशिलदार नेमिल्या प्रमाणें त्यांनीं आपल्या कामाचा परवां येथें येऊन चार्ज घेतला.

सेन्ससचे कामासाठीं सुमारें १२९ कारकून ठेविण्यांत येणार आहेत.

मि० सुबराव तहशिलदार मोर्शी हे सेन्ससचे कामावर आल्यावर त्यांचे जागीं रा० रा० त्र्यंबक गणेश छा० आ० को० बुलढाणें यांची नेमणूक होईल.

येत्या ता० १ मार्च रोजीं येथें वऱ्हाड सार्वजनिक सभेची जनरल कमेटी भरणार आहे.

रा० रा० गणेश बापुजी व मि० इस्मायल हे दर्यापूर कोर्टावर जातील व त्यांचे कामावर रा० रा० बळवंतरावजी कावळे जातील असें कळतें.

रा० रा० बंधूजी जनार्दन ए. अ. क. यांची उमरावतीस बदली होऊन मि. हैदर अली यांची एलिचपुराहून बुलढाण्यास बदली झाली.

मि. शेक हिसामुद्दीन, माजी अ. क. यांना खानबहादूर व रा. रा. रामराव गोविंद माजी ए. अ. क. यांना राव बहादुर हे किताब मिळाले.

फर्स्टक्लास आस्पितल आसिस्टंट जे. मारीमथु पिल्ले, चारिटेबल डिस्पेंसरी, चांदूर यांस तीन महिन्याची रजा मिळाली, व त्याचे जागीं अबदुल रहमान, थर्डक्लास आस्पितल असिस्टंट यांस नेमले.

मंगरुळपीर येथील अस्पितल असिस्टंट पुरुषोत्तम यांस अडीच महिन्याची हक्काची रजा मिळाली व त्याचे जागीं नरहर गोपाळ वेलणकर यांना नेमलें.

मि. दामोदर मल्हार देशपांडे यांस चांदूर तालुका बोर्डाचे मेंबर निवडलें.

## वर्तमानसार.

— पंजाबांतून यंदा सिव्हिल सर्विसच्या परीक्षेस बसण्या करितां दहा उमेदवार जाणार असल्याचें कळतें.

—फारेष्ट खातें—रेव्हिन्यू आणि फारेष्ट या दोन खात्याच्या लोकांमध्यें वारंवार तक्रारी होऊं लागल्या मुळें व कित्येक हिशेबी अडचणी येऊं लागल्या मुळें फारेष्ट खातें रेव्हिन्यू खात्यास जोडून पोलीस खात्या प्रमाणें तें सबार्डिनेट करण्या करितां आज बरेच दिवस सरकारांत विचार चालूं होता त्याचा निकाल नुकताच होऊन सरकारानें तें खातें रेव्हिन्यू खात्यास जोडण्या बद्दल ठराव केला आहे. न्या० सिं०

—लंडन येथें कांग्रेस सभेच्या तर्फे जी सभा भरेल त्या सभेत सरकारचें कोणत्याही प्रकारें अंग असणार नाहीं असें प्रसिद्ध झालें आहे.

— यंदाच्या सालीं जर रोकड शिल्लक सरकाराजवळ जास्त राहील असा अजमास आहे तर मिठावरील कर कमी करण्याबद्दल अर्ज ठिकठिकाणच्या लोकांनीं पाठविण्याची तात्रडतोब तजवीज करावी.

— नुसत्या पैशानें मनुष्य सुखी होत नाहीं:— चार्लस प्राट नांवाचा मनुष्य अमेरिकेंत उद्योगधंदा करून चांगल्या प्रकारें रहात होता; परंतु त्याच्या आप्तवर्गाकडून त्याला एकदम सुमारें ३० लक्ष रुपये मिळालें हे पैसे मिळाल्यानंतर त्याला वाटलें कीं आतां आपल्या सुखाला कांहीं पारावार नाहीं ह्मणून मोठें जंगी घर बांधलें, गाडी घोडा ठेविला व सर्व प्रकारें आपल्यासुखवृद्धर्थ त्यानें सायी केल्या परंतु इतक्यानें त्याला वास्तविक शांतता प्राप्त झाली नाहीं व पूर्वींची गरीब स्थिति यांपेक्षां बरी होती असें उद्गार त्यानें आपल्या चाकरा जवळ काढलें व त्या प्रमाणें जुन्या घरांत राहण्यास जाण्याचा निश्चय केला, परंतु तेथें आतां घोड्यांचा तबेला असल्यमुळें त्याला तो तबेला पाहून फार खेद झाला व लागलीच त्यानें आपल्यास गोळी मारून घेतली व जीव दिला. या वरून नुसत्या पैशानें मनुष्या सुखी होतो ही जी कांहीं अडाणी लोकांची समजूत आहे ती चुकीची आहे.

मुंबईच्या बायलर अक्टा प्रमाणें दुसऱ्य व तिसऱ्या वर्गाच्या एंजिनियरच्या परीक्षेस बसण्याची परवानगी मुंबई येथील धंदेशिक्षणाच्या शाळेंतील विद्यार्थ्यांस मुंबई सरकारानें दिली हा फार चांगला गोष्ट केली. यामुळें त्या शाळेंस मोठें उत्तेजन येईल.

केसाळहत्ती— सिंगापूर येथें धरून दोन हत्ती अमेरिकेंतील न्यूयार्क शहरीं थोड्यादिवसां पूर्वीं नेलें आहेत या दोहो मध्यें मोठा आहे तो ३६ इंच घाकटा अथवा सहा इंच उंच आहे. ह्यांची वये ६।६ वर्षांची आहेत. ह्याच्या मध्यें विशेष हें कीं त्यांचें डोकें, पाठ आणि पाय ह्यांवर तीन इंच लांबीची दाट लोकर आहे. असलें विमुकले आणि केसाळ हत्ती पूर्वीं कधीं सांपडले नव्हते असें ह्मणतात. रा० सु०

जन्म मरणाची नोंद या बद्दल नियम

अकोला म्युनिसिपाल कमिटीनें आपले हद्दींत जन्म मरणाची नोंद बरोबर रहावी या साठीं सन १८८६ च्या वऱ्हाड म्युनिसिपाल कायद्याचें कलम ११ (क) या अन्वयें पुढील नियम केले आहेत हे नियम ता० १ माहे एप्रिल सन १८९१ इसवी पासून अमलांत आणण्यांत येतील.

नियम १ —म्युनिसिपालिटीचे हद्दींत मूल जन्मतांच ७२ तासाच्या आंत त्याच्या बापानें, आईनें, पालकानें, अथवा ते हजर नसल्यानें, वारले असल्यानें, आजरी असल्यानें, अथवा अशाच इतर कारणानें माहिती देण्यास असमर्थ असल्यास घरांत असणाऱ्या दुसऱ्या एखाद्या इसमानें अथवा जन्माच्या वेळीं जो कोणी हजर असेल, त्यांनें मुलाच्या जन्मा संबंधानें खालील माहिती म्युनिसिपालिटीचे आफिसांत, अगर ज्याच्या तक्यांत शहरचा तो डिव्हिजन असेल त्या म्युनिसिपालिटीचे डिव्हिजन मेंबरास, अथवा त्याच्या शिपायास अगर या कामा करितां जो म्युनिसिपाल मेंबर नेमला असेल त्यास, अगर कानसरव्हन्सी इन्स्पेक्टर असल्यास यास द्यावी:—

( १ ) मूल ज्यांत जन्मलें असेल तो म्युनिसिपालिटीचा डिव्हिजन व रस्ता.

( २ ) मुलाच्या आईबापांचें नांव.

( ३ ) मुलाच्या आईबापांची जात, धंदा व धर्म.

( ४ ) जन्मलेलें मूल—मुलगा किंवा मुलगी.

( ५ ) मुलाच्या जन्माची तारीख.

( ६ ) मूल जिवंत जन्मलें, अथवा मेलेलें जन्मलें, अथवा जन्मतांच मेलें.

नियम २—म्युनिसिपालिटीचे हद्दींत एखादा मनुष्य मरतांच ७२ तासाच्या आंत त्याच्या कुटुंबांतील एखाद्या इसमानें, अगर असा कोणी इसम नसल्यास, तो गैर हजर अथवा आजरी असल्यानें अथवा इतर अशाच दुसऱ्या कांहीं कारणानें माहिती देण्यास असमर्थ असल्यास, त्या घरांत रहाणाऱ्या दुसऱ्या एखाद्या इसमानें त्या मनुष्याच्या मरणा संबंधानें खालील माहिती म्युनिसिपाल आफिसांत अगर ज्याच्या डिव्हिजनांत तो मेला असेल, त्या डिव्हिजनच्या मेंबरास, अथवा त्याचे शिपायास अथवा शहर सफाई—पहात असणाऱ्या म्युनिसिपाल मेंबरास अगर कानसरव्हन्सी इन्स्पेक्टरस द्यावी:—

( १ ) मनुष्य ज्यांत मेला असेल तो म्युनिसिपालिटीचा डिव्हिजन अगर रस्ता.

( २ ) मेलेल्या मनुष्यांचें नांव, जात धर्म, वय व पुरुष किंवा स्त्री.

( ३ ) कोणत्या रोगानें मेला व किती दिवस आजारी होता.

( ४ ) मरणाची तारीख.

( ५ ) मेलेल्या मनुष्याचा धंदा.

नियम ३— नियम १ व नियम २ यांच्या अन्वयें माहिती देण्या करितां कोणी इसम आल्यास त्यास म्युनिसिपाल काम दारानें या खालीं दिलेले नमुने ( अ ) व (ब) स्वतः भरून देण्याकरितां तो मागेल तर त्यास द्यावे. त्यानें माहिती दिल्यावर त्यास खाली दिलेल्या ( क ) नमुन्या प्रमाणें माहिती दिल्याचा दाखला मिळेल.

नियम ४ —नियम १ व नियम २ या अन्वयें आपलें कर्तव्य कर्म असून जो इसम त्या नियमा प्रमाणें माहिती देणार नाहीं व त्याजवर तो गुन्हा माजिस्त्रेट कोर्टांत शाबीत झालातर रुपये ५ हून जास्त नाहीं एवढ्या दंडास तो पात्र होईल.

व्यंकटेश रामचंद्र मुधोळकर
सेक्रेटरी मुनसिपालिटी
अकोलें.

नमुना अ०

| | |
|---|---|
| अनुक्रम नंबर. | |
| डिव्हिजनचें नांव | |
| रस्त्याचें नांव | |
| आई बापांचें नांव | |
| आई बापांचा धंदा, जात व धर्म | |
| मुलगी अथवा मुलगा | |
| मुलाच्या जन्माची तारीख | |
| मुल जिवंत जन्मलें अथवा जन्मतांच मेलें. | |
| माहिती देणाराचें नांव | |
| माहिती देणाराची सही | |
| शेरा | |

ता० माहे सन

मुनसिपल आफिसराची सही.

नमुना ब०

| | |
|---|---|
| अनुक्रम नंबर | |
| डिव्हिजनचें नांव | |
| रस्त्याचें नांव | |
| मेलल्या इसमाचें नांव | |
| त्याची जात, धर्म व धंदा | |
| पुरुष किंवा स्त्री | |
| वय | |
| मरण्याचें कारण व किति दिवस आजारी होता | |
| मरण्याची तारीख | |
| माहिती देणाराचें नांव | |
| माहिती देणाऱ्याची सही | |
| शेरा | |

ता० माहे सन

मुनसिपल आफिसराची सही.

नमुना—क०

नंबर

नांव

सदर्हू इसमाचे बद्दल माहिती दिल्याचा दाखला.

तारीख माहे सन १८९

( म्युनासिपालिटीचा शिक्का )

या दाखल्या बद्दल कांहीं फी द्यावी लागणार नाहीं.


वामन गोपाळ यांचा अनेक औषध मिश्रित

## सार्सापरिला

हा सार्सापरिला अनेक रोगांवर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणाकारी आहे उपदंशजन्य विकार, ( गरमी ) व तिजपासून होणारे पक्षघातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शरिरावर काळे डाग पडणें. संधी दुखणें कळा लागणें, सूज येणें वगैरे सर्व संधिगत वायुंवर तसेंच कोणत्याही प्रकारचे वचेचे रोग, जसें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज, गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांचे, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे. सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दूषित झाले असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखे दुसरे औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १॥ रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या

## गोळ्या.

बाळपणापासून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्राव यानें झालेली शरिराची क्षिणता जाऊन अशक्तता, अग्नीमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तात्रडतोब नाहींसें होतात. ह्यानें सर्व शरिरांतील चैतन्याचा व वृद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकंद (मेंदु) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनःरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुची शक्ति वढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा

## कलप

हा कलप प्रत्येक पंधरादिवसांनीं एक वेळ लाविला ह्मणजे पुरे आहे. यानें सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन. त्यास तेजी येते. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे याचे दवाखान्यांत वरील सर्व औषधे मिळतील आमचा पत्ता—नव्या ठाकुरद्वारा समोर


☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.